एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे

# उड्डाणटप्पू

पहिले उड्डाण



## श्रीरंग कौलगी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# उड्डाणटप्पू

## ( एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

## पहिले उड्डाण

श्रीरंग कौलगी

# उड्डाणटप्पू

## ( एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

## पहिले उड्डाण

**लेखक : श्रीरंग कौलगी**

सम्पर्क: व्हाट्सॅपँ क्र. +९१ ९९२०६ १२९९६
ई मेल shreerangkaulgi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237


(विनामूल्य पुस्तके नियमित मिळवण्यासाठी या क्रमांकावर आपले नाव व गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २९ डिसेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय



माझे नाव श्रीरंग कौलगी, शिक्षणाने आणि पेशाने मेकॅनिकल इंजिनियर.

माझे कार्यक्षेत्र नवीन मशीन डिझाइन्स करणे, ती डिझाइन्स विकसित करणे, त्याचे पहिले उत्पादन, म्हणजे प्रोटोटाईप करतांना बाहेर येणाऱ्या अडचणी सोडविणे आणि मग ती मशीन वापरात आणायला मदत करणे असे होते.

नव्याने आणि मुळापासून विचार करायला लागणे ही आमच्यासाठी पहिली आणि मूलभूत गोष्ट होती.

त्या अनुषंगाने आजूबाजूला चौकस नजरेने पहाणे आणि मिळेल तिथून नव्या कल्पना प्रत्यक्षांत आणणे हे आमच्यासाठी आवश्यकच होते.

जगाकडे चौकस दृष्टीने बघतांना आणि दिसलेल्या गोष्टींची ॲनालिटिकल चिरफाड करताना काही गोष्टी नव्याने सुचल्या त्या इथे मांडल्या आहेत.

एका इंजिनियरच्या दृष्टीतून जग कसे दिसते याची झलक आहे ही.

इथे सगळ्या गोष्टी नव्या नाहीत पण वेगळ्या अंगाने दाखवायचा एक प्रयत्न केला आहे.

प्रयोग कसा झाला आहे ते वाचक ठरवतील.

श्रीरंग कौलगी.

यापूर्वी तिसरे उड्डाण प्रकाशित झाले आहे. त्याचे कव्हर खाली आहे. त्यावर क्लिक केले की तेही उघडेल



# अर्पण पत्रिका

काहीतरी लिहावे असे वाटायला लागले. पण आपले वाचणार कोण असेही वाटले. पण तसे झाले नाही. ज्यांच्याकडे हे साहित्य पाठवले त्यांनी ते नुसते वाचले नाही तर त्यावर साधक बाधक प्रतिक्रियाही दिल्या. चांगली टीकाही केली. काही प्रतिक्रिया आणि टीका नवे विषय देऊन गेल्या.

त्या सर्व वाचकांना, त्यांत वर्गमित्र आले, घरचे आले आणि खास जवळचे हक्काचे टीकाकार वाचक आले. त्या सर्वांना साष्टांग दंडवत घालून हे पहिले प्रकरण अर्पण करतो.

ई साहित्य ने हे विस्कळीत लेख एकत्र आणायला मदत केली आणि ते नीट जुळवायचे काम कसे उत्तम केले आहे ते बघाच. त्यांचे मी हार्दिक आभार मानतो.

"मॅन प्रोपोझेस अँड गॉड डिसपोझेस" या उक्ती प्रमाणे आपले प्रयत्न सफल व्हायला ती दैवी शक्ती जी दिसत सुद्धा नाही, तिच्या चरणी हे पुष्प अर्पण.

# प्रस्तावना

या संग्रहात जे लेख प्रस्तुत केलेले आहेत ते एका इंजिनियरच्या मनात आलेले विचार आहेत. पण ते सगळ्यांनाच लागू होतात.

आपल्या मनांत अनेक विषय घोळत असतात, त्यांना तात्कालिक कारण असते किंवा पूर्वी काहीतरी पाहिलेले ऐकलेले असते त्याची पार्श्वभूमी असते.

रोज घडणाऱ्या घटना कधी नवीन पैलू घेऊन येतात. त्या दुसऱ्यांना सांगून पहाव्यात हा हेतू इथे आहे.

विषय वेगवेगळे आहेत आणि त्यांची एकमेकांशी रंगसंगती नाही, पण सगळे आपल्याला कधी न कधी स्पर्श करून गेलेले असेल.

हे ललित लेख किंवा मुक्त विचार प्रकटन म्हणूनच पाहावे, उगीच त्यातून खोल अर्थ काढू नये हा हेतू आहे.

बघा तुमचे विचार, अनुभव आमच्याशी जुळतात का.

हा पहिला संग्रह आहे. असे अजून संग्रह तुमच्यापुढे ठेवण्याचा मानस आहे.

"वर्क इन प्रोग्रेस" मानावे याला..

# लेख-अनुक्रम


नावाचा महिमा
आमचेही चिंतन
चंद्राच्या सावलीत
मी देवीचा वाघ आणि तो कॉर्बेट
टू बी ऑर नॉट टू बी
पुढचा जन्म कुणाचा
मला पडणारी स्वप्ने
घोडचुका
काय मिळवले आणि काय घालवले
माझे स्पोर्ट्स
भांडीवाल्याची प्रार्थना
माझे छंद
माझे पत्र जीवन
व्यवस्थितपणा
कवींचे साम्राज्य
चंद्राच्या मागे
शुद्धलेखनाचे महत्व
मानवी इंद्रधनुष्य
कला, शास्त्र आणि अभियांत्रिकी
पतंगबाजी
हिंदी नाटिका "भेजा"
गोरे और काले
राखी का फंदा
श्रद्धा आणि अंधश्रद्धा
संगीत साधना
आप कतारमें हैं
चित्रपट रसग्रहण "३ इडियट्स"
मनाचे श्लोक २०२१
खिडकीची जागा
कावळे
विजेच्या गाड्या

## नावाचा महिमा

नावात काय आहे? गुलाबाला झेंडू म्हटले तरी त्याचा सुवास बदलेल का?

हो का?

वाघाला बकरा म्हटले तर काय होईल. वाघ वाघ आहे आणि बकरा बकरा. वाघ नावात काही आहे. आहे ना?

जर नावात काही नसेल तर "मला ओळखता का?, मी कोण आहे माहीत आहे का?, माझे नाव ऐकले आहे की नाही?" याना काय अर्थ उरेल?

नावात काय आहे? नावात खूप काय काय आहे. जगात दुसरा कुठला प्राणी असा असेल की जो इतरांना नावाने ओळखतो? माणूसच असा प्राणी असावा जो इतरांना नावे देतो, घेतो आणि ठेवतो.

नवीन बाळं झाली आहेत, जुळी आहेत, एक मुलगा आणि एक मुलगी. बारा तेरा दिवस झाले. त्यांची आता नाव ठेवायला पाहिजेत. मुलाचे काय बरं

a

ठेवावे? देवांवरून ठेवूया. चांगले नाव ठेवू. पण आपले ३३ कोटी देव आहेत मग नाव कसे शोधायचे?

ठीक आहे आपण देवांचे सोपे भाग पाडू. चालेल? ब्रह्म, विष्णू आणि महेश.

ब्रम्हा म्हणजे आपला निर्माता, किती याची नावे आहेत, ब्रम्ह, विधाता, निर्माता, आदीदेव, सर्वनिर्माता, अजून? फार जड आहेत नाही? ठीक आहे, विष्णूचे नाव ठेवू.

विष्णूची नेहेमीची नवे संध्येतली चोवीस शिवाय सहस्रनामातील हजार. पहा एखादे आवडते का? फार क्लिष्ट आहेत.

बरं, ही पहा शंकराची. महेश, शंकर, महादेव, भूतनाथ? फार जुनाट वाटतात, इतर देवांची बघूया का की सरळ आकाशातील ग्रहताऱ्यांची बघूया? सूर्य? नको नको, सगळे सुऱ्या, सुऱ्या म्हणतील. मग मित्र, रवी, भानू, चंदू, गुरू, पुनर्वसू, अगस्त्य? की महिन्यांची नवे सुचवू अश्विन, श्रावण? किंवा ऋतूंची वसंत, हेमंत? नाहीतर निसर्गातील नावे आवडतील का, पवन, सागर, परबत, आकाश?

a

जरा थांबा, डोके फिरायला लागले आहे. आता काय करावे? जरा थोडा वेळ थांबा.

ठीक आहे, तोपर्यंत मुलीचे नाव आठवून ठेवतो. देव्यांवरून सुचवू की....?!! असे रागावून पाहू नका.

सोप्पी गुजराथी स्टाईलची नवे ठेवायची आहेत का?

मुलाचे कृणाल, तृषार, हिमल, मुलीचे हेतल, तेजल, बिनल, शेकल? नको म्हणता, अपभ्रंश वाटतो? ठीक आहे.

वाटले नव्हते की नाव ठेवणे एवढे अवघड असेल ते.

हरे राम, बरे झाले की आपल्याला आडनाव ठेवायचे नाही ते.

नावात काय आहे? नाव ठेवून बघा. कळेल.

एवढे करूनही आपण यांना सोनुली, बाबुडी, गोट्या, चिंगी, बनी, पिंट्याच म्हणणार का? मग एवढी नावे ठेवून काय मिळवले? नावाचे महत्व आहे. आहे ना? नाहीतर एवढा उपद्व्याप केला असता का?

आपले आडनाव आपल्या हातात नाही. जर असते तर काय आडनाव ठेवले असते मुलांचे आणि निवडले असते तुम्ही तुमच्याकरता?

आडनावाची पद्धत वेगळी. त्यांचा उगम वेगळा आणि त्यांची जातकुळी वेगळी.

गावावरून पडणाऱ्या आडनावाचे फार काही नाही. जास्तीतजास्त म्हणजे ती विचित्र असतील. पंढरपूरकर, कांदळगावकर, शिवेश्वरकर, महाबळेश्वरकर, निझमपूरकर, अशी लांबच लांब नावे असली तरी ती निरुपद्रवी वाटतात. इंग्रजीमध्ये लिहितांना सगळीच्या सगळी मुळाक्षरे वापरण्याची त्यांची क्षमता अचाट वाटते. सोलापुरे, कोल्हापुरे, सरळ सरळ बाळबोध. सातारकर, रेवणकर, कशी सुटसुटीत, फक्त कर लावायचे गावाच्या नावाला. कुलकर्णी, पाटील, देशपांडे, देशमाने गावचे अधिकारी, त्यांची नावे कशी वाटतात?

आडनावासारखी उघडे करून दाखवणारी गोष्ट दुसरी नसेल. देब्रा, कोब्रा, कऱ्हाडे, सारस्वत, ९६ कुळी, बलुतेदारी, कळते आडनावा वरून?! आडनावावरून धर्म कळतो, जात कळते म्हणून काही लोक आडनावे लावतच नाहीत. अगदी दक्षिणेला आणि अगदी उत्तरेला आडनावेच लावत नाहीत. मधल्या प्रांतातले मात्र लावतात.

कधी कधी मात्र आडनावे आपल्याला चांगलेच फसवतात. अदमास करणारे चांगले तोंडघशीसुद्धा पडतात. अगदी धर्माचीही गल्लत करवतात. मोडक, मगदूम, दिवाण अशी. अंदाज करण्याचा प्रयत्नच करू नये आडनावावरून, आपलीच फजिती होते.

काही आडनावे सुलतानी मधली आणि मोगलाई मधली त्यावेळची पद्धत दाखवतात. नौशेरा, साठमारे, सेनापती अशी.

एकंदरीत नावांचा आणि आडनावांचा उगम शोधायला जाऊच नये. आणि नावावरून माणसाचा अंदाज तर अजिबात करू नये. तिथे तुम्ही चकण्याची आणि चुकण्याची शक्यताच जास्त.

नको ती नावे, आडनावे बदलायची तर बरेच सरकारी सोपस्कार करूनही आपले साथीदार त्या जुन्या नावानेच हाक मारणार. तर सरळ सरळ आपल्या नावाचा, आडनावाचा मान राखावा आणि पुढे जावे.

आमच्यासारखे कौलगी आडनाव मस्त. गावावरून आलेले. काही झाकण्यासारखे नाही उलट गाववाल्यांना जवळीक दाखवायला बेस्ट. या गावातले सगळेच कौलगी. विश्वनाथ असो की आण्णाप्पा असो की इब्राहिम

असो की योसेफ असो. सगळ्यांचे आडनाव कौलगीच. आमच्या कर्नाटकांत अशी आडनावे सगळीकडेच. हट्टी, कट्टी, म्हाळगी, कौजलगी अशी. आमचे पणजोबा खापरपणजोबा इकडे मराठी मुलुखात आले आणि आम्ही मराठी झालो. आडनाव फक्त कानडी.

आम्ही आता कुठले कानडी, पण नाव काय दाखवते? कन्नडप्पा! अजूनही बॉर्डर क्रॉस केली की "काला अक्षर भैन्स बराबर" अशी आमची अवस्था होते. बोललेले कळत नाही लिहिलेले वाचता येत नाही. शिक्षणाचा काय उपयोग? देवाच्या दयेने ती इंग्रजी आणि ती हिंदी आहे म्हणून. नाहीतर आमची अवस्था वाईट.

आडनावही नावा इतकेच जबरदस्त पाहिजे. एखाद्या कंपनीचा CEO झाल्यावर, तपन भट्टाचार्य नाव कसे भारदस्त वाटते. तेच गंपू बाणे असेल तर कसे वाटेल?

नावात काय आहे? नावात वजन आहे, आदर आहे, दरारा आहे.

एका पोलीस कमिशनरचे नाव खंडेराव भोसले असेल तर गुंडांना आणि समाज कंटकांना धास्ती बसेल की नाही? नुसते टेलिफोनवर असे नाव ऐकले की त्यांचा थरकाप होत असेल की नाही?

या उलट एखाद्या कवीचे नाव शंकरराव भगवानराव भुजंगगावकर असेल तर त्याची कविता ऐकतांना श्रोत्यांची काय अवस्था होत असेल?

काही काही जागांना काही विशिष्ट नावेच शोभतात. राष्ट्रपती असावा तो दिसायला भारदस्त आणि भारदस्त आडनावाचा असावा, असे माझे खाजगीत मत आहे. तशीच नावे पंतप्रधान, मुख्यमंत्र्याची असावीत असे माझे आपले एक मत आहे. अजून निवडणुकीत वापरले नाही म्हणा पण मत असेच आहे.

नावात काय आहे? नावात सर्व आहे.

बायकांचे एक चांगले आहे. लग्नांत नाव आणि आडनाव दोन्ही बदलायची व्यवस्था आहे. आता एखादीला तिचा नवरा धोतरकर किंवा पळपुटे किंवा हंबरडे असेल तर ती काय करणार? माणूस आवडला पण त्याचे नाव नाही. मग ती सरळ आपले पूवीचे नावच लावते सगळीकडे. अगदी कायदेशीरपणे.

पण तो नवरा काय करणार? त्याला तर काहीच करता येत नाही. एक तर त्याचे सगळे नाव त्याने ठेवलेलेच नसते. शाळा कॉलेज जुन्या नावानीच केलेली असतात. सरकारात जाऊन नाव बदलावे तर सगळी सर्टिफिकेट्स जुन्या नावाची

असतात. नोकऱ्या मिळवताना हजार वेळा नाव बदलल्याची टेप वाजवायला लागते.

नाव ठेवणे, नाव घेणे आणि नावे ठेवणे या गोष्टी लग्न समारंभाचा अविभाज्य भाग आहेत.

नाव ठेवतांना?
कोणी गोविंद घ्या कोणी गोपाळ घ्या
कोणी बंड्या घ्या कोणी चिंगी घ्या

नाव घेताना?
पळपुटे रावांची काय बिशाद
नवरा म्हणून टाकलाय खिशात.

चंदनाचा पाट त्यावर चंदेरी ताट
धोतरकरांचे नाव घेते लाडू खात खात

नांवे ठेवतांना?
हा बघ आला कुपवाडचा अरनॉल्ड श्वार्झनेग्गर?
विहिणीला काय वाटते, फक्त तिच्याच कडे हिऱ्याचा सेट आहे का?

कुणी नाव ठेवो किंवा नाव घेवोत किंवा नावे ठेवोत, आपण तर आपल्याच नावाने वावरणार. श्रीरंग कौलगी. त्याचाच अभिमान बाळगणार.

कधी कधी मात्र, माणसांमुळे नावाला शोभा येते. त्या नावाला दादा, भाऊ, साहेब, राव लावले की झाले. मग ती नावे मोठी होतात.

अण्णासाहेब चिखलीकर, शंकरराव पाटील, विष्णुपंत कुलकर्णी, रमेशभाऊ देव, कशी वाटतात. भारी. माणूसही मोठा त्याचे नावही मोठे.

तर, नावात काय आहे? नावात स्वत्व आहे, अभिमान आहे.

नावाला लाजायचे नाही. नावाला शान आणायची. आपल्या कर्तृत्वाने.

नावांत काय आहे?

नावात शान आहे. नावात दरारा आहे, नावात वचक आहे, नावात सर्व आहे. म्हणून नावाचा अभिमान बाळगा.

# आमचेही चिंतन

आजकाल आम्हाला भांडी घासण्याचे काम आले आहे. आता कोरोना आल्यावर आपणही काहीतरी घरांत मदत केली पाहिजे या उच्च विचाराने आम्ही आपण होऊन घरांत विचारले, की आम्ही करू शकू असे काही काम घरांत आहे का तर ते आम्ही आनंदाने करू. तर घरच्या बायकांनी विचार विनिमय करून आम्हास सांगितले की आपण भांडी घासावीत, तेच एक आपल्यायोग्य काम घरांत आहे.

आता आपण होऊन विचारल्यावर आणि घराने हे काम आपल्याला सुचविल्यावर आता माघार घेणे आपल्याला शोभणारे नाही आणि भांडी तर घासावीच लागतात, मग भांडी घासू लागलो. म्हटले यातून काहीतरी नवीन शोध उपाय निघतील, आपण इंजिनिअर आहोत काही झाले तरी. तर आपले भांडी घासणे सुरू झाले.

भांडी घासायला एकदा सुरुवात केल्यावर, घरांत किती प्रकारची आणि किती भांडी असतात ते हळूहळू लक्षांत येऊ लागले. दोन वेळचा स्वैपाक करायला इतकी व्हरायटी का लागते ते अजून कळले नाही. एक दिवसात एक हजार चमचे का आणि कसे घासायला येतात हेही गूढ अजून उकलले नाही.

भांडी घासताना साबण ठेवायची जागा, त्याचा पोत, घासणीचा आकार आणि तिचा पोत, अतिशय मन लावून स्वयंपाक केल्यावर भांड्याच्या अगदी

a

काना कोपऱ्यात जाऊन बसणारे ते एक विशिष्ट प्रकारचे आवरण, त्या आवरणाला काढण्यासाठी लागणारी ती खास तार जाळी, तिचा पोत यांचा आपल्या विशेष चिकित्सक पद्धतीने सर्व दृष्टीने अभ्यास केल्यावर समजले ती त्या भांडीवालीला एक तास का लागतो ते.

काही दिवस भांडी घासून हात बसल्यावर, एक बाजूने भांडी घासली जात असताना दुसऱ्या बाजूने मनांत चिंतन सुरू होऊ लागले. इकडे भांडी चमकत होती आणि तिकडे मनातले ओघवते विचार या जगासाठी संतांनी काय काय सांगितले तसेच आपणही का नये सांगू असे सुचवू लागले होते.

चिंतन क्रमांक १

यार, आपण इंजिनिअर झालो पण आपण ही रोजची कामे सोपी करायचा काहीच कसा विचार केला नाही? तो रिन साबण, भांडीवाली तो कमीत कमी दहा वर्षेतरी वापरत असेल. त्याची ती बारीक वाळू भांड्यांना भले चरे पाडीत नसेल पण आपल्या न्हाणी ट्रॅप मध्ये नक्कीच साठून राहत असेल. तरीच पाणी हळूहळू जाते आहे. त्याला उपाय काय? हां, लिक्विड सोपच वापरला पाहिजे! एवढे दिवस आपण बायकोला का सुचविले नाही? आता यापुढे लिक्विड सोपच वापरायचा! दोन दिवसांच्या अनुभवानंतर वाटू लागले की लिक्विड सोप ठीक आहे पण त्याच्या एवढ्या चिकटपणाचे काय करायचे. तो चिकटपणा धुवून काढता काढता दोन बादल्या पाणी वापरावे लागते आहे. त्यापेक्षा लिक्विड सोपच पाण्यांत ओतून थोडा डायल्यूट केला तर? हे ज्यास्त ठीक

a

वाटते आहे. बघा. टेक्नॉलॉजी सावकाश डेव्हलप होते. त्यांत घाई करता येत नाही. मूल काही एका दिवसांत डेव्हलप होते काय?

चिंतन क्रमांक २

बायकांनी एवढी चकचकीत भांडी का वापरावीत? अशी भांडी उचलताना चिमूट किती घट्ट करावी लागते! कालची ती बोटातून निसटून पडलेली कढई, परवाचा तो तांब्या, आजचा तो जवळ जवळ संपलेला काचेचा सट काय दाखवितो? फिजिक्सच्या नियमानुसार तो घर्षणाचा कोएफीशीयंट काय म्हणतो? वस्तू सरकवायला लागणारा जोर हा वस्तूवर लावलेल्या जोराच्या आणि घर्षणाच्या त्या कोएफीशीयंट च्या गुणाकारा एवढा असतो. आता साबणाचे हात झाल्यावर कितीही दाबून धरले तरी गुरुत्वाकर्षणाने भांड्यावर लावलेल्या जोरापेक्षा तो कमीच असणार. मग भांडी बोटातून निसटली तर नवल काय? आपण काही भीम किंवा हर्क्युलीस आहोत का? आणि समजा असलो तरी भांडे आपल्या चिमटीचा जोर सहन करु शकेल काय? पण भांड्यांना तो फिजिक्सचा नियम काय माहिती?

चिंतन क्रमांक ३

दोन वेळचा स्वयंपाक करायला इतकी भांडी का लागतात? एकदा बायकोला विचारले. त्यावर, "तुम्हीच एकदा स्वयंपाक करून आम्हाला वाढा

म्हणजे कळेल", असे उत्तर आल्या नंतर या चिंतनात फारसा दम नाही म्हणून सोडून दिले.

चिंतन क्रमांक ४

भांडी दोन वेळा घासली तर त्या मानाने वेळ कमी पण दोन वेळा लागतो हे सत्य पुढे आले. हां, त्यांत बेसिन दोन वेळा धुवावे लागते आणि तो चरे पडू नयेत म्हणून अंथरायचा टॉवेलही दोन वेळा धुवायला लागतो हे प्रमेया बरोबर येणाऱ्या दोन उदाहरणांसारखे मनावर बिंबून पक्के झाले.

चिंतन क्रमांक ५

आपल्यासारखा कोरोना इतर देशांतही पसरला आहे असे ऐकले आहे. मग तिकडच्या काहींनी त्यांच्या घरांत अशीच विचारणा केली असेल का? आणि केली असेल तर त्यांना काय उत्तर मिळाले असेल? कदाचित त्यांच्याकडे उलटेही झाले असेल का, म्हणजे त्यांच्या इंजिनिअर बायकोला तिच्या कॉमर्स नवऱ्याने असे काम दिले असेल का? मग ती भांडी घासताना काय चिंतन करीत असेल? आता टेलीपॅथीचा शोध लागला पाहिजे, म्हणजे इकडे भांड्यांना हात लागला रे लागला की ऑटोमॅटिक कनेक्शन लागले पाहिजे की आपले विचार सर्व भांडी घासणाऱ्यांना आपोआप समजले पाहिजेत. म्हणजे काय होईल? भांडी घासण्याचे एक ISO स्टॅंडर्ड येईल मग नंतर ती भांडी तपासणाऱ्यांना काहीच फरक काढता येणार नाही.

चिंतन क्रमांक ६

चिनी मातीची आणि काचेची भांडी दिसायला मस्त असली तरी वागायला वाईट. जरा काही इकडे तिकडे झाले की दोन तुकडे! छे छे, हे काही चालणार नाही! यावर उपाय म्हणजे चिनी मातीची आणि काचेची भांडी बनविणे बंदच केले पाहिजे. नुसते सुंदर दिसून काय उपयोग, परफॉर्मन्स ही पाहिजे की नाही? दुसरे म्हणजे आज काल चिनी माती, चिनी गोष्टी वगैरेवर जे विचार व्यक्त होताहेत आहे तेही अंमलात येतील. आणि आपले कामही सेफ होईल.

चिंतन क्रमांक ७

इतकी भांडी दररोज घासायची, इतका साबण खर्च करायचा, इतके पाणी वापरायचे, त्यापेक्षा दुसरे काय करता येईल? बघा, आपले पूर्वज किती विचारवंत होते ते! निसर्गामध्ये राहताना निसर्गाने दिलेल्या वस्तू वापरण्याने निसर्गाचेच रक्षण होते. म्हणजे आम्ही निसर्गाचे रक्षण करणार, निसर्ग आमचे नाही ! म्हणजे असे बघा. निसर्गाने आपल्याला वृक्ष दिले, वृक्षांना पाने दिली. वृक्ष आपली पाने वापरून झाल्यावर काय करतात? टाकून देतात. मग आपण निसर्गाचे, त्यांच्या वृक्षांचे हे दान का नये वापरू? पानांच्या पत्रावळी आणि द्रोण गावाकडच्या लग्नसमारंभात वापरतोच ना? मग इकडे घरी वापरायला काय अडचण आहे? जेवण झाले की पत्रावळी आणि द्रोण टाकून दिले की ते गाय, बैल, गाढवे खातील. त्यांचे शेण होईल, ते पुन्हा खत म्हणून वापरून पुन्हा धान्य, भाज्या तयार होतील. आता स्वयंपाकाला भांडी लागतील ती मातीची

वापरावीत का? पण ताट वाट्या तरी कमी होतील की नाही, सांगा बरं. तुम्ही असं करा, तुमच्या घरात पहिल्यांदा विचारा, मग मला सांगा, मग मी आमच्याकडे विचारतो. काय, कळले का?

चिंतन क्रमांक ८

नाहीतरी आता भांडी घासायचीच आहेत, त्याच्या करता दिवसातले दोन तास बाजूला काढलेच आहेत. वेळ बरा जातो आहे. काम काही फारसे दमवणारे नाही. तर आता त्यालाच वाहून घ्यावे. नाहीतरी ऑफिसात मेंटल भांडी घासत होतोच ना? त्यावेळी असे विचार मनात आले नाहीत कारण पगार घरी आणल्यावर बायको खूष होत होती ना. मग आता भांडीवालीचा पगार वाचत नाही का? मग बायको मनात खूषच असेल, वरून दाखवत नसली तरी.  मग अजून काय पाहिजे?

चिंतन क्रमांक ९

आपले मायबाप सरकार सावकाश पण भक्कम पावले टाकीत चालले आहे. त्याने प्रकट केल्याप्रमाणे कोरोनाचा कालावधी मारुतीच्या शेपटासारखा अनंत आणि अगम्य असणार आहे अशी आता आमची खात्री झाली आहे. लॉक डाऊन जरी गेल्यासारखा वाटलं तरी तो वायूमंडळा सारखा अदृश्य पण अविरत असणार आहे. मुळे आता सूर्य लाल तारा होऊन पृथ्वीला गिळंकृत

a

करी पर्यंत मास्क, हात धुणे आणि आपले भांडी घासणे वगैरे आपले हे काम म्हणून कायम राहणार आहे.

चिंतन क्रमांक १०

चिंतन क्रमांक ९ मध्ये म्हटल्या प्रमाणे जर आपले भांडी घासणे सूर्य लाल तारा होऊन पृथ्वीला गिळंकृत करीपर्यंत चालणार असेल तर मग आपला तो वालचंद १९७१चा ग्रुपही तेवढाच दीर्घायुषी असणार आहे. मग असे चिंतन करण्याचा आपल्याला खूपवेळा चान्स मिळणार आहे. तर मग हे सगळे चिंतन आत्ताच  का करावे, पुन्हा पुन्हा करू की !

सगळेच चिंतन एकाचवेळी करण्याचे आपल्याला बंधन थोडेच आहे?

आज करे सो कल कर,
कल करे सो परसो।
इतनी जल्दी क्या हैं प्यारे,
जब जीना है बरसो !

तर मग आजच्या चिंतनाला आणि आजच्या भांडी घासण्याला आता कमर्शियल ब्रेक!!

# चंद्राच्या सावलीत

आमच्या घराच्या भिंतीवर भारताचा एक नकाशा टांगलेला होता. त्याच्यावर तीन समांतर रेषा काढलेल्या होत्या. जिथे मधली रेषा यमुना नदीला मिळत होती तिथे एक फुली मारलेली होती. हीच ती २४ऑक्टोबर १९९५ ची भेटीची जागा. काल्पी. उत्तर प्रदेशांत. चंद्राची सावली माझ्यावर पडू देण्यासाठी.

२४ ऑक्टोबर १९९५ला एक खग्रास सूर्यग्रहण होणार होते. इथे भारतांत. यमुनेकिनारी. देशाच्या एक मोठ्या पट्ट्यांत. सकाळच्या ८ वाजण्याच्या सुरेख वेळी. स्वच्छ आकाश असणाऱ्या दिवशी. ही संधी सोडण्यासारखी नव्हती. हां, १६ फेब्रुवारी १९८० रोजी अशीच एक संधी येऊन गेली होती. कर्नाटकातल्या हुबळीला. इथेही जाणे सहज शक्य होते. पण मी ही संधी सोडून टीव्हीवर "गुड्डी" सिनेमा पाहत बसलो होतो. पण त्यादिवशी ग्रहणाचे जे रूप पाहिले होते, तो राखाडीपणा, त्या दुहेरी सावल्या, ते भीतीदायक वातावरण, आणि ते सुनसान झालेले रस्ते खग्रास सूर्यग्रहणाची अनोखी झलक दाखवून गेले होते. खग्रास ग्रहणाच्या जागी न जाताच जे विलक्षण अनुभव आले होते ते वेगळेच होते.

यावेळी मी ही संधी सोडणारच नव्हतो. बायको मुलांना विचारले येता का म्हणून. पण रेल्वे, बसचे रिझर्वेशन वगैरे मिळणार नाही, जसे मिळेल तसे जायला लागेल, कुठंही रहायला लागेल असे क्लियर करून. तसे रिझर्वेशन मिळवायचा थोडा प्रयत्न केला. पण मुंबईहून एक दमांत एवढी दूर कोणतीही बस जात नाही आणि टॅक्सीही. रेल्वेचे रिझर्वेशन मिळायचा तर प्रश्नच नव्हता. बायकोने नकार दिला मग मुलांनीही. मग आपले आपणच जाणे.

सावकाश आरामांत जाण्याचा पर्याय होता. पॅसेंजरच्या स्पीडने. मग तो निवडला. २१ ऑक्टोबर १९९५ ला, ग्रहणाच्या आधी चांगले ४ दिवस ठेवून, पहाटे ४ वाजता घरातून निघून ५ वाजताची मुंबई भुसावळ पॅसेंजर धरली.

पटापट कुठेही जाण्याची सवय असलेल्या आम्ही पॅसेंजरच्या वेगाने आरामांत, देश बघत बघत, बरोबरच्या लोकांशी बोलत बोलत जाण्याचा अनुभव घेतला पाहिजे. त्यांत एक वेगळीच गोडी आहे.

अगदी आरामांत सावकाश आमची पॅसेंजर रात्री ११३० वाजता भुसावळला पोचली. मस्त प्रवास झाला. प्लॅटफॉर्मवर उतरून थोडे खाणेपिणे केले. रेल्वेच्या प्लेटफॉर्मची जरा मजा लुटली. आता पुढे काय? पुढची पॅसेंजर कधी मिळणार आणि ती कुठेपर्यंत जाणार याची चौकशी करी पर्यंत तास दीड तास गेला.

रात्री दोनच्या सुमारास पुण्याहून जम्मूला जाणारी झेलम एक्सप्रेस आली. आता ही गाडी धरायची का सोडायची हा विचार करायलाही वेळ नव्हता. तो जनरल डबा पार दुसऱ्या टोकाला होता. मधले सगळे डबे दारे घट्ट लावून झोपले होते. मग घाईघाईने इंजिना जवळच्या त्या डब्यापर्यंत जाऊन दारातून कसेबसे स्वतःला ढकलून घेतले. आता अश्या स्थितीत आपल्या कपड्याकडे सामानाकडे कसे लक्ष ठेवणार? इकडे डब्यांत कसेतरी शिरायचेही वांधे होते.

काही क्षणातच गाडी सुटली. माझ्या जवळ उभ्या एकाने विचारले की गाडी अकोल्याला कधी पोहोचेल. मी त्याच्याकडे पाहून थोडेसे तुच्छतेनेच म्हटले की गाडी तिथे जात नाही. लगेच त्याने डब्याचा दरवाजा उघडला, तो बाहेर लटकला आणि त्याने अजून स्पीड घेत असलेल्या गाडीतून बाहेर उडी टाकली. थोड्या वेळाने मला त्याच्या त्या घाईचे कारण समजले. माझे पैशाचे पाकीट नाहीसे झाले होते. हे पाकिटमार कसले कलावंत असतात, केवढे कसलेले असतात! त्याने मला प्लॅटफॉर्म वर ढकलून मला चिडवून मला साफ केले होते. त्यांत त्याला आपल्या जिवाचीही चिंता नव्हती!

आता, पैसे नाहीत, ओळखपत्र काहीही नाही, ड्राइविंग लायसेन्स गायब, राखीव ५०० रुपयांची नोट गेली, खिसा रिकामा, गाडी पूर्ण वेगात, जवळचे पुढचे स्टेशन दोन तासांनी येणार. पुन्हा खिसे चाचपले. रेल्वे तिकीट दुसऱ्या

खिशात होते. म्हणजे विदाऊट तिकीट तरी नव्हतो. गांगरण्यात आणि ओरडण्यात काही अर्थ नव्हता.सगळे चोर कधीच नाहीसे झाले होते. खिडकीतून थोडासा गार वारा डोक्याला लागल्यावर आपल्या बायकोने आपल्याला कसे वाचविले आहे ते ध्यानांत येऊ लागले. तिने मला जास्तीचे पैसे आतल्या पँटच्या खिशात ठेऊन त्याला सेफ्टी पिन लावायला लावली होती. आतल्या अर्धचड्डीच्या दोन खिशात सेफ्टी पिन ने बंद केलेले दोन हजार रुपये सुरक्षित होते. बायकोने वाचविले मला! पण बाहेरच्या खिशांत एक रुपयाही नव्हता, नाही म्हणायला मागच्या खिशात काही नाणी होती एक दोन चहापुरती.

झाशी येईपर्यंत कसातरी वेळ काढला, उभ्यानेच. जागाच नव्हती टेकायला. संध्याकाळी ५ वाजता झाशीला उतरलो आणि माझे पैसे घालवलेल्या त्या गाडीला बायबाय केले. गाडी गेल्यावर आणि थोडेसे सामसूम झाल्यावर आतल्या पँटच्या खिशातून थोडेसे शे दोनशे रुपये काढले आणि पुन्हा आपला खिसा सील केला. एखादा वडा डोसा खाऊन चहा पाणी केल्यावर जर बरे वाटले. मग स्टेशनातून बाहेर आलो.

स्टेशनपासून जवळच एक पोलीस स्टेशन होते. तिथे गेलो. तिथे एक इन्स्पेक्टर झाडाखाली आरामखुर्चीवर बसला होता आणि आत एक हवालदार कागद मांडत बसला होता. त्याच्याकडे जाऊन माझी हकीकत त्याला सांगितली

a

आणि पाकीट गेल्याचे सांगितले. त्याने सांगितले की पाकीट हरवले अशी तक्रार लिहा. मी त्याला सांगितले की हरवले नाही चोरीला गेले आहे, तर त्याने माझ्याकडे असे काही बघितले की बस. "पाकीट हरवले ते सिद्ध करा. कुठे आणि कसे हरवले, कुठल्या पोलिस हद्दीत? सिद्ध करा!" असे काय सिद्ध करता येते काय? गुपचूप पाकीट हरवल्याची तक्रार लिहिली, दुसरे लायसेन्स मिळायला ती पाहिजे होती ना.

आता काल्पी ला कसे जायचे? तो बाहेर बसलेला इन्स्पेक्टर किती मृदुभाषी होता! त्याने मला बस स्टेशनचा रस्ता दाखविला. ओरई पर्यंत बस होती, तिथून मग काल्पीची बस मिळाली असती. मग ओराईच्या बसमध्ये. रात्री दहाच्या सुमारास ती बस ओराईला पोहीचली. बस स्टँड सुनसान होता. आता इथून काल्पीची बस जरी मिळाली असती तरी रात्री, विचित्र वेळेला, अनोळखी ठिकाणी कोणी ओळखीचे तिथे नसतांना जाणे म्हणजे शुद्ध वेडेपणा झाला असता. मग इथेच मुक्काम ठोका असे ठरविले. अंग टाकायला एखादे ठिकाण शोधणे फारसे अवघड नव्हते. जे पहिले गेस्ट हाऊस दिसले तिथे बॅग टाकली. पहिल्यांदा मुंबईला फोन केला. सगळी रडकथा सांगितली पण मी आणि पैसे सुरक्षित असल्याचेही ठासून सांगितले. मग चांगल्या तिखट मसालेदार जेवणानंतर लाकडाच्या ओंडक्यासारखी झोप लागली, दोन दिवस आणि दीड रात्री जागरण झाल्यावर.

a

सकाळी सहा वाजता त्या गेस्ट हाऊस मालकांच्या मुलाने मला उठविले. वीस तीस मिनिटांत काहीही गडबड घाई ना होता मी काल्पीच्या बसमध्ये होतो. चार तासांत काल्पीला बस पोहोचली. बस स्टॉप च्या समोरच एक बॅनर दिसला "Welcome to Solar Eclipse Camp, DST". सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीने तिथे कॅम्प आयोजित केला होता. तिथे त्यांचे आणि सोलर ऑबझरवेटरीचे शास्त्रज्ञ त्यांची साधने लावून सूर्याची background निरीक्षणे घेत होते.

मी त्यांच्या कॅम्प च्या ऑफिसमध्ये गेलो. "ओहो, कुठून आलात, कसे आलात, टाटा मध्ये काम करता का? हो, इथे नक्कीच राहू शकता की!" याहून चांगले स्वागत आपले कसे होऊ शकेल. जीव प्रसन्न झाला आपला. लोकांसमोर एक भाषण देता का? विचारणा झाली. आवारातल्या मांडवात जवळपासचे शंभरेक लोक आले होते. त्यांच्यापुढे मी हिंदीतून भाषण केले. एकंदरीत ग्रहणे आणि हे खास उद्याचे ग्रहण यावर भाषण आणि मग प्रश्नोत्तरे झाली. ही कॅम्पची जागा म्हणजे इथली शाळा होती आणि इथल्या तरुण शिक्षकांना, मुलेच होती ती, ग्रहणे, ज्योतिर्विज्ञान आणि आकाश दर्शन यात बराच रस होता असे दिसले.

मग त्या मुलांबरोबर काल्पी गावात हिंडलो. छोटेसे गाव आहे. इतिहासांत प्रसिद्ध. झाशीची राणी लक्ष्मीबाई जेंव्हा कंपनीच्या सैनिकांबरोबर लढत होती

तेंव्हा हरू लागली होती आणि दूर जायचा प्रयत्न करीत होती तेंव्हा झाशीच्या किल्ल्यातून ती तटावरून घोडा फेकून निसटली होती आणि त्यामानाने सुरक्षित लखनौकडे जात होती. पण सैनिक तिचा पाठलाग करीत असताना तिचा घोडा नदीला अडला होता आणि ती इथे शहीद झाली होती.

माझ्या बरोबरच्या मुलांनी मला घाटावर, त्या किल्ल्यावर त्या नदीकाठी नेले. आजही ती यमुना नदी पार करायला कठीण दिसते. तेंव्हा राणी लक्ष्मीबाई, दमलेली, जखमी झालेली होती आणि जेंव्हा तिचा घोडा नदीत जाईना तेंव्हा तिला काय वाटले असेल असा विचार आला तरी माझे मन थरकून गेले.

हे सर्व वातावरण अनुभवताना मी त्या मुलांना आकाशविज्ञान आणि आकाश दर्शनाची माहिती देतच होतो. त्यांना बराच रस आहे असे जाणवले पण काहीतरी आणि कोणीतरी त्यांच्यावर दबाव टाकते आहे असे वाटत होते. कॅम्प मध्ये परत आल्यावर काही वयस्कर मंडळी कॅम्प च्या ऑफिसरशी बोलत होती. हा तुमचा कॅम्प दुसरीकडे घेऊन जा असा त्यांचा आग्रह चालला होता. मग थोडा वेळ त्यांना त्या ऑफिसरने "समजावल्यावर" आणि नंतर सरकारी खाक्या दाखविल्यावर ती मंडळी तिथून निघून गेली.

रात्रीच्या जेवणानंतर मी त्या मुलांना घेऊन जवळच्या एका मोकळ्या शेतांत गेलो आणि तिथे त्यांना आकाश दर्शनाचा थोडा अनुभव दिला. जायच्या

पूर्वी एका साथीदाराला सांगून ठेवले होते की मी जर बारा वाजेपर्यंत परत आलो नाही तर कॅम्प ऑफिसरला कळवायचे. पण सर्व ठीक झाले.

दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचलाच जाग आली. काही लगबग असेल तर आपले आतले घड्याळ आपल्याला आपोआपच उठविते, गजराची गरजच पडत नाही. थंडगार पाण्याने अंघोळ आणि गरम गरम चहा. कॅम्पमध्ये विचारले की ग्रहणाची सेंटर लाईन कुठे आहे तर कळले की नदीच्या किनारीच.

बॅग भरली आणि नदीच्या त्या घाटावर पोहोचलो. छान लांबरुंद घाट होता आणि जवळच एक मंदिर होते. घाटावरून नदीवरचे दोन पूल दिसत होते. एक तर रस्त्याचा पूल होता मग तो दुसरा कसला? रेल्वेचा की काय? कुठे जाणारी रेल्वे? बघू नंतर.

सूर्य उगवून वर येऊ लागला होता. मंदिरांत बरेच लोक जमले होते. दहा मिनिटांत मंदिराचे दार बंद झाले आणि भजनाची एक धून ऐकू येऊ लागली. पुढचे पाच तास मंदिराचे दार बंद होते आणि ते लोक बाहेर आले नाहीत. खग्रास ग्रहण त्यांच्या दारी आले होते, जन्मात पुन्हा ही संधी येणार नव्हती पण त्या लोकांनी स्वतःला मंदिरांत बंद करून घेतले होते आणि ते धून म्हणत बसले होते!

a

सूर्य जरा वर आला होता आणि आकाश स्वच्छ होते. असाधारण अनुभव येणार होता. तिथे एक बस येऊन उभी राहिली आणि मुलांचा एक घोळका त्यांच्या शिक्षकांबरोबर बाहेर आला. मुलांनी पटापट ओळीने जागा घेतल्या आणि त्यांची मजा मजा सुरू झाली. "सर सर, याला सूर्याचा इक्वेटर दिसला पहा. अरे बावळटा इक्वेटर नाही ती पॉवर लाईन आहे!" त्यांचे शिक्षकही मनापासून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत होते.

चंद्र हळूहळू सूर्यबिंबावर येत होते. आमची उत्सुकता आणि गडबड पाहण्यासारखी झाली होती. जसजसा चंद्र सूर्यावर येत होता तसतसे आकाश काळवंडू लागले होते, पण दिशा आणि क्षितिज मात्र प्रकाशमान दिसत होते. पूर्ण ग्रहणाच्या वेळेस एक व्हिडिओ काढणारा कॅमेरामन आणि त्याचा असिस्टंट असे दोघेजण तिथे आले होते. त्या शाळकरी मुलांच्या तिथे जाऊन नंतर ते मी जिकडे बसलो, म्हणजे उभा होतो, तिथे आले. ग्रहण पूर्ण होताहोता आकाश संध्याकाळसारखे काळवडले होते आणि आकाशांत शुक्र आणि बुध ग्रह दिसत होते. एरवी सूर्या जवळ असून न दिसणारे.

चंद्राची सावली माझ्या अंगावर पडली होती. अश्यावेळी काय पाहावे आणि काय सोडावे असा संभ्रम होतोच. ग्रह, बेलीचे बीड, राखाडी आकाशातला काळा सूर्य की पक्षी आणि पाकोळ्या?

a

खग्रास अवस्था आल्यावर सगळेजण चिडीचूप झाले. तो राखाडी अंधार, तो काळा सूर्य, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. ती भावना एवढी वेगळी आहे की तिचे वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. हा अनुभव साठवूनही ठेवता येत नाही आणि विसरताही येत नाही. ते नव्वद सेकंद माझ्या मनांत कोरले गेले आहेत. कुठल्याही फोटो आणि व्हिडिओमध्ये हा अनुभव व्यक्त होत नाही. ते स्वच्छ आकाश, त्यातला तो काळा सूर्य, ते दिवसा दिसलेले ग्रह, एक निसर्गच असे करू शकतो आपण नाही. मी त्यांचे वर्णन करूच शकत नाही आणि विसरूही शकत नाही. मी हे नव्वद सेकंद या पृथ्वीवर नव्हतोच.

ग्रहण मध्याच्या सुमारास हवा एकदम थंड झाली. तो घाट, माझी बॅग आणि माझी जीन सुद्धा दवाने भिजून गेली. मग जेंव्हा बेलीचे बीड पुन्हा दिसायला लागले तेंव्हा सगळया लोकांच्या तोंडून "आहा" असा उच्चार बाहेर पडला. त्याच वेळी दोन तोफांचे आवाज वाटावेत असे आवाज घुमले. ती दोन मिग२५ विमाने होती आणि ग्रहणाच्या सावलीचा पाठलाग करत होती!

तो कॅमेरामन अजून शूटिंग करत होता. त्याला विचारले ग्रहणाचे शूटिंग केलेस का तर म्हणाला तुमचे केले म्हणून. मी अगदी विचित्र दिसलो असलो पाहिजे त्या शूटिंग मध्ये. त्याने सांगितले की तो लखनौच्या दूरदर्शनचा होता आणि दुपारच्या  बातम्यांत हे शूटिंग दाखविणार होते म्हणून. बघा, नकळत मी टीव्ही स्टार झालो.

सूर्य पुनः दिसू लागल्याबरोबर ती मुले आणि त्यांचे शिक्षक बस मध्ये बसले आणि ती बस निघून गेली. त्यांना संध्याकाळ पर्यंत घरी पोहोचायचे असेल ना. बघा, वाढत्या ग्रहणात जो इंटरेस्ट असतो तो उतरत्यांत नसतो. पूर्ण ग्रहण झाल्याबरोबर त्यांतला रस संपतो. पंधरा मिनिटांत तो घाट पूर्ण रिकामा झाला. फक्त ते मंदिरातले भजन सुरू होते. ते ग्रहण संपेपर्यंत चालणार होते.

मी कॅम्पकडे परत आलो. आता परत कसे जायचे? "अहो, रेल्वेने जा ना. रेल्वे? मुंबईपर्यंत? अरे हां, खरेच की! काल्पी हे स्टेशन लखनौ मुंबई मार्गावर येते". लक्षांतच नव्हते आले. किती छान, मुंबई पर्यंत रेल्वे! स्टेशन कॅम्प पासून थोड्या अंतरावर होते.

स्टेशनवर पोहोचलो. छान शांत स्टेशन, काही घाई गडबड नाही मुंबईतल्या स्टेशन सारखी. झाशीला जाणारी गाडी ३० मिनिटांत येणार होती.

"बॉम्बे व्हिटी का एक टिकट दिजीए।"

"अभी थोडा रुकिये, गाडी पहले स्टेशन से निकलनेके बाद मिलेगा।"

"टिकट का रूल है जी।"

काढलेले तिकीट २४ तास चालते. पण रेल्वे ३० तास घेते. म्हणून तिकीट टाइम बार होऊ नये म्हणून हा नियम! रेल्वेचे कायदे आणि नियम. थोड्या वेळात

a

गाडी आली. रिकामी. बसा, झोपा, आडवे व्हा, जागाच जागा! परतीचा प्रवास सुरु झाला.

गाडीत एक जोडपे होते. ग्रहण बघायला आले होते. झाशीला चालले होते. त्यांतली मुलगी पूर्वी ओराईला शिकायला होती. गाडीतून ओराईतल्या गोष्टी पाहून आठवणींनी अगदी भारावून गेली होती.

बघा म्हणजे आपल्या अगदी आवडीच्या ठिकाणी परत काही वर्षांनी गेलो तर कसे वाटते!

परतीचा प्रवास अगदी सुखाचा आणि सामान्य झाला. जातानाच्या अगदी विरुद्ध. झाशीला पोहोचल्यावर TTE कडून एक बर्थ मिळवला होता. तसे खूप बर्थ रिकामे होते पण जेव्हा आपल्याला बर्थ पाहिजे तेंव्हा TTE ला "मस्का" लावल्याखेरीज कसा मिळणार?

परतीचा प्रवास झोपून केला, डोळ्यासमोर येणारी ग्रहणाची दृश्ये आठवत. आणि थकल्या भागल्या अंगाला आराम देत. २५ ऑक्टोबर १९९५ ला पाच दिवसांच्या रोमांचक भटकंती नंतर घरी पोहोचलो.

एक विलोभनीय सफर आणि एक विलोभनीय अनुभव. जन्मांत एखादाच.

# मी देवीचा वाघ आणि तो कॉर्बेट

मी वाघ आहे. देवीचा भक्त आहे. देवीचा माझ्यावर वरदहस्त आहे. मी देवीची पूजा करतो आणि देवी माझा सांभाळ करते. देविधुराच्या रानात माझे घर आहे. देवीने माझ्या करता हरणे सांबरांची व्यवस्था करून ठेवली आहे. देवीने मला हाच आहार नेमून दिला आहे. मी सुखाने तिथे राहतो आणि शांतपणे माझे जीवन जगतो.

एकदा एक गोरा शिकारी तिथे आला. जिम कॉर्बेट त्याचे नाव होते म्हणे. का आला, कशासाठी ते त्यालाच माहिती. का कुणास ठाऊक. मला एकाएकी त्यादिवशी गाय खावीशी वाटू लागली. सकाळी रानात फिरता फिरता एक कळप मला दिसला. एक छानशी गाय मी निवडली आणि माझ्या नेहमीच्या पद्धतीने मारली. बाकीची गाई गुरे तिथून पळून गेली. मारलेली गाय चांगली जड होती. मी ओढून न्यायचा प्रयत्न केला पण ती काही हलेना. मग थोडेसे मांस तिथेच खाऊन मी पाणी प्यायला आमच्या झऱ्याकडे गेलो आणि तिथेच जर लवंडलो. मस्त डोळा लागला तिथे.

उठून बघतो तर संध्याकाळ झाली होती. चला आपली गाय अजून खाऊन येऊ म्हणून निघालो. गाय अगदीच उघड्यावर सोडून यायला लागली होती.

a

जरा काळजी घेऊनच जायला हवे. त्या हलकट शेतकऱ्याने काही तरी वांधे करून ठेवले नसले म्हणजे मिळवली. नेहमीच्या काळजीने गाईभोवती दुरूनच दोन चार चकरा मारल्या. गाईची कातडी दिसत नव्हती, सगळे लाल मांस च दिसत होते, पण बाकी सगळे ठीक ठाक वाटत होते. कातडी कुठे गेली? काही वांधा आहे की काय? लांबूनच नजर ठेवू जरा. थोडा वेळ लांबून पाहिले. सर्व सामसूम दिसत होते. जवळ जाऊन पहातो तर काय. त्या घाणेरड्या गिधाडांनी गाय शोधली होती. तिचा अगदी फन्ना उडविला होता. काय हलकट प्राणी आहेत ते. आणि केवढी घाण करून ठेवली होती तिथे. डोक्यांत सणक गेली माझ्या. काही म्हणजे काही सोडले नव्हते माझ्यासाठी.

"छे, वाया गेले आपले श्रम. चला आता इथून." निघालो आणि ओढ्यांत शिरलो. तिथूनच एक शेवटची नजर टाकली त्या गाईवर. ज्या झाडाखाली उभा होतो त्याच्या फांदीवरून एक "क्लिक" असा आवाज आला. "पळ पळ पहिल्यांदा, धोका धोका!" झपाट्याने उडी मारून ओढ्याचा दुसरा किनारा गाठला आणि जर दूर जाऊन वळून पाहिले. समोरच्या झोपडीत एक दिवा लागला होता. हळू हळू तो दिवा त्या झाडाकडे आला. झाडावरून एक माणसाने एक वस्तू त्या दिवा आणलेल्या माणसाकडे दिली. तो झाडावरचा माणूस उतरला खाली आणि गेले सगळे जण निघून तिथून.

a

पण माझे काय? पोटांत अशी भूक लागली होती की काय करू आणि काय नाही! आता पुन्हा गायच मारणार मी. डोंगर चढून पलीकडल्या दरीत गेलो. पलीकडल्या डोंगरावर गाईंचा आवाज येत होता. हळूच आवाज न करता दबकत पुढे जाऊ लागलो. सकाळ होत आली होती. एक लाल रंगाची चांगली लठ्ठ गाय दिसली दबकत दबकत पुढे जाऊन दबा धरून बसलो. गाय चरत चरत जवळ येत होती. अगदी टप्प्यांत आल्यावर एकच झडप घातली आणि तिला खाली पाडली. पटकन तिची मानगूट जबड्यांत धरली आणि जबडा आवळला आणि तिची मानच मोडली. ही पण चांगली जड होती. कुठे न्यावे तिला म्हणजे शांतपणे खाता येईल? हां, त्या डोंगरावरच्या कपारीत न्यावी

इकडे सारखी ती गिधाडे येतात. घाणेरडी! मग मानगुटीला धरून उचलली ती गाय आणि ओढत ओढत घळीतून डोंगरावर घेऊन गेलो. वर एक छान जागा होती. पावसाच्या पाण्याने चांगली एक गुहा झाली होती आणि जिकडे तिकडे छोटी छोटी झाडे उगवली होती. एकदाची आणली माझी ती गाय आणि ठेवली एक झुडपा खाली. असली तहान लागली होती की विचारू नका. मग पुन्हा डोंगर उतरून खालच्या झऱ्यापाशी गेलो. पहिल्यांदा मस्तपैकी तहान भागवली. जर तिथे लोळलो. जर डोळे मिटले. खाऊ की नंतर आरामांत!

थोडा वेळ मस्त आराम केल्यानंतर पोटोबा गुरगुरायला लागला. वाघ सुद्धा पोटोबाच्या गुरगुरण्याला भितो म्हटले! मग डोंगर चढून गाईपाशी गेलो. जर

a

ज्यास्त काळजी घ्यायला पाहिजे. मागचा तो "क्लिक" आवाज कसा नाही कळला आपल्याला अगोदर? देवीनेच वाचविले म्हणून! गाईजवळ येऊन आजूबाजूला नजर टाकली. सगळे जसेच्यातसे दिसत होते. आजूबाजूच्या झाडांवर नजर टाकली. सगळे ठीकठाक आणि सुरक्षित दिसत होते.

तरीही जरा वेळ सावल्या लांब होईपर्यंत थांबलो आणि मग गाईपाशी गेलो. गाय चाटून साफ केली, तिची शेपटी आणि पोटातली आतडी बाहेर काढून टाकली. मला शेपटी आणि आतडी  आणि त्यांतली ती घाण नाही आवडत. चला आता पोटभर खाणे. खाण्यांत पूर्ण गुंतून गेलो होतो तेवढ्यांत एक विचित्र किंकाळी ऐकू आली आणि काहीतरी धप्पकन पडले शेजारी. अस्वल! कुठून आले हे? दिसले नाही की ऐकू आले नाही! काय माझा गाफीलपणा!

"याला माझी गाय पाहिजे? माझी गाय? कधी मिळेल का त्याला?" मी त्याच्यावर झडप घातली आणि चांगले बोचकारले. विसरणार नाही कधी ते!

चांगला रक्तबंबाळ केले त्याला. रागाने आणि दुखण्याने किंकाळत होते नुसते. मग म्हटले आता बास आणि वळून घळी पलिकडे  बांबूच्या बनांत उडी मारली. उडी मारतांनाच एक काडकन आवाज आला आणि माझ्या शेपटीला चाटून काहीतरी गेले. माझ्या देवीने मला पुन्हा वाचवले. बांबूच्या बनातून थोडा पुढे जाऊन मी वळून पाहिले. ते मूर्ख अस्वल अजून माझा पाठलाग करीत होते.

a

पण त्याला कुठे उडी मारता येते? ते आपले धावत माझ्या मागे येत होते. तेवढ्यात पुन्हा एकदा काडकन आवाज झाला आणि ते अस्वल गप्प झाले. काय बरे झाले त्याला?

मी मागे वळून आलो. माझी गाय होती ती आणि मी ती कुणाला देऊन टाकणार नव्हतो. पण ते अस्वल अजून त्या घळींत पडले होते. ते गप्प गार पडले होते, पण त्याच्यावर नजर ठेवलेलीच बरी. पुन्हा बाजूने हल्ला केला तर? "जाऊदे ती गाय आता. हे ही ठिकाण धोक्याचेच आहे, चला आता इथून." असे म्हणून मी तिथून निघालोच होतो. तेवढ्यांत माझ्या नाका समोरच्या दगडावर काहीतरी सण्णकन् आपटले आणि दगडाच्या ठिकऱ्या तोंडावर आपटल्या. सुन्न होऊन मी खालीच पडलो पण पटकन उठून पळून सुरक्षित जागी पोहोचलो. "हे काय आता? तो शिकारी पुन्हा माझ्यामागे लागला की काय? का? माझे आई देवी आता माझे काय चुकले?" देवी फक्त हसली माझ्याकडे पाहून. "हो बरोबर, वाचविलेस तू मला पुन्हा एकदा. मी तुझा भक्त आहे. कृपादृष्टी असू दे माझ्यावर."

"अजून एक प्रयत्न वाया गेला. त्या गोऱ्या शिकाऱ्याला काय हवे आहे? मी काय भुकेने मरायचे आहे का? ते काही नाही. मी गायच खाणार आता. त्याला कळू दे कोण राजा आहे इथे ते!"

a

"चला परत शिकार शोधू. दोन गाई मारूनही पोट काही भरता आले नाही. त्या लाल गाई कडे जावे का पुन्हा? नको नको, जाऊ दे ती."

"अजून एक प्रयत्न करू, अजून एक गायच मारू." मग मी चांगला चार पाच डोंगर पार करून गेलो आणि एक झकास बैल मिळाला. यावेळी मात्र मी तो सगळाच्या सगळा खाणार. माझी देवी किती कृपावंत आहे! मला मनासारखे गाई बैल मिळवून देते. मी याला संध्याकाळी खाईन म्हणून, तो पर्यंत त्याला पाने फांद्यांखाली झाकून ठेवला. ती घाणेरडी गिधाडे आणि ती किळसवाणी अस्वले शोधू शकणार नाहीत. बैल झाकल्यावर जर थोडा दूर लोळायला गेलो. वामकुक्षी!

काय निवांत जागा होती, जेवण तयार, मंद मंद गार वारा! अचानक एक माणसाचा आवाज आला, "देखो साहिब, भालू भालू." ताडकन उठलो तिथून निघून जायला. "ठाक" असा आवाज येऊन काहीतरी वस्तू डावीकडे शेजारच्या झाडाला आपटली, पाठोपाठ काडकन आवाज आला. "हे माझ्या देवी माते, पुन्हा एकदा वाचविलेस मला. हा मारेकरी इतका माझ्या मागे इतका का लागला आहे? मी तीन दिवसांचा भुकेला आहे, ती घाणेरडी अस्वले माझे खाणे चोरताहेत. आता मला हे अगदी सहन होत नाही."

a

लांब लांब दूरवर चालत गेलो. किती तरी डोंगर दऱ्या ओलांडल्या. मग एक पांढरी जाडजूड गाय सापडली. मला पांढऱ्या गायी आणि बैल आवडत नाहीत. कोण जाणे का पण ते धोकेबाज वाटतात. मला ते कमनशिबी करतात असे वाटते. पण आता उपाय काय, मारलेच पाहिजेत, पोटाचा प्रश्न आहे ना! ही गाय चांगलीच शूरवीर होती, बैला सारखी झगडत होती. शेवटी एकदाची तिला पाडली. "आता हिला अशा जागी घेऊन जाईन की तिथे कोणीही मला सतावायला येणार नाही. हिला मारताना इतका दमून गेलो तरीही तिला मानगुटीला धरून उचलली आणि जवळच्या झाडीदार घळीतून वर घेऊन गेलो. ओढता ओढता जीव मेटाकुटीला आला पण थांबलो नाही. एका ठिकाणी तिचा पाय दोन झाडांत अडकला. निघता निघेना, मग एकच हिसका असा दिला की तिचा पायच तुटून गेला. जाऊ दे तो पाय, गाय तर सुटली ना.

डोंगराच्या माथ्यावर एक छानसा उंचवटा होता. तिथे गाय टाकली. पाणी, पाणी. पाणी पाहिजे आता. इकडे बरेच झरे आहेत, जवळपासच पाणी मिळते इथे. डोंगर उतरुन गेलो, मस्त पाणी प्यालो आणि जरा पाण्यांत खेळलो. माझे डोळे मिटले मग, छान झापड आली. एकदम कशाने तरी जाग आली, "धोका, धोका", देवी कानांत म्हणाली. मी तिचे नेहमीच ऐकतो. मागे वळूनही ना बघता उठलो आणि निघून गेलो तिथून.

a

जेवण्याची वेळ होई पर्यंत रात्र झाली होती. चांदोबा उगवला होता आणि भेकरे आणि सांबरे सारखी ओरडत होती माझ्याकडे पाहून. तिकडे दुर्लक्ष केले. "आता पाहू सर्व ठीक आहे ना ते. आज ती गिधाडे तर नसतील पण अस्वलांचे काय, कदाचित नसतील ती ही. सगळे मांस माझेच आज." सावकाश डोंगर चढून गेलो आणि गाय ठेवली होती त्याच्या उलट्या बाजूला दबकत गेलो. हळूच नजर टाकली. गाय जशी ठेवली होती तशीच होती. "झाडांवर पहा झाडांवर!". नीट पद्धतशीर सगळ्या झाडांचे आणि फांद्यांचे निरीक्षण केले.

"आहा, ते बघा काय आहे ते! तोच तो माणूस बघ. सारखा मला मारायला टपलेला! आणि त्याचा हातात काय आहे ते? काहीतरी विचित्र आहे ते. काठी नाहीये ती शेतकऱ्या सारखी. काहीतरी धोक्याची वस्तू दिसते आहे." मग मी त्या झाडाखाली त्या माणसाच्या थोडा मागे बसलो आणि वर नजर टाकली. कसे कोणास ठाऊक पण त्याला मी आल्याचे कळले वाटते. आमची नजरा नजर झाली.

"चल, पाहिलेस ना मला, आता काय करणार आहेस बघू!"

मी सावध झालो आणि कान पाडले. त्याने काहीच हालचाल केली नाही, मग पुन्हा कान टवकारले मी. त्याच्या हातातली वस्तू माझ्याकडे रोखली नव्हती. मग मी त्याच्याकडे आणि तो माझ्याकडे टक लावून पाहत होतो.

मग हळूच तो वळू लागला आणि त्याच्या हातातली ती वस्तू चांदण्यांत चमकली. "धोका, धोका, पळ पळ." देवी म्हणाली. पटकन मी उडी मारली आणि पळून गेलो.

"याला मी चांगला धडा शिकवीन. जमिनीवर येऊ दे ना त्याला आहे का हिम्मत. झाडात लपून राहतो भित्रा. खाली ये ना मग मी काय करतो ते बघ."

चार दिवस माझ्या मागे आहे हा. चार वेळा मारायचा प्रयत्न केला आहे याने. माझी देवीच मला वाचविते आहे. मी भुकेला आहे, दमलो आहे. माझ्या देवी, मला याच्या बरोबर एक तरी संधी दे ना."

मी जळफळत होतो. "हा जो पर्यंत इथे आहे तो पर्यंत मी गाई गुरेच मारत राहणार!"

मी यावेळी दूर दूर निघून गेलो. अजून एक गाय, पांढरी. "आतातरी तो मारेकरी दूर राहू दे माझ्या पासून. गाय उघड्यावर टाकली आहे. सांभाळली पाहिजे. नाहीतर ते घाणेरडे पक्षी आताच घिरट्या घालताहेत. काही तर समोरच्या फांदीवर उतरले आहेत. गाई कडे बघताहेत हलकट."

जरा डुलकी घेतली. साळुंक्यांच्या कलकलाटाने जाग आली. "आता या का ओरडताहेत?" अचानक त्या साळुंक्या गप्प झाल्या. " का गप्प झाल्या? पहा बरे."

"तो बघा, तो हरामखोर, गाईवरच्या फांदीवर बसला आहे ते. आज मी त्याला धडा शिकवीनच." मी हळूच पुढे सरकलो आणि ती गाय आपल्याकडे ओढली. "आता तो काय करील? गाय त्याच्या माझ्या मध्ये आहे." हळूच गाईची शेपटी तोडली आणि तिची आतडी काढली. "त्या हरामखोरावर नजर ठेव."

"ही पहा, तुझ्यासमोर मी माझी गाय खातो आहे. काय करायचे ते कर. बघतो आहे पहा कसा माझ्याकडे. पण काय करणार आहे. गाईने छपविले आहे मला. बघ, बघ, तो हातातली ती वस्तू इकडे रोखतो आहे. मागे वळ मागे वळ." मग मागे फिरलो आणि झुडपांना एक वळसा घालून त्याच्या झाडामागे गेलो. एक डरकाळी फोडली आणि त्या झाडाच्या सालीच्या नखांनी चिंधड्या उडवू लागलो.

"तो पहा कसा हसतो आहे ते. तो काही त्याची तो वस्तू माझ्यावर रोखू शकत नाही. मी झाडाच्या मागे आहे. झाडाची साल कशी ओरबाडली आहे

a

ती. "ये खाली, डरपोक कुठला! बघतो तुला." तो माणूस हसायचं थांबला आणि हात तोंडावर धरून "कुऊऊईईईई" असा ओरडला.

"काय विचित्र आवाज!" भ्यालोच मी जरा! आणि पळून गेलो तिथून.

दोन दिवस झालेत. आता तो शिकारी गेला वाटते. पाच दिवस माझ्या मागे लागला होता. सुखाने खाऊही देत नव्हता मला. बरं झालं, कटकट गेली."

"माझ्या देवीमाते, मला कितीवेळा वाचविलेस तू! मी तुझा कायमचा भक्त राहीन. आता गाई का मारू? नाही मारणार. तू माझी देवी, मी तुझा वाघ!"

# टू बी ऑर नॉट टू बी

"टू बी ऑर नॉट टू बी?, दॅट इज द क्वेस्चन", हॅम्लेट.
(पहा, शेक्सपियर, महान नाटककार, रा. ऍव्हॉन, इंग्लंड.)

"होणार की नाही होणार? हा प्रश्नच नाही", मी.
(पहा, श्रीरंग कौलगी, महान होऊ घातलेला लेखक आणि "नाटक" कार, रा. मुंबई, इंडिया.)

काय वाटते तुम्हाला?
विराटला मुलगा होईल हा मुलगी?
आपण त्या बाळाचे परफेक्ट नाव काय सूचवुया विराटला? आणि त्या बाळाचे लाडाचे नाव काय ठेवूया?
(पहा, लाडाचे नाव, Nicknames, ले. श्रीरंग कौलगी, रा. मुंबई, इंडिया.)

"विनू" ठेवू!

a

छोटे आहे. छान आहे. आईबाबांनाही शोभते ते! विराट आणि अनुष्का. "वि" "नू". किती फिट आहे! मुलगा असो की मुलगी दोघांनाही चालेल. आणि मोठे झाल्यावरही शोभेल.

प्रत्येक वेळी हे बाळ यशस्वीच होईल. कधी कधी तर डबल यशस्वी होईल.कारण एकाच वेळी रन्स आणि पिक्चर  दोन्ही फेल होतात का कधी? पण रन्स आणि पिक्चर एकाच वेळी हिट मात्र होऊ शकतात.

पण आम्ही त्यांच्या बाळाचे नाव ठेवायची उठाठेव का करतो आहे?

'कोण विचारतंय?"

"चोंबडे कुठले! तुम्हाला काय करायचे आहे? आम्ही आणि ते पाहून घेऊ की! तुम्हाला का त्याची उठाठेव?"

आमचा स्वभाव, दुसरे काय? आम्हाला मोठ्या लोकांशी संबंध असलेले खूप आवडतात. त्यांचे वागणे, बोलणे, हसणे, जेवणे, झोपणे, त्यांचे निरनिराळे "उद्योग", किती आवडते हे सगळे आम्हाला!

a

कोणी म्हणतील की नाकाने कांदे सोलतात बघा. म्हणोत बिचारे, त्यांना नसेल हे जमत.

दुसरे म्हणजे आम्ही उंदरासारखे आहोत. त्याचे दांत सतत वाढत असतात आणि त्याला त्याच्या दातांवर कंट्रोल ठेवण्यासाठी सतत काहीतरी कुरतडावे लागते, नाही तर उंदीर छोटा आणि दांत मोठे असे होईल.

फक्त त्याचे दांत आणि आमचे नाक!

आमचे नाक वाढत गेले तर काय होईल? जरा विचार करा! म्हणून कांदे सोलावेच लागतात आम्हाला. सतत.

कधीतरी आम्हीही मोठे होऊ. मग ते दुसरेही आमच्यांत असाच इंटरेस्ट घेतील. आमची कॉपी करतील. आमच्यावर पेपरांत आणि मीडिया मध्ये चर्चासत्र होतील. It is just a question of time!

कळले ना? कळलेच असेल.

आम्ही अगदी लहान असताना एका महान ट्रेजेडी किंगने एका लहानशा मुलीला आपली मानून तिच्याशी लग्न केले होते.

आमच्या खडकीच्या एनसीसी कॅम्पच्या वेळी बातमी आली होती ही. आमचा कारभारकर दोन दिवस जेवला नव्हता की चहा प्याला नव्हता. साधी चारमिनारही ओढली नाही त्याने दोन दिवस! विल्सचे तर नावच सोडा!

"दुसरा कोणी नसता तरी मी होतो ना! मी सांभाळली असती की तुला", असे पत्रही लिहिले होते त्याने तिला, पण पाठवायचे राहून गेले, कारण अजून अशी खूप पत्रे उजेडांत येऊ लागली लगेच नंतर.

आणि एकाने तर आम्हाला न विचारताच परस्पर धर्म बदलून आमच्या दिलांवर पाय ठेवून त्या स्वप्नसुंदरीला असेच पळवून नेले. तेंव्हाही आम्ही अशीच पत्रे लिहिली होती. पण त्यांचा current पत्ता माहीत नसल्याने तो परत आली.

आणि त्या नबाबाने आपली दुसरी एक सुंदरी घेऊन टाकली तेंव्हा.....

मोठ्या लोकांशी असे गहिरे संबंध असतात आमचे!

आता, एका प्रसिद्ध, मोठ्या (आकाराने) घरातल्या मोठ्या (वयाने) मुलाचे लग्न होत नाही, त्याला तो काय करणार, म्हणून तो बॅचलर आहे ना.

a

(पहा, Engineers Dictionary, ले. श्रीरंग कौलगी, वालचंद, 1971, व्हॉट्सऍप ग्रुप, इंडिया).

मग त्याला मुली बघायला आम्ही मदत केली तर काय बिघडले. नुसत्या सुचवितो आहे ना, लग्न तर करीत नाही ना त्यांच्याशी? अडचणीत सापडलेल्याला मदत करणे आपले कर्तव्यच आहे असे आम्ही समजतो.

म्हणून आमचे मोठ्यांशी (आकाराने नाही) संबंध चांगले असतात.

असे संबंध ठेवल्यामुळे आम्हाला आतल्या बातम्या लौकर समजतात. उदाहरणार्थ, ट्रम्प निवडणूक हरणार ते आम्हाला चार वर्षांपूर्वीच माहीत झाले होते. पण भविष्य सांगण्याचा आमचा उद्योग नसल्यामुळे आणि आम्ही फक्त खात्रीशीर माहितीच देत असल्याने आम्ही ते प्रसिद्ध केले नाही. पण बघा, खरे झाले की नाही ते!

पेपरवाले आणि मीडियावाले स्वतःला इतके शहाणे समजतात त्यांनी कोरोनाचा प्रसार आणि प्रचार इतका होईल हे कसे ओळखले नाही? आम्ही ओळखले. म्हणूनच आम्ही घरांत पहिल्या दिवसापासूनच, अगदी त्या थाळया वाजवायच्या  दिवसापासून, कडेकोट बंदोबस्तात सुरक्षित बसून आहोत.

खरे तर आम्हाला खूप अंदरच्या बातम्या माहीत आहेत, पण समाजात खळबळ होऊ नये म्हणून आम्ही त्या सगळया प्रसिद्ध करीत नाही.

अगदी क्रिकेटर आणि नट्यांच्याही.

म्हणून त्यांना फक्त मदत करण्याचा उदात्त हेतूने आम्ही त्यांच्या बाळा करता छानसे नाव शोधतो आहोत. ते इतके बिझी असतील की त्यांना नाव ठेवण्याची वगैरे आठवणच राहत असेल. आमच्याकडे वेळच वेळ आहे. म्हणून आम्ही तो सत्कारणी लावतो आहोत.

आता आम्ही आपल्या इतर कां. सो. बरोबर मिळून नाव सुचवीत आहोत. म्हणून आता आम्ही "आपण" झालो आहोत.

फक्त हे लक्षांत ठेवा की -

मुलगा = क्रिकेटर
मुलगी = हिरोईन
मुलगी = क्रिकेटर
मुलगा = हिरो

a

आणखी लक्षांत असू दे की आपल्यासारखे अजूनही नाकाने कांदे सोलणारे बरेच असतील. आपला मेल पहिल्यांदा गेला पाहिजे विराटला.

अजून एक. कशावरही "पुरेशी" चर्चा (म्हणजे काथ्याकूट) केल्याखेरीज आपण कुठलीही गोष्ट मान्य करीत नाही. कधीकधी का......., नाही नाही, चर्चा करूनही काहीच निष्पन्न होत नाही. पण तो आपला प्रॉब्लेम नाहीये.

मग अश्या महत्वाच्या विषयांत चर्चेखेरीज आपण डिसीजन कशी घेणार?

मग लगेच नावे सुचवा, चर्चा करू आणि सर्व प्रथम सर्वमान्य (आपल्याला) नाव, सूचवू त्यांना. अगदी लाडाच्या नावासकट.

चला शोधा नाव आता.

होणार की नाही होणार? हा प्रश्नच नाही.
नक्कीच होणार!

# पुढचा जन्म कुणाचा

या जन्मांत मी माणूस झालो. छानपैकी ७२ वर्षे आयुष्य घालवले. इंजिनीयर होऊन दाखविले. इंजिनीयर राहूनही दाखविले. अजूनही दाखवू, पण आता जरा पुढचा विचारही करावा लागेल.

अजून तीन पाच दहा वर्षानंतर आपला आत्मा कशात पाठवायचा याचा सर्व्हे करायला पाहिजे कारण चित्रगुप्ताने दरवाज्यांत विचारले की अजून तुला पाच जन्म त्या पृथ्वीवर काढायचेत तर आता तुला काय करू, आणि आपण नीट सांगितले नाही तर पुन्हा घोटाळा व्हायचा. मागच्या सारखा.

म्हणून अगोदरच कॉन्सेप्ट नोट तयार करून, नीट अभ्यास करून आणि SWOT अनालिसिस करून ठेवावे म्हणतो, म्हणजे मग तिथे दरवाज्यांत तंतरायला नको.

तसा बराच चॉईस आहे. प्राणी, पक्षी, मासे, किडे, अमिबा आणि व्हायरस ही. शिवाय पृथ्वीवर का मंगळावर का शुक्रवार का त्या प्रॉक्झिमा सेंटौरी बी वर हा पण चॉईस आहे.

a

पण बुवाच व्हायचे पुन्हा, बाई नको.

का? आता सगळा एवढा एक्सपिरिअन्स आहे, ॲडजस्ट कसे करायचे, पड कशी खायची, आपली शान ठेऊन चूक कशी कबूल करायची, बायकोच्या नकळत आपल्याला पाहिजे त्या गोष्टी कश्या करायच्या, सगळे माहीत झाले आहे.

बाई झालो तर पुन्हा नव्याने सगळे शिकायला लागेल, चांगला नवरा शोधण्या पासून. नको, बुवाच बरा.

चला आता आपले SWOT ॲनालिसिस करू.

पोपट चालेल का? छान हिरवा रंग, लाल चोच, गळ्याला कंठी, दिसायला गोड. आपल्याला येत नसेल तरी दुसऱ्याने, म्हणजे माणसाने, शिकविलेले आले तरी खूप झाले. त्याच्या खांद्यावर बसून त्याचाच कानात टिवटिव केली तरी तो खूष होतो. त्याच्याच खांद्यावर शी जरी केली तरी आपल्या बोलण्याचेच कौतुक करत तो फिरतो. म्हणजे चालेल, पण पाळीव व्हावे, नाहीतर ती जेवण मिळवण्याची कटकट, घर बांधा, त्याचा मेंटेनन्स करा, सारखे आपले संरक्षण करा ही काळजी. सारखा संशयी स्वभाव, हा मला मारील की तो मला पकडील. चांगले आहे, छानपैकी पाळीव पोपट व्हावे.

मोर झालो तर? तसे ठीक आहे पण पिसारा फुलवून झाला की पाठीमागून कसेतरीच दिसते. आणि त्या चार चार बायकांवर लक्ष ठेवता ठेवता जीव मेटाकुटीला येतो. त्यांत प्रत्येकीच्या नव्या तऱ्हा. हिला असा नाच पाहिजे तर तिला तसा. ही प्रसन्न झाली की ती रुसली. पण विचार करू.

कोंबडा झालो तर? आज आहे तर उद्या नाही. त्या घाणेरड्या ट्रक मध्ये कोंबणार आपल्याला, तहान नाही की भूक नाही. फक्त वाट बघायची. मरायची.

गरुड झालो तर? आजकाल ही माणसे त्या जनावरांना काय खाऊ घालतात कुणास ठाऊक. त्या जनावरांना खाल्ल्यावर आपल्याला लग्नच करावसं वाटत नाही. त्या औषधांचा परिणाम वाटते. आणि ती आपली पहिली शान आता कुठे राहिली आहे? एके काळी विष्णूचे वाहन होतो आपण, आता लोक आपल्याला ओळखूही शकत नाहीत. नकोच ते गरुड होणं.

वाघ झालो तर. मोठ्या जंगलांत आपली आपण शिकार करून राहू. आपल्याला हरणे, सांबरे, गाई आवडतात खायला. पण गाई मारून खाल्ल्यावर ही माणसे आपल्या जीवावर का उठतात ते कळत नाही.

a

सिंह झालो तरी तसेच. एवढ्याश्या त्या गीरच्या जंगलांत राहायचे. सारखे ते ट्रक आणि मोटरसायकल वाले आवाज करून छळतात आपल्याला. नाहीतर त्या आफ्रिकेत जा. एक एक शिकार करायला रक्त आटवा. शिवाय आपल्या भाईबंदांच्या बरोबरच्या मारामाऱ्या तर ठरलेल्याच. जर कुठे नव्या राण्यांबरोबर सेटल होतो आहे तोच आले बघा ते उपटसुंभ, राज्य बळकावायला.

बैल झालो तर? नकोरे बाबा. याच जन्मांत बैलांचे इतके हाल केलेले पाहिले आहेत की जाणूनबुजून बैलाचा जन्म घेणं नकोच.

टोळ होऊया का? जोपर्यंत आहोत तो पर्यंत मजेत राहू, नंतर त्या मूर्ख मुंग्यांच्या घरावर धाड घालू. आपल्या जन्म तरी मजेत जाईल.

मासाच व्हायचे असेल तर शार्क होऊया. मस्त समुद्रात चकरा मारू, दिसेल ते खाऊ. चांगले गुबगुबीत होऊ. कदाचित आपल्याला त्या माणसांच्या पिक्चरमध्येही काम मिळेल. फक्त त्या जपानी लोकांपासून आपण सांभाळून राहिले पाहिजे. ते दुष्ट लोक आपल्याला जाळ्यांत पकडतात आणि मग आपल्या फिन कापून घेऊन टाकून देतात आपल्याला. असे जीवन नकोरे बाबा.

मांजर होऊ या, चांगला गबदूल बोका! भूक लागली की चालला कँटीन मध्ये. आवाज तर कसा, दुसऱ्याला दयाच येईल असा, प्रत्यक्ष त्याला शिव्या

घालत असलो तरी. बरं पुन्हा कुणाला थँक्यू म्हणायचा संबंधच नाही. आपण कुणाला चिकटत नाही किंवा कुणाला आपल्याला चिकटू देत नाही. तुम्ही तुमच्या जागी आणि आम्ही आमच्या. एरवी "कोण तुम्ही" म्हणायला मोकळे.

किंवा झुरळच होऊया. एक तर आपल्याला खूप दिवस इथे राहायला लागणारच नाही, किंवा या माणसांनी ऍटम बॉम्ब उडविले तर ते मरतील, आपण नाही. मग सगळी पृथ्वी आपलीच.

व्हायरस होणे एकप्रकारे चांगले आहे. एक तर आपण मरणारच नाही, दुसरे कुठे ही गेलो तरी आपण ऍडजस्ट होऊन तिथेच राहू शकतो. अगदी मंगळावर आणि शुक्रावरही. आणि आपल्याला काहीच फरक पडणार नाही कोणाच्या आंत आपण आहोत त्याचा.

आता आपली तयारी पक्की झाली. आता चित्रगुप्तासमोर आपली ततपप नाही व्हायची.

पण त्या बाबाने आपले अकाउंट उघडले आणि आपल्या पाप पुण्याचा बॅलन्सशीट पाहिला तर?

नाहीतर म्हणायचा, "जा परत खाली, अजून तुझा बॅलन्स झिरो नाही झाला. क्रेडिट खूपच आहे अजून. इंजिनियर होतास का? पापे कमी करत होतास का? आता जाऊन खूपशी "कृत्ये" करून ये, मग बघू."

हरे राम, का माझा पाप पुण्याचा बॅलन्स इतका क्रेडिट प्लस आहे?

मी इंजिनियर होतो म्हणून की काय, हे असे झाले बघा!

# मला पडणारी स्वप्ने

असे म्हणतात की आपण जेव्हां झोपतो तेव्हां आपला मेंदू जागा होतो आणि जागेपणचे त्याचे काम थांबवून तो कॉम्प्युटरच्या डिस्क क्लीन सारखे काम करतो.

दिवसभरात त्याला खूप फॉरवर्ड्स, खूप स्पॅम येतात त्याला. मग त्याची मेमरी फुल होते आणि तो दमतो. मग मी आडवा होतो, माझे डोळे जड होतात, हात पाय शिथिल होतात आणि बाहेच्या जगाची जाणीव मंद होऊन मी आतल्या जगांत जातो.

पण त्यावेळी माझा मेंदू रीबूट नाही होत. तो चालूच असतो. तो मग मला माझ्या नकळत मी ऐकलेल्या पाहिलेल्या आणि केलेल्या गोष्टी आठवून रंगवून सांगतो. मग मला स्वप्ने पडतात, त्यांत मी न पाहिलेल्या गोष्टी, न ऐकलेल्या गोष्टी, माझे नातेवाईकही एकमेकांत बेमालूम गुंतवून मला माझा मेंदू एक सिनेमा दाखवतो. मला त्या सिनेमांत इतका परफेक्ट गुंतवितो की मी त्यांत एक रोल करतो आणि त्या सिनेमाचा एक भागच बनतो.

पहिले स्वप्न

आमचे १९५३ सालचे अहमदाबादचे घर आहे. मी जेवत बसलो आहे. खिडकी उघडी आहे. एकदम एक वानर तिथे येतो आणि माझ्या हातातली पोळी

हिसकावून घेतो. मी एकदम उठून उभा राहिलो तर वानर माझ्याकडे बघून हसतो. हाताने  मला आपल्याकडे बोलावतो. मी त्या खिडकी जवळ जातो आणि गजातून उंदरा सारखा बाहेर पडतो. माझा मुलगा मला सांगतोय की बाबा तो तुम्हाला त्याची शेपटी लावणार आहे. माझा नातू म्हणतोय की आबा मी पण येतो. मी नातवाला एका हाताने धरून बाहेर येतो तर मी गच्चीवर आलो आहे. मी उडी मारतो आणि हात लांब करतो तर मी उडायला लागलो आहे आणि माझा नातू मला सांगतो आहे की आपण ढगांत जाऊया. नुसते हात हलविले की मी विमानासारखा उडतो आहे. अरे पण नातू कुठे गेला?  तो पहा, तो ही माझ्या शेजारी उडतो आहे. "अरे, इतका उंच उडू नको. आता खाली कसा येशील?" खाली समुद्र आहे. आता उतरायचे कसे? आणि नातवाला पोहता कुठे येते? तो बघा, घराच्या खिडकीतून टाटा करतोय! मी समुद्रावर उतरतो पण पाण्यावरून स्केटिंग करतो आहे. एकदम पाय कशात तरी अडकून मी पडतो आहे.

तेवढ्यांत जाग येते. बेडवर आहे, पंख्याचा घर घर घर घर आवाज होतो आहे. सगळे नॉर्मल आहे.

दुसरे स्वप्न

एका उंच कड्या खाली उभा आहे. कडा म्हणजे सुळका आहे. मी चढत चढत जातो आहे. कपारी मध्ये बूट घुसवून वर वर जातो आहे.

पोचलो एकदाचा वर. सगळ्या बाजूने खोलच खोल दऱ्या आहेत. आता उतरायचे कसे? प्रश्न पडला आहे. धरायला काहीही नाही. खाली नुसते पाहिले तरी तोल जातोयका असे वाटते आहे. तेवढ्यांत बायको आणि आई दिसते मला. एक दोर दिसतो तिथे. "त्या दोराला धरून घसरत जाऊया", मी म्हणतो. आम्ही तिघे दोराला धरून आरामांत घसरत येतो आहे. मी पुढे आणि त्या दोघी माझ्या मागे. समोरच्या डोंगराच्या कपारीत भगव्या रंगाच्या खडकावर जांभळे प्राणी चिकटले आहेत. ते तिघे कसे आले? खाली घसरता घसरता एकदम दोराचे टोक आले हाताशी! आता काय? मी त्यांना म्हणतो आता खाली नाही जाता येणार. चला दोर धरून पुन्हा वर!

जाग येते. उकाड्याने झब्बा भिजला आहे. पंखा बंद झाला आहे. वीज गेलेली दिसतेय.

तिसरे स्वप्न

मी २००५च्या ME ला ऍडमिशन घेतली आहे आणि होस्टेलमध्ये राहतो आहे. बायको मुले मुंबईला घरी आहेत. परीक्षा जवळ आली आहे. सगळे वातावरण वालचंदचेच आहे. पेपर नेहमीसारखेच कडक आहेत. पास होऊ आपण, नक्कीच. आणि शेवटच्या पेपरांत मला काहीच येत नाहीये. हाच पेपर होता ना आज? सगळे ऑब्जेक्टीव्ह प्रश्नच आहेत. कालचा पेपर तर गणिताचा होता. रिझल्ट लगेच लागणार आहे. पास होईन ना? झालो तर मी ME म्हणून

मिरवेन. पण नाही झालो तर? मग बायको मुलाचा संभाळ कसा करायचा? अरे, पण मी का काळजी करतो आहे, मी बीई झालोच आहे की !

जागा होतो. खरंच, आपण बीई झालोच आहोत की. मग काय काळजी आहे?

चौथे स्वप्न

गाडी चालवत कुठेतरी निघालो आहोत. मस्त गाडी चालते आहे. समोरून एक दुसरा ट्रक येतो. मी ब्रेक लावतोय. पण ब्रेक इतका लूज का आहे? गाडी थांबतच नाहीये. जोरांत पाय ब्रेकवर दाबतोय. हळूहळू गाडी थांबते. काहीही वांधा न होता!

पुन्हा पुन्हा हेच स्वप्न का पडतेय?

पाचवे स्वप्न

बोटीने चाललो आहे मी. सगळीकडे नितळ खोल पाणी आहे. "डायविंग करूया का?" धाकटा मुलगा विचारतो. डायविंग हेल्मेट घालून मी उडी मारतो. पाण्यांत खोल जातो.सगळीकडे निळा रंग आणि कानांत पाण्यातून येणारे दबके आवाज. मुलगा म्हणतो, "बोटीचे स्क्रू पिवळे कसे झाले?" मी म्हणतो, "अरे काल ते हिरवे ग्रीस घातले होते त्यामुळे असेल". पाण्याच्या तळावरून लाल

गाडी येते आहे. त्यांत माझे बाबा बसले आहेत आणि नातवाला काचेतून मगरी दाखवीत आहेत. आम्ही पाण्यातून उडल्यासारखे चाललो आहोत. आमची बोट कुठे गेली? आता पाण्यावरून सरपटत जायचे आहे. आता हेल्मेट काढले तर काय होईल? त्या किनाऱ्याच्या झाडावर माझे बाबा, माझा नातू आणि मुलगा बसलेत. "लौकर या, लौकर या, त्सुनामी येते आहे", म्हणताहेत. मी पाण्याबाहेर आलो तरी माझे पाय आणि हात जड झाले आहेत. सगळं जोर लावला तरी पावलेच पडत नाहीत. एक मोठी लाट येते आणि मी पाण्याखाली जातो, हेल्मेट नाहीये. मला तर पाण्यांत श्वास धरताच येत नाही. आता मी बुडणार. कसातरी पाण्यावर येतो आणि नारळाच्या झाडाच्या पानांत अडकतो.

माझे पाय चादरीत अडकले आहेत. अजिबात हलत नाहीत. हुश्श. स्वप्नच होते तर!

सहावे स्वप्न

एक हॉल मध्ये खूप लोक बसलो आहोत. आजूबाजूला सगळी गर्दी आहे. एखाद्या लग्नाच्या सारखी. एक बाई येते आणि एक बाळ माझ्याकडे देऊन जाते. जाता जाता त्या बाळाला नॅपी चढवून जाते. बाळ एकदम गोड आहे सारखे माझ्याकडे टक लावून पहाते आहे. मध्येच हसते आहे. अजूनही काही छोटी मुले तिथे खेळताहेत. माझ्या मागे एकदम लाईट प्रखर होतो. त्या मुलांचे डोळे दिपतात. त्यांत मला या गुडघ्यावरच्या बाळाचे डोळे घारे असलेले दिसतात.

बाळ रडू लागते. अजून काही मुले ही रडू लागतात. मागे वळून बघतो तर भिंतीवरची एलइडी ट्यूब फक्त एक चतुर्थांश चालू आहे असे दिसते. मी त्या बाळाला घेऊन दुसऱ्या कोपऱ्यांत जातो. तिथे दोन मुले बाळाकडे पाहून हसतात, बाळ म्हणजे एक मुलगी आहे, तशीच त्या मुलांची नक्कल करते. आणि ते बाळांचे बिनदातांचे हसू हसते.

मी जागा होतो, संध्याकाळ झाली आहे, दुपारच्या वामकुक्षीत कसले मस्त स्वप्न पडले म्हणत प्रसन्न मनाने मी उठतो.

असे अगदी वेगळे अनुभव येतात स्वप्नांमध्ये! कधीतरीच रंगीत स्वप्ने पडतात पण बहुधा ब्लॅक अँड व्हाइट. असे काळ, स्थळ, वय, नातेवाईक, घरे यांचे असे बेमालूम मिश्रण स्वप्नांत होते की काही विचारू नका.

काय या स्वप्नांचा अर्थ लावायचा?

एकदा मी Dream Workshop नावाचा एक सेमिनारला गेलो होतो. तिथही पहिल्यांदा स्वप्नांची थियरी मांडल्यानंतर आपापली स्वप्ने सांगायचा सेशन होता. पण त्या डॉक्टर लोकांची स्वप्नांचा अर्थ काढायची पद्धत आणि त्यांचे निष्कर्ष मला अजिबात पटले नव्हते. अर्थहीन होते ते निष्कर्ष.

मनी असे ते स्वप्नी दिसे म्हणतात. पण मला तर मनी नसे तेच स्वप्नी दिसते.

तुम्हाला काय दिसते?

# घोडचुका

माणूस आपला आपले जीवन जगत असतो. काही ना काहीतरी करत असतो. मुकाट्याने बसणे त्याच्या रक्तातच नाही. नुसता मुकाट्याने बसलेला दिसला तरी त्याच्या डोक्यांत चक्रे फिरत असतात. मग काहीतरी करतोच. काहीवेळा त्याला पाहिजे ते होते, काहीवेळा भलतेच होऊन बसते.

चूक म्हणणे काय? चुकून झाले म्हणजे तरी काय? चुकांची डेफिनिशन कुणी केली आहे का? आणि केली तरी त्यांची वर्गवारी केली आहे का? कसली चूक चालून जाते आणि कसली नाही याचे विवरण आपण केले तर असे लक्षांत येईल की जे आपण केले आणि जे इतरांना सापडलेच नाही ते चालून जाते आणि जे इतरांना आपल्या अगोदर सापडते ते आपल्याला काहीतरी अडचणीत आणून जाते.

घोडा, बैल, बोकड, गाढव, मांजर, सगळे कधीना कधी चूक करतात. पण मोठ्या चुकीला घोडचूकच का म्हणतो? मांजरचूक का नाही?

समजा इंटरव्ह्यूला चालते आहोत. वेळेवर पोहोचायला पाहिजेच आहे. आपण अगदी तारेत आहोत इंटरव्ह्यूच्या. जायचे आहे वांद्र्याला आणि लोकल

आली कुर्ल्याची. पटकन गाडीत चढलो, आणि इंटरव्ह्यूची तयारी करता करता वडाळा स्टेशन मागे पडले. आणि पाहतो तर गाडी कोळीवाड्याला आलेली दिसली. अय्याया. वांधा झाला. वेळ कमी त्यांत असे. आता इंटरव्ह्यूची वेळ चुकणार, हे नक्कीच. ही घोडचूक आहे का नाही?

सीन १

पटकन गाडीतून उतरलो, प्लॅटफॉर्म क्रॉस केला, तेवढ्यांत व्हीटीची गाडी आली, परत वडाळ्याला आलो, प्लॅटफॉर्म क्रॉस केला, वांद्र्याची गाडी आली. हुश्श. पंधरा मिनिटे उशीर झाला पण पोहोचलो ऑफिस मध्ये. इंटरव्ह्यू झाला, मस्त झाला. सिलेक्ट झालो.

सीन २

लक्षांत येईपर्यंत गाडी सुटली. आता कोळीवाडा. काहीही ट्रान्सपोर्ट नाही तिथून वांद्र्याला जायला. सगळे तिथून लांब. गेला इंटरव्ह्यू.

सीन ३

कुर्ल्याला पोहोचलो, बाहेर येईपर्यंतच पंधरा मिनिटे लागली, रिक्षा मिळाली कशीतरी, ऑफिसला पोहोचेपर्यंत चांगला पाऊण तास लागला, इंटरव्ह्यू घेणारे म्हणाले, टू लेट, इंटरव्ह्यू झाले, कँडीडेट सिलेक्ट झाला आहे.

a

पण जरा थांबा, विचारून बघतो. या माझ्याबरोबर. इंटरव्ह्यू झाला. सिलेक्ट झालो.

तीन चुका. कुठली घोडचूक म्हणायची? अर्थात दुसरी. धडा शिकलो त्यातून.

जी चूक लपली ती चूकच नाही, जरासे बिघडले! ज्या चुकीने धडा शिकवला आणि इतरांना ते कळले, ती घोडचूक. जर पहा, चूक झाली की अक्कलखात्यांत भर पडते, अनुभव वाढतो. आपल्या अक्कलखात्यांत खूप बॅलन्स जमा होतो.

मग मोस्ट एक्सपिरिन्सड म्हणजे जास्तीत जास्त चुका केलेला नव्हे काय? त्याला सगळे मान देतात की नाही? त्यालाच उंच सॅलरी मिळते का नाही? तो जाऊन सेमिनार मध्ये जाऊन अभिमानाने आपल्या घोडचुका सांगतो, जो काम करीत तोच चुकेल, जेम्स बॉण्ड कधीच चुकत नाही, म्हणूनच तो जसाच्या तसा आहे एवढी वर्षे, सगळे टाळ्या वाजवितात, त्याला प्रेझेंट मिळते.

चुका म्हणजे अनुभव. काय करू नये ते समजणे. तेच महत्वाचे.

a

तर मग घोडचूक म्हणजे मोठ्ठा अनुभव. नाही का. तेही मोठ्ठ्याच महत्वाचे. नाही का?

घोडा चूक करून कधी पस्तावलेला पाहिलाय का? उलटे मांजर पस्तावत असेल, पारवा उडून गेला म्हणून. गाढव, बैलही कधी चूक करून दुःखी झालेत असे आपल्याला तरी दिसले नाही.

तर, बंधू भगिनींनो, घोडचूकही करायला लाजू नका. घोडचुकांनी सन्मान मिळेल, पगारवाढ होईल, मोठ्या पोस्ट्स मिळतील, सगळे तुम्हाला मानतील, तुमची कॉपी करतील.

मांजरचुका मात्र करू नका. त्याने अपमान होतील, दुसरे आपल्याला हसतील, जे करावे ते मोठ्ठे करावे, अजिबात अनमान करू नये त्यांत.

समजले का? समजलेच असेल.

# काय मिळवले आणि काय घालवले

आपले आयुष्य आजकाल गतिमान झाले आहे. त्यामुळे आयुष्य जगतांना मागे काय झाले याचा विचार करायलाही वेळ नाही. पावले पडत राहिली आणि पुढे पुढे जात राहिली. आज काय होणार किंवा आतापर्यंत काय झाले यावरच पुढचे पाऊल ठरणार, त्यामुळे काय करायचे आहे आणि कसे आणि केंव्हा करायचे याचा विचार करीपर्यंत पुढचे पाऊल पडून गेलेले असते. मागे वळायला वेळ नाही आणि पुढेही कुठे चाललो आहोत ते बघायला वेळ नाही.

आपले घड्याळ इतके फास्ट कसे आणि का झाले?

लहान होतो, आपला दिवस ही लहान होता. सकाळी उठले की सकाळची शाळा असतांना कसेतरी आवरायचे आणि रस्त्याला लागायचे. शाळेत पोहोचता पोहोचता घड्याळांत शाळेची वेळ पाच मिनिटांवर आलेली असायची, त्यामुळे मित्रमैत्रिणींबरोबर आज शाळेंत काय काय होणार याची चर्चासुद्धा व्हायची नाही. मग काय काय करूया याचा विचार तर दूरच. त्यामुळे आज काय मिळवायचे आहे या विचारावर फुली. शाळा संपल्यावर घर, जेवण याचा विचार त्यामुळे दुपारचे काही प्लॅनिंग असे नव्हतेच. संध्याकाळ झाली की जरा खेळायला बाहेर की रात्र झाली. मग जेवण आणि झोप. संपला दिवस.

a

दुपारच्या शाळेची जवळ जवळ हीच परिस्थिती. फक्त खेळणे सकाळी. त्यामुळे काय घालवले या विचारवरही फुली.

वयवर्ष सहा ते सोळा मध्ये हाच प्लॅन आणि हेच जीवन. या वयांत भविष्यकाळ एक दोन दिवसांचा आणि बाकी सगळा भूतकाळच. या वयांत काय मिळवायचे आहे याची फारशी कल्पना नाही आणि काय नाही मिळवले किंवा काय घालवले यांची खंत नाही.

कॉलेजच्या पुढच्या सहा सात वर्षांत जवळपास हीच स्थिती. दौडते रहो हा मूलमंत्र. त्यामुळे तेंव्हाही मिळविल्याचा आनंद नाही आणि घालविल्याचा खेद नाही. पण जरा थांबा, थोडा थोडा याचाही अनुभव यायला लागला होताच की. शाळेतले आपले मित्र बरेच दुरावले होते, काहींचा काहीच संपर्क राहिला नव्हता. एके कालचे जानी दोस्त आणि त्यांची जानी दोस्ती घालवली होती. एक कॉलेज बॉय म्हणून डोके ढगांत गेले होते, गर्व मिळवला होता. आता आपल्या त्या मित्रांना भेटायला वेळ काढता येत नव्हता आणि काहीवेळा तर भेटण्याची इच्छाही घालवली होती.

एकदा कॉलेज संपल्यावर अभ्यास नीट केला असता आणि वेळीच मोठ्यांची मदत घेतली असती तर आहे त्यापेक्षा आपली ज्यास्त प्रगती झाली असती असे जाणवायला लागले होते. डिग्री मिळाली होती पण अजून चांगल्या

a

संधी घालवलेल्या होत्या. ही भावना आता जास्त प्रखर झाली होती. रिग्रेट नावाची एक भावना मिळविलेली होती.

जाऊद्या यापुढे असे करू नये, असा विचार करून जीवन मार्गाची "प्रगती" सुरूच होती. पण भूतकाळ काय शिकवितो ते शिकतो कोण? आणि भविष्यकाळ काय देणार आहे याची कल्पना नाही. नव्या शर्यतीचे नवे नियम. शर्यत सुरू, करियरची.

नंतर वैवाहिक आयुष्य. हम दो ची भावना नव्याने आलेली. मी आणि ती, यापलीकडे जगांत काय आहे याची चिंता त्या यौवनपूर्ण वयांत आणून आपला वर्तमान काळ वाया कोण घालवणार?

आजपर्यंत ज्या आई वडिलांच्या बरोबर आपले आयुष्य निगडित होते त्यांच्यांत हळू हळू नकळत अंतर पडत गेले. बहीण भावांच्या नात्यांतही थोडेसे का होईना अंतर पडत गेले. एक आपला बुडबुडा बनला, त्यापलीकडे पहायची आपली दृष्टी बदलली. ते जरी दुरावले नाहीत तरी पूर्वीसारखे जवळही राहिले नाहीत. थोडे फार वैयक्तिक स्वातंत्र्य मिळवले पण नात्यांतला गोडवा घालवलाच.

आपल्यावरच्या खऱ्या आणि काल्पनिक जबाबदाऱ्या वाढत गेल्या. काहीतरी मिळवायची इच्छा आता महत्वाकांक्षा झाली. आपली झाली तशी इतरांचीही झाली. मग या उंदराच्या शर्यतीत आपण आपले इतके बुडून गेलो की आपल्याला काही विचार करायला वेळच मिळेनासा झाला.

खरे तर आपण एका नदीत वाहवत चाललो होतो. नदी कुठे घेऊन जाणार आहे याची काय कल्पना होती आपल्याला. संधी येत होत्या आणि आपण त्यांच्याकडे अडचण, आपत्ती म्हणून बघत होतो. संधी जात होत्या पण आपण गर्क होतो आहे त्यांत आणि त्या गेल्याची जाणीव होत होती नंतर, त्या घालविल्या नंतर. ज्यांनी रिस्क घेतली, काही सोडून दिले त्यांना काही मिळालेही. ज्यांनी नाही घेतली त्यांनी घालवले काही, त्यांच्या नकळत, किंवा जाणीवपूर्वक.

जे आई बाबा आपले दैवत होते त्याची नुसती खबरबात ही घ्यायचे राहून गेले. मुले झाली त्यांचे वाढणे अनुभवायचे राहून गेले. फक्त आपण आणि आपली करीयर या मागे धावत सुटल्यामुळे आपण काय मिळविले यापेक्षा काय घालवले ही जाणीवही आता राहिली नाही. मुलांचे बोबडे बोलणे त्यांचे एक वर्षांत चालायला लागणे, आजीने आजोबांनी त्यांचे केलेले कौतुक ऐकायलाही वेळ राहिला नाही. मुलांचा सहवास आणि आजी आजोबांचा नातवंडाचा खेळ अगदी घालवला आपण.

a

मिळविले काय यावेळी? करियरच्या रेस मध्ये तो पुढे का आणि कसा गेला आणि मी असा का राहिलो, किंवा मला एवढेच का मिळविता आले, माझी ताकद तर त्यापेक्षा कितीतरी ज्यास्त आहे या विचारांनी मिळविल्याचा आनंद उपभोगण्यापेक्षा घालविल्याची सल ज्यास्त लागून राहिली.

बिल गेट, अंबानी यांच्यासारखे आपण नाही आणि आपल्याकडे त्यांच्यासारखी भौतिक साधने का नाहीत याचा विचार करताना जे मिळाले ते पुरेसे नाही का आणि आपल्याला काय अजून पाहिजे याचा विचार केलाच नाही आपण. आणि त्यांचा हेवा करत बसताना हातातल्या पक्ष्यापेक्षा तो झाडावरचा पक्षीच मनात घुसून बसला. त्यांनी काय मिळविले, त्यापेक्ष्या त्यांनीही काय घालविले याचाही विचार करता आला नाही आपल्याला.

ज्या बुडबुड्यांत आपली पत्नी आपली मुले होती त्यांच्याकडेही थोडेसे आणि कधीतरी बरेच दुर्लक्षच झाले. कधीतरी मुलांशी खेळलो असू, कधी त्यांना खेळणी आणून देत असू आणि कधीतरी पत्नीबरोबर वेळ घालवीत असू, पण एकंदरीत दुर्लक्षच. त्या दुर्लक्षामुळे नाही त्यांच्या जवळ राहिलो आणि नाही त्या करियर गोलच्या. करियर गोल पुढे पुढेच जात राहिला आणि आपण धावतच राहिलो त्या इंद्रधनुष्याच्या तळाच्या सोनेरी घागरी मागे.

आणि ज्यावेळी आपण कधीतरी थकून थांबून इतरांच्या कडे पाहिले तेंव्हा त्यांची काय परिस्थिती होती? अगदी आपल्यासारखीच. तेही त्यांच्या करियर

गोल मागे धावत होते आणि तेही असेच आपल्यासारखे थकून थांबून आपल्या कडे पाहत होते.

आई वडील तर कधीच दुरावले होते, मनाने आणि कधी शरीरानेही. त्यांचा सहवास तर घालवलाच होता कित्येक वर्षांपूर्वी. आता मुले मोठी झाल्यावर तीही स्वतंत्रपणे विचार करत होती. पत्नीही एवढ्या वर्षांच्या जबाबदारीच्या अनुभवाने मनाने स्वतंत्र झालीच होती. त्यांनीही आपली वाट शोधली होती. त्यांना आपण वेळ देऊ शकलो नाही आणि त्यांनी आता ते गृहीतच धरले होते.

आता रिटायर होण्याच्या त्या टप्प्यांत, जे काही मिळवायचे होते आणि घालवायचे होते ते सर्व करून झाल्यावर शांतपणे विचार करत राहिलो की काय मिळवले आणि काय घालवले.

आता वाचायला वेळ मिळायला लागल्यावर इतरांची काय तऱ्हा झाली आहे हे दिसायला लागल्यावर भगवान श्रीकृष्णाची आठवण झाली आहे. ऑफिसच्या भिंतीवर गीतेतली वचने अडकवलेली आता आठवतात.

तुम क्या लाये थे जो तुमने खो दिया
जो लिया यहींसे लिया, जो देना था यहीं दिया
वो तुम्हारे कौन थे जो तुमसे बिछड़ गये
तो तुम्हारे क्या लगते थे जो बिछड़ जानेपर तुम दुख करते हो

a

तुम्हे क्या कमाना था और क्या गंवाना था कि तुम दुख करते हो

त्यावेळी ही वचने म्हणजे ऑफिसचे फर्निचर होते. कोणी लक्ष देत नव्हते त्याच्या कडे.

काय मिळवायचे होते ते तेंव्हाही कळले नव्हते आणि काय घालविले तेही कळले नाही एवढे साठीला आलो तरी.

पन्नास वर्षानंतर शाळेच्या अकरावीच्या विद्यार्थ्यांचा मेळावा भरला २०१४मध्ये. भेटून इतके छान वाटले की बस. जुन्या ओळखी नव्या झाल्या आणि सगळेच्या सगळे १९६४ मध्ये गेलो. थोड्या मी हे केले आणि ते केलेच्या फुशारक्या मारून झाल्या आणि त्याचे तोंड देखले कौतुकही करून झाले. माझी मुले इकडे आहेत आणि माझी मुले तिकडे आहेत च्या कौतुकपूर्ण गप्पाही झाल्या. कोणीही फारसे दुःखी दिसले नाहीत. कोणीही ज्यास्त मिळवल्या घालवल्याची चर्चा केली नाही. आहे हे असे आहे, त्यांत काय काय विशेष, आनंदी आहोत आपण आपल्या आयुष्याने, हीच भावना दिसून आली.

आणि आता २०२०मध्ये इंजिनियरिंग कॉलेजच्या वर्गमित्रांची भेट झाली. पुन्हा एकदा त्या चार पाच वर्षांच्या आठवणी जाग्या झाल्या. पुन्हा एकदा तू काय केलेस आणि मी काय याची उजळणी झाली. कोणीही फारसे खिन्न दिसले नाहीत. प्रत्यक्ष न भेटताही व्हॉट्सऍप ने संवाद करून. नव्या प्रोजेक्टची उभारणी करायची आशा धरून.

तरुणपणी घालवलेल्या थोड्या फार गोष्टीची भरपाई केली आहे सगळयांनी.

मुलांचे बालपण घालविले करियर करतांना, ते नातवंडाची जन्मल्या दिवसा पासूनची प्रगती पाहत आणि ती रेकॉर्ड करून इतरांना दाखवत. पत्नीचा सहवास थोडा दुरावला होता तो मेकअप करत. तिच्या कामात लुडबुड करून तिचा राग सहन करत. वाचणे लिहिणे अगदी सुटले होते त्याची उजळणी करून तेंव्हा नाही जमले ते आता स्वतःला एक्स्प्रेस करत.

आता नियम एकच, जे तेंव्हा जमले नाही ते आता जमवायचे. आता घालविण्यासारखे फारसे उरले नाही आणि मिळविण्यासारखेही. मग आता निरपेक्ष मनाने आणि निश्शंक वृत्तीने पुढच्या आयुष्याकडे पाहत.

संतस्वभाव सगळयांना मिळत नाही. त्यावेळी आपल्यातल्या संतांची थट्टा केली, हेटाळणी केली. आता आपण संतपद मिळविणार का?

नवीन मिळविण्याची इच्छा किंवा आशा आणि घालविण्याची भीती किंवा खंत सोडून द्यायची. आपण कमीत कमी हे नक्कीच करू शकतो.

मिळविणे आणि घालविणे दोन्ही कमी करायचे. म्हणजे संत नाही तरी संतवृत्तीचे होऊ आपण.

# माझे स्पोर्ट्स

खेळाडू गडी म्हणजे कसा पाहिजे? दणकट शरीर, चपळ, दंड फुगलेले, पोटऱ्या लोखंडासारख्या, सपाट पोट, त्यावर सिक्स पॅकच्या वळया, गर्दन बैलासारखी, कान कॉलीफ्लॉवर सारखे, डोके लहान, शंभर उठाबश्या एका दमांत काढणारा, सूर्य नमस्कार काढून छाती पोटाच्या डबल रुंद वगैरे वगैरे.

देवाने आम्हाला असल्या देणग्या दिल्या नव्हत्या. काडी पहेलवान शरीर, डोके थोडे मोठेच, व्यायाम म्हणजे दोन तीन सूर्य नमस्कार म्हणजे लिमिट, धावणे म्हणजे बाळासारखे, पावले वर न उचलता असे आम्ही. पण देव दयाळू आहे, चिवटपणा दिला होता आम्हांस त्याने. शाळेपर्यंत चालत जाणे, जिने भराभर चढणे आणि उड्या मारीत उतरणे, तास न तास पतंग उडविणे, गोट्या खेळतांना परफेक्ट नेम मारणे, कॅरम खेळतांना तीन चार सोंगट्या एकावेळी बरोब्बर भोकांत टाकणे हे जमत होते आम्हाला.

मैदान ही गोष्ट मुंबईत दुर्मिळ, त्यांत आम्ही जे जे हॉस्पिटल सारख्या गजबजलेल्या ठिकाणी राहणारे, म्हणजे जवळच्या मैदानांत पोहोचेपर्यंत एक किलोमीटरचा पल्ला चालत, त्यामुळे आमची स्पोर्टची व्याख्या इतर लोकांपेक्षा वेगळी होती.

शाळेत मैदान म्हणजे आय आकाराच्या बिल्डिंगमधली जागा किंवा चौथ्या मजल्यावरची गच्ची. त्यामुळे आमचा खेळांचा तास म्हणजे पकडा पकडी, लंगडी किंवा "सर्वांग सुंदर" व्यायाम प्रकार. सरांनी एक दोन तीन चार म्हणायचे आणि आम्ही हात खालीवर करायचे. कधी कधी उंच उडी. लांब उडी कधी जर ठेवली सरांनी तर हात पाय किंवा डोकेही फरशीवर आपटायची शक्यता. चमचा गोटी, बटाटा शर्यत, लंगडी किंवा १० मीटर धावणे हे आमचे स्पोर्ट्स. खेळाच्या तासाला सरांच्या बरोबर टेबल टेनिस किंवा व्हॉलीबॉल खेळायचे. त्यांत सर अर्धा वेळ एका बाजूने टेबल टेनिस खेळणार, दुसऱ्या बाजूला क्यू लावून मुले. व्हॉलीबॉल नेटच्या पलीकडे टाकता येणाऱ्याला क्लासच्या टीम मध्ये घेत असत.

नाही म्हणायला वर्षातून एकदा, मरिन ड्राइव्हवर नसलेल्या विल्सन कॉलेज जिमखान्यावर वार्षिक स्पोर्ट्स असायचे, पण त्यावेळीही आपली रेस हरल्यावर रस्त्या वरच्या मोटारी मोजणे, त्यांची मॉडेल ओळखणे असे "स्पोर्ट्स" चालायचे. मुंबईतल्या गिरगावातल्या शाळांची थोड्या फार फरकाने हीच परिस्थिती होती. दादरच्या किंग जॉर्ज शाळेत मात्र जरा मोठे मातीचे मैदान होते.

विल्सन कॉलेज मध्ये स्पोर्ट्स शून्य झाले होते, कधीतरी बॅडमिंटन हॉलमध्ये जाऊन रॅकेटने फटके मारायचे इतकेच. थोडी भरपाई एनसीसीने केली होती. तिथे

a

मात्र रायफलच्या बायोनेट ने गवत भरलेल्या गोणपाटाच्या पिशवीला धावत जाऊन "तान शस्त्र, धावा कर" म्हणून भोसकायचे आणि "उलटे बाजू शस्त्र" म्हणून धावत परत यायचे, परेड, डबल अप वगैरे सैनिकी व्यायाम होते.

वालचंद कॉलेजला गेल्यावर स्पोर्टसचे क्षितिज जरासे रुंदावले. एक तर सगळे मोकळे मोकळे, खरे मोठे ग्राउंड, टेनिस, बॅडमिंटचा हॉल, टेबल टेनिसची टेबले आणि जिम. त्यामुळे आमचे खेळजीवन नक्कीच सुधारले.

पहिल्या वर्षी खेळांच्या फार नादाला लागलो नाही पण पुढची तीन वर्षे टेनिस सोडून इतर खेळ खेळता येऊ लागले. त्यांतही टेबल टेनिसमध्ये न उचलता येण्यासारखी सर्व्हिस करायला जमले. बॅडमिंटन मध्ये थोडीफार प्रगती झाली.

पहिल्यांदा  सकाळच्या वेळी ग्राऊंडला धावत फेरी मारून येणे ट्राय केले. पण आपला पिंड ऍथलेटचा नाही हेच तिथे नक्की झाले. पण तरीही जिममध्ये वेट लिफ्टिंग, बॅडमिंटन, रिंग टेनिस आणि मेसमुळे होणाऱ्या बेताच्या डाएट जेवण्याने अगदी ऐथलेट नाही तरी शरीराने फिट झालो. नेहमीच्या चालण्यामुळे अंगांत थोडा स्टॅमिना आला.

a

ब्रिज आणि बुद्धिबळाला स्पोर्ट्स मानावेत की नाही ते कोणीतरी ठरवले पाहिजे. कारण त्यांत आमची ज्यास्त प्रगती झाली, म्हणून. ब्रिज आणि बुद्धिबळ खेळून तितकेच दमायला होते. छत्तीस डील खेळून बघा ब्रिजच्या किंवा बुद्धिबळाचे दहा डाव खेळून बघा, कळेल काय म्हणतो ते.

पुढे मुंबईच्या नोकऱ्यांत स्पोर्ट्स म्हणजे ऐन पीक अवरमध्ये गर्दीची लोकल पकडणे, एकही रिकामी सीट नसलेल्या बसमधून उभ्याने प्रवास करणे. एकदा करून बघा, चांगले बलदंड पहिलवान व्हाल. आणि मुंबईतल्या रस्त्यांवरून चालत जाणे ही ट्राय करा. त्याने चवडे, टाचा, गुडघे आणि खुबे (कंबरेचे जॉइन्ट्स) बळकट होतात.

चालणेही कधी तर मफतलाल मध्ये असतांना. घरी येऊन जॉगिंग, स्प्रिंग ताणून चेस्ट एक्सपांड करणे आणि वेट लिफ्टिंग केल्यासारखे स्प्रिंगने करणे. आरशासमोर जॉगिंग करणे हा एक स्पोर्टच होता. मुंबईच्या हवेमध्ये घरातल्या घरात दहा मिनिटांत जो घाम फुटतो तो कोल्हापूरच्या एक तासाच्या मेहेनतीनेही फुटत नसेल.

कूपरच्या नोकरीत असतांना तिथे एक रायफल क्लब होता. कंपनीच्या आवारातच एक रायफल रेंज होती. त्यामुळे त्या क्लबचा मेंबर होऊन  कधी कधी गुरुवारी गोळ्या झाडायला जात असू. मिडल क्लास मध्ये होतो तिथे

a

रायफल शूटिंग मध्ये. कूपरमध्ये असतांना साताऱ्याच्या कारखान्यांत आमचे वालचंद ग्रुपचे ऑलिम्पिक असायचे, त्यांत ब्रिजमध्ये भाग घेत असू.

नंतर कूपर सोडून पुन्हा मुंबईला आल्यावर अर्थातच माझे स्पोर्ट्स पुन्हा धावत जाऊन लोकल पकडणे, रेल्वे स्टेशनातल्या जिन्यावरून पाय न घसरता, मुरगळता धावत चढणे उतरणे असे झाले. त्यांत बरीच मास्टरी मिळवली.

सांगलीला असताना चांगला घोडा झाल्यावर सायकल चालवायला शिकलो होतो. सायकलने दोन परिणाम झाले, एक तर सायकलिंगचा स्पोर्टही झाला आणि पैसेही वाचले. एक दगडात दोन पक्षी. शिवाय एक दोनदा विश्रामबाग ते कोल्हापूर आजोळ अशी सायकल सफारीही केली होती, तो हातकणंगल्याचा घाट न थांबता चढून आणि उतरून. सायकलिंग आवडले आपल्याला.

मुंबईला आणखी मोठा घोडा झाल्यावर एका मित्राच्या आग्रहाने मिल मध्ये ट्रेनी असतांना कामगार क्रीडा मंडळाच्या स्विमिंग पूल मध्ये पोहायला शिकलो. पाणी उथळ भागांत पोटा पर्यंत येत होते. पण माझ्यासारखे खूप जण होतो तिथे शिकणारे. मग हळूहळू बेडूक स्टाईलने क्रॉस करत नंतर अख्खा पूल दोनदा तीनदा पार करायचा स्टॅमिना आला. दीड दोन वर्षे दररोज मिलमधून सुटल्यावर पोहायला जात असे.

तुम्ही म्हणाल, "हे तर कधीच केले आम्ही, त्यांत काय विशेष?".

साहेब, मुंबईकरांना कुठे अशी संधी मिळणार. मुंबईत सायकल फक्त दोन प्रकारचे लोक चालवतात, एक म्हणजे दूधवाला भय्या आणि दुसरा म्हणजे बेकरीचा डिलिव्हरी बॉय. शिवाय मुंबईच्या रस्त्यावरून सायकल चालविणे म्हणजे नुकताच विमा उतरलेल्या माणसा सारखे वागणे.

पोहोण्याचे म्हणाल तर त्याला स्विमिंग पूल लागतो मुंबईत. आमचा एकुलता एक स्विमिंग पूल होता चौपाटीला, आणि तिथली मेंबरशिप स्वप्नाच्याही पलीकडली होती. मुंबईत विहिरी फक्त दहा फूट रुंदीच्या. त्यांत कोणीही पोहून दाखवावे. समुद्रांत पोहायला फक्त जीवाचा कंटाळा आलेले आणि कधीतरी कोळी धजतात. आम्ही दोन्हीही नव्हतो. हाच तो फरक शहरी आणि ग्रामीण मुलांच्या जीवनांत.

टाटा कन्सलटिंग इंजिनियर्स मध्ये गेल्यावर काही सहकाऱ्यांच्या आग्रहामुळे क्रिकेटची प्रॅक्टिस आणि एक दोन मॅचेस ही खेळलो. फिल्डिंग करतांना ग्राउंड केवढे अफाट वाटायचे! बॉल जवळून जरी गेला तरी आपले लक्ष त्याच्यावर जाऊन तो अडवायचा प्रयत्न करीपर्यंत पार मागे गेलेला

a

असायचा. बॅटिंग मध्ये मात्र एकदाही आऊट झालो नाही. करियर ऍव्हरेज 10 नॉट आऊट असे राहिले.

रिटायर होता होता चालणे मात्र आपल्यापाशी राहिले. घर ते वरळी सी फेस आणि परत असे १तास पुढे आणि एक तास परत, मध्ये अर्धा तास बाकड्यावर बसणे हा स्पोर्ट झाला. यातही १२ किलोमीटरची चाल व्हायची एकूण. नॉट बॅड, नाही का?

तर मंडळी, ही आहे आपली स्पोर्ट्सची हिस्ट्री. इतर भले मोठ्ठे स्पोर्ट्समन असतील, असोत बिचारे. जे आपल्याला सूट होते ते करावे, जास्तीची महत्वाकांक्षा धरू नये.

ते करायला विराट कोहली, सचिन तेंडुलकर, पी टी उषा, मिल्खासिंग, अर्जुन पाल सिंग, पी वी सिंधू आणि इतर जण आहेतच की.

जिंदगी सलामत तो स्पोर्ट्स पचास!

# भांडीवाल्याची प्रार्थना

भांडी घासूनी
अति मी दमलो
थकलो रे नंदलाला
थकलो रे नंदलाला

साबणाचे मम हात झाले
घासुपणाचा शिक्का
विसळुनी सगळी भांडी झाली
ट्रे बघा सकल भरला
थकलो रे नंदलाला

आता नवी ती भांडी आली
आता नवी ती भांडी आली
पुन्हा पहा घासण्याला
थकलो रे नंदलाला

हेच काम का मम जीवाला

a

तोच तोच का साबण
कधी येणार ती भांडीवाली
कधी मी जाणार ऑफिसाला
थकलो रे नंदलाला

कोरोना पुढती हात टेकले
नको नको हा कारावास
थकलो रे नंदलाला

# माझे छंद

छंदाची व्याख्या काय?

छंद म्हणजे आपला चांगला टाईमपास. एकट्यालाही करता येतो. कधी कधी बऱ्यापैकी उपयोगही करता येतो.

नेहमीच्या जीवनाच्या पसाऱ्यात अनेक गोष्टींना आपण हात लावून येतो. काही जीवनावश्यक काही अश्याच. काही अत्यावश्यक, काही उपयोगी आणि काही अगदी निरुपयोगी.

हवा, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा, कामकाज, मनोरंजन आणि छंद या क्रमाने आपण त्यांची वर्गवारी लावतो. त्याच क्रमाने त्या आपल्या जीवाला उद्देश देतात. म्हणजे अत्यावश्यक यादीत छंद शेवटचा, त्यामुळे काही अडत नाही. पण बोअर होणे हा एक वेगळाच रोग माणसाला आहे. त्यावर उपाय म्हणजे मनोरंजन आणि छंद. एकत्र करून. माणूस म्हणजे छंदीफंदी!

मस्त हवा आहे, पोट भरले आहे, काहीही डेंजर नाही दिसत, अशावेळी प्राणी काय करतात? मांजर स्वतः भोवती गुंडाळून घेऊन झोपी जाते. कुत्रा इकडे

काय, तिकडे काय असा वास घेत आणि वास देत फिरत राहतो, वाघोबा आणि सिंह मांजरासारखेच ताणून देतात. पण माकड, ते माकड चेष्टा करत राहते. माकडाची पिल्ले बघा एकदा खेळताना. माणूस हा एक सुपर माकड आहे असे असिमोव ने लिहिले आहे. एकदम छंदीफंदी आहे.

अगदी बालपणापासून आपल्याला छंद लागतात. छोटे बाळ बघा. एकच खेळणे दिले तर चक्क टाकून देते. त्यालाही व्हरायटी पाहिजे. त्या वयांत सुद्धा! आपणही असेच बाळ होतो. जसे जसे मोठे होत गेलो तसे तसे आपल्या "कक्षा" रुंदावल्या आणि आपले छंदही.

पाच सहा वर्षांचे होईपर्यंत आपल्या छंदांची आणि खेळण्याची कक्षा रुंदावली. त्यांची टेक्नॉलॉजीही आपण आत्मसात केली. गोट्या, भोवरे, पतंग, विटीदांडू आणि काय काय.

गोट्या. आम्ही मुंबईकर गोट्या खेळतांना त्यांत बरेच कायदेकानू आले होते. आम्ही सर्वसाधारण मुले काचेच्या गोट्या वापरत असू. त्यांतही आकाराप्रमाणे आमच्या ग्रेड्स असायच्या. दुसरी तिसरीतली मुले पाव इंची आणि अर्धा इंची गोट्यांना क्वालीफाईड होती, त्याहून मोठ्या गोट्या अकरावी पर्यंत चलनात होत्या. जमिनीवर एक त्रिकोण आखायचा, त्यांत प्रत्येकाने ती चार गोट्या ठेवायच्या. मग एका लाईनच्या मागून आपली गोटी सरकवायची.

ज्या गोट्या बाहेर येतील त्या हातात ठेवायच्या. मग इतर आपल्या गोटीला त्यांच्या गोटीने मारणार. जर सगळयांनी त्यांच्या गोट्या वापरूनही आपल्या गोटीला लागले नाही तर जिंकलेल्या गोट्या आपल्या.

असे होता होता जो चॅम्पियन असेल त्याच्या कडे मोठ्ठा साठा व्हायचा, बाकीचे गरीब. मग त्यांनी नव्या गोट्या विकत आणाव्यात. माझ्या कडे पन्नास साठ गोट्या जमल्या होत्या.

मोठी मुले स्टील च्या गोट्या आणायची. एक चौकोन आखायचा एखाद्या भिंतीजवळ, त्यांत दोन गोट्या टाकायच्या एकाने. मग दुसऱ्याने त्याच्या गोटीने त्यांतल्या गोटीला दहा फुटावरून मारायचे. एक गोटीला लागले तर एक पैसा, दोन्ही मारल्या तर अर्धा आणा. एकही मारली नाही तर त्या मारणाऱ्याने टाकणाऱ्याला अर्धा आणा द्यायचा. दिवस दिवस चालायचा हा खेळ. अर्थातच आमच्या आर्थिक शक्ती बाहेरचा होता हा मोठ्या मुलांचा खेळ.

उन्हाळयाच्या सुट्टीत कोल्हापूरला गेल्यावर आमच्या भावंडांच्या, म्हणजे, मामे आणि मावस भावंडे, बरोबर गेल्यावर त्यांच्या कायद्याने खेळायचे. तिथे दोन प्रकारच्या गोट्या, पिट्ट्या आणि दगडी. पिट्ट्या म्हणजे सिमेंटच्या आणि दगडी म्हणजे गारगोटीच्या. तिकडच्या चॅम्पियन कडे दगडी गोट्या असायच्या. तो आमच्या पिट्ट्या गोट्या आपल्या अट्टी ने सहज फोडायचा. अट्टी म्हणजे

a

गोटी बोटांत धरायची पद्धत हो! काही भाऊ चांगले "नेमाडे" असायचे. त्यांना आपल्या टीम मध्ये घ्यायला सगळे अटीतटी करायचे.

भोवरे. भोवरे लाकडाचे आणि त्यांना खाली स्टीलचे खिळे, अणी म्हणायचे त्यांना. काही भारीच तडतडे असायचे. मग त्यांची अणी उपसून काढायची आणि त्याच्या भोकांत काड्यापेटीची काडी किंवा कागदाचा गोळा घालून परत आंत ठोकायची म्हणजे भोवरा "मुका" होतो किंवा भुंगा होतो! काय टेक्नॉलॉजी होती बघा! भोवरा टाकताना मुंबईला लेडीज जाली आणि मॅन जाली असे दोन प्रकार होते. लेडीज जाली म्हणजे वाकून भोवरा टाकायचा आणि "जाली" म्हणजे त्याची दोरी ओढायची. मॅन जाली म्हणजे भोवरा खांद्यावरून टाकायचा. चॅम्पियन जाली म्हणजे उजव्या खांद्यावरून उजव्या हाताने डावीकडे भोवरा टाकायचा. सांगा, तुमच्या कडे होती का अशी टेक्नॉलॉजी?

भोवरा खेळतांना तसाच त्रिकोण आखायचा जमिनीवर. मग सगळयांनी भोवरे टाकायचे, एकदम. ज्याचा भोवरा थांबला त्याने भोवरा त्रिकोणात ठेवायचा. आपला टीम वाला असेल त्याने तो भोवरा बाहेर काढायचा, त्याच्या मॅन जालीने. नाही निघाला तर शत्रूच्या टीमचा चान्स. त्याने जर टच जरी केला तरी आपण आतच. बाहेर काढला तर तो त्याच्या भोवऱ्याने आपल्या भोवऱ्याला गुच्चा मारणार. त्याच्या भोवरा चिकटला तर मेलो! मग आपल्या

a

टीमवाल्याने तो सोडवायचा. नाहीतर ट्राम च्या रुळावर आपल्या भोवऱ्याचा अंत होणार. पाहिले, केव्हढा डेडली खेळ होता!

त्या काळांत माझ्या खिशांत दहा बारा गोट्या आणि भोवरा आणि त्याची जाली कायम असायची, अगदी झोपतांनाही. कधीतरी रात्री त्या गोट्या खिशातून बाहेर पडून जमिनीवर टकॉक टकॉक आवाज करत जमिनीवर पसरायच्या, मग दुसऱ्या दिवशी शोधून परत खिशांत! आमची संपत्ती होती ती!

पतंग. बापरे, त्याची टेक्नॉलॉजी एवढी महान आहे की आज पर्यंत ती पतंगांच्या लढाईत वापरांत आहे, त्याबद्दल न बोलणेच चांगले. आज काळबादेवीच्या एरियात लाखोंचा व्यवहार होतो पतंगांच्या लढाईचा आणि टेक्नॉलॉजीचा. आमच्या डोंगरी जेल जवळ पतंगांचे "कारखाने" होते, आजही असतील. पतंगांचे किती प्रकार, कौवा, फायटर, बच्चा, कागदी, कापडी, नायलॉनचे, असंख्य! तेवढेच प्रकार मांज्यांचे! चीन सारखा देश उतरला आहे त्या उद्योगात, म्हणजे बघा.

शाळेंत गेल्यावर चालत जाऊन आणि आपला ट्रॅव्हल अलाउन्स वाचवून छंद करायला आणखी मोकळीक मिळाली.

a

भिंगे, लोहचुंबक आमच्या वाटेवर, भेंडी बाजारांत आणि चोर बाजारांत मिळायचे. सिनेमाच्या फिल्मचे तुकडे आणि अखंड फिल्म्स ही मिळायच्या. फिल्मच्या रिळांतून फुटाच्या भावावर आणायचे. तोपर्यंत शाळेतही भिंगाचे उपयोग, लोहचुंबकाच्या प्रॉपर्टीज माहीत झाल्या होत्या. रस्त्यावर रॉकेलचे पंप करायचे कारखाने होते, त्यांच्याकडून पत्र्याच्या नळया मिळायच्या.

भिंगे आणल्यावर पहिला उपयोग अर्थातच डिसट्रकटिव्ह झाला. कपड्यांना, माझ्या टेबलाला सूर्य किरणांनी भोके पाडणे, कागदावर अशा भोकांचे डिझाइन करणे, चटके देणे घेणे इत्यादी. माझे टेबल म्हणजे काळया जळक्या डागांनी भरून गेले होते. एकदा मात्र भिंगाने कागद जाळत एक चित्र काढले. चांगले निघाले होते. मग बरीच अशी चित्रे काढली. काही तर शाळेत नेऊन सरांना आणि बाईंना दाखविली. त्यांनी त्याचे कौतुकही केले, एक नोव्हेल आर्ट म्हणून. मग हे सगळे करून झाल्यावर भिंगाने ग्रामोफोनच्या रेकॉर्डच्या ग्रूव्ह्ज पाहणे, मुंग्यांचे निरीक्षण करणे, अशी चित्रे करणे असे थोडे विधायक कार्य केले.

शाळेत शिकल्याप्रमाणे दोन भिंगाची दुर्बीण बनविणे अगदी सोपे होते. चार पाच बनविल्या. त्यातून आमच्या घरातून दिसणारे पन्नास स्क्वेअर यार्ड आकाश निरखीत बसत असू. नंतर एक प्रोजेक्टरही तयार केला. १०० वॅट चा एक बल्ब वापरून आणि दोन भिंगे, एक बल्ब ची फिलामेंट मोठी दिसायला

आणि दुसरे प्रोजेक्ट करायला, वापरून घरांत फिल्मचे तुकडे भिंतीवर प्रोजेक्ट करून बरीच मजा केली. प्रोजेक्टरचा दिवा आणायची ऐपत नव्हती आपली. एक भिंगाचा आणि एक पिन होल कॅमेराही केला होता.

लोहचुंबक तर एक खेळणेच. पत्र्याचा गोल डबा मागेपुढे करणे, फोनोच्या सुया उचलणे, मातीतून लोखंडाचे कण काढणे, पाटीवर पृथ्वीचे चित्र काढून लोखंडाची टाचणी रॉकेट म्हणून तिच्याभोवतो फिरविणे वगैरे प्रकारांनी स्वतः खेळणे आणि इतरांना दाखविणे हा एक टाईमपास होता. चांगला इंजिनीयर झाल्यावरही कलर टीव्हीच्या स्क्रीन वर लोहचुंबक फिरवून येणाऱ्या पॅटर्न पाहणे हा ही एक खेळ झाला. हळू हळू मुलांनी ती आयडिया उचलली, मग त्यांच्या मातीश्रींनी यावर बंदी घातली, टीव्ही मोडेल म्हणून.

विटी दांडू मात्र मुंबईत जमण्यासारखा नव्हता. एक तर त्याला मोठी जागा पाहिजे आणि दुसरे म्हणजे विटी म्हणजे मिसाईल. कुणाच्या काचा फोडल्या तर आफत यायचीच. मग गावाकडे कोल्हापूरला गेल्यावर भावंडांच्या कायद्याने खेळावे लागायचे. आणि ती तर भलतीच चलाख, सहज आम्हाला शेंडी लावायची. म्हणून हा छंद काही रुजला नाही.

शाळेतून येतांना दिसणाऱ्या मोटारीची मॉडेल सांगणे हा एक चालता चालतानाचा छंद होता.

फोटोग्राफी हा छंद खरा पार खर्चिक. त्याला कॅमेरा पाहिजे, फिल्मरोलचा खर्च, ती डेव्हलप करून आणायचा खर्च, पण त्यातले काही रिझल्ट इतके छान की वर्षोवर्षे टिकून राहणारे, आठवणींना उजाळा देणारे. माझ्या बाबांनी १९६२ मध्ये एक कोडॅक बेबी ब्राऊनी नावाचा कॅमेरा आणला होता. इंग्लंड मधून. छोटा होता, नुसता एम अँड शूट असा. बारा फोटो निघायचे एक फिल्मरोलवर. फिल्मरोल बाबांच्या खिशातून आणि फोटो माझे. खूप फोटो काढले त्याने. काही अर्थातच वाया गेले पण बरेचसे अजूनही आहेत आमच्याकडे. हा कॅमेरा वालचंद कॉलेजमध्ये असतांनाही आणला होता. त्यामुळे वालचंद कॉलेजच्या हॉस्टेल मधले फोटो बरेचसे त्याचेच आहेत. मित्रांचेही आहेत. आपल्या या ग्रुपवरही टाकले होते काही. आठवणी फार ताज्या झाल्या त्यामुळे. नंतर बरेच कॅमेरे घेतले आणि हजारो फोटोही काढले. पण तरुणपणीच्या त्या फोटोंची लज्जत न्यारीच.

SSC नंतर आणि सायन्स कॉलेजात गेल्यावर हे सगळे बंद पडले. वेळच नव्हता आणि सौंगडीही नव्हते हे करायला.

वालचंद कॉलेजमध्ये असताना चालत फिरायला जाणे हा एक आल्हाददायक छंद लागला. चालायची आवड आणि क्षमता तर होतीच,

a

शिवाय तिथे भिडूही मिळाले. मिरजेहून चालत येतांना हमखास सॅटेलाईट दिसायचे आकाशांत.

नंतर बऱ्याच काळाने कूपर मध्ये असतांना रीडर्स डायजेस्टचे एक संग्रहित मोठे पुस्तक वाचायला मिळाले. त्यांत पहिलाच सेक्शन अस्ट्रोनॉमीचा होता. ताऱ्यांची ओळख आणि त्यांचे प्रकार यावर फार छान माहिती वाचली. आणि या छंदाने आपली विकेट घेतली. आज पर्यंत आकाशदर्शन हा एक क्लास टाईमपास झाला आहे माझा. नंतर त्यावर जे मिळेल ते वाचण्याचे वेडच लागले मला. एक बायनोक्यूलर होता आमच्या सासऱ्यांकडे तो आणून आकाश बघत बसायचा छंद लागला. बायको अगदी वैतागेपर्यंत. नंतर इथे मुंबईतही आणला एक.

नंतर टीसीई मध्ये गेल्यावर एकदा बोरिवलीच्या नॅशनल पार्क मध्ये, एकदा चौक कर्जत रस्त्यावर आणि दोनदा वांगणीच्या शेतांत असे आकाश दर्शनाचे अतीव सुख घेतले. आता विचार करतो की वालचंदच्या आवारांत वीज गेल्यावर कसले सुंदर आकाश दिसत असेल. पण तेंव्हा काही सुचले नाही.

एक छंद मात्र किड्यासारखा घुसला आहे माझ्या डोक्यांत, तो म्हणजे वाचन. सातवी आठवी पासून आज पर्यंत त्याने मला आणि मी त्याला सोडले नाही. सातवीत शाळेच्या लायब्ररीतून, म्हणजे ती पुस्तकाची ट्रंक, थोर

हायरदाल चे कोन टिकी नावाचे पुस्तक वाचायला मिळाले. त्यानंतर निरनिराळया विषयांवरची पुस्तके वाचायचा छंद लागला. रीडर्स डायजेस्ट, पॉप्युलर सायन्स, पॉप्युलर मेकॅनिक्स, आयन फ्लेमिंग, असिमोव, जेम्स हॅडली चेझ, आर्थर हॅली, ऍलिस्टर मॅक्लीन, जे हातात पडेल ते वाचायची आवड लागली. मुंबईत फोर्टच्या फुटपाथवर पुस्तकांचे ढीग असायचे, कोणतेही पुस्तक दोन तीन पाच रुपये. मग तीही आणून काहीतरी संग्रही ठेवली होती, आत्ता आत्ता पर्यंत.

तर मंडळी, असे लागले छंद आपल्याला. काही छोटे तर काही मोठे. छंद सगळ्यांनाच लागतात, कोणी सांगतात, कोणी नाही.

आपण तर सांगतो बुवा. जसे आत्ताच सांगितले तसे.

# माझे पत्र जीवन

पत्र लिहिण्याची पद्धत फार जुनी आहे. आपल्या मनातले विचार दुसऱ्या पर्यंत पोहोचविण्यासाठी दुसरे उत्तम साधन नसेल. सगळ्या गोष्टी सांगता येतीलच असे नाही पण पत्रांत व्यक्त करता येतात.

खलिते, खुशालीची पत्रे, प्रेमपत्रे, सरकारी पत्रे, ऑफिशियल पत्रे, बिले आणि नोटिसा, आणि शेवटचे मायना सही नसलेले दुःखद पत्र. प्रत्येकाचा बाज वेगळा, भाषा वेगळी आणि मतलब वेगळा.

माझे पहिले पत्र मी तिसरीत असतांना शाळेतील प्रगती आईवडिलांना कळविण्याचे होते. एक कार्ड, त्यावर मायना, मजकूर आणि सही. मागे पत्ता लिहिलेला. शाळेतले प्रोजेक्ट होते.

"प्रिय आई, बाबा,
बालके श्रीरंग याचा साष्टांग नमस्कार विनंती विशेष
माझी शाळा सुरू असून मी शाळेला नीट जातो.
आमच्या बाई खूप चांगल्या आहेत. मी शाळेंत चांगला शिकतो.
कळावे, लोभ असावा ही विनंती,

आपला आज्ञाधारक

श्रीरंग"

हे पत्र कार्डावर लिहून पोस्टाच्या पेटीत टाकून घरी आलेले असले पाहिजे. त्याच्यावर पोस्टाचा शिक्का पाहिजे. मग ते नेऊन बाईंना द्यायचे. म्हणजे प्रोजेक्ट झाले. काही मुलांनी डायरेक्ट लिहिलेले पत्र आणले होते, ते बाईंनी पुन्हा पोस्टांत टाकायला लावले होते.

फक्त आम्ही "आज्ञाधारक" ऐवजी "अज्ञानधारक" असे लिहिले, आणि मग घरी आमची छानपैकी टिंगल झाली.

यानंतर एकदा पुण्याला सुट्टीला गेल्यावर आईला पत्र लिहिले होते. पाचवीत असतांना. मावशीने सगळे डिक्टेट केले होते. गाडीचा प्रवास, खंडाळा घाट कसा काळा काळा दिसला वगैरे.

त्यानंतर पत्र एकदम वालचंद कॉलेजला आल्यावर. दर आठवड्याला लिहीत असे. पत्र एकदम स्टॅंडर्ड. इतके की पाच पाच पत्रांचा मजकूर तोच. पण SE ला शैक्षणिक अपघात झाल्या पासून पत्रांचा मजकूर एकदम बदलला. आता खरी "प्रगती" जशी आहे तशी  लिहून पाठवायला लागलो. भाबडेपणा

a

थोडा, म्हणजे बराच, कमी झाल्याने कुठली बातमी कशी द्यायची याची कल्पना येऊ लागली.

SE ची दुसरी टर्म तशी अवघडच होती, त्यामुळे थोडे टेन्शन असायचेच. घरी सगळ्या बऱ्या वाईट गोष्टी हातचे न राखता लिहीत असे. कधी कधी फार गिल्टी वाटायचे. मग आईला पत्र लिहून सविस्तर कळवत असे. एकदा फार इमोशनल पत्र लिहिले होते. समोरा समोर बोलू शकलो असतो की नाही ते सांगता येत नाही. पत्रांत मात्र सविस्तर लिहिले. पण आई बाबांचा मोठेपणा म्हणजे एक शब्दानेही कधी टीका केली नाही.

मला बहुधा माझी आईच पत्र लिहायची. भावा बहिणींनी कधी नाही लिहिली ती. माझीही पत्रे बहुधा आईलाच असायची, पत्ता मात्र बाबांचा. पत्र लिहितांना कधी कधी खेळ करायचे, गोल गोल फिरणारे पत्र त्यांतले एक. एसेस्सीला असतांना एक धड्यांत एक कोड सिस्टीम सापडली होती, कधी त्या कोडमध्ये पत्र लिहायचे, मग घरी ते वाचायला तासभर लागायचा.

नंतर नंतर पत्रावर एक ताऱ्यांची खूण करीत असे. ती पाहून पत्र उघडणाऱ्याला आत काय आहे त्याचा अंदाज येई. पण TE नंतर सगळे आलबेल झाले आणि बहुतेक सगळी पत्रे सेफच झाली, काही काही तर छानच झाली. अगदी बीई मेक झाल्यावर, नोकरीला लागल्यावर एकदा साफसफाई

करतांना सगळी पत्रे एकत्र सापडली. नीट ठेवली होती ती. वाचून तडक त्या त्या वेळच्या भावना जाणवल्या.

आमच्याकडे पत्र वाचून झाकल्यावर एका तारेला टोचून ठेवण्याची सिस्टीम होती. अगदी तळचे पत्र चार पाच वर्षापूर्वीचे असायचे. जुनी पत्रे वाचायला मजा यायची.

सगळे जमले पण प्रेमपत्र कधीच नाही जमले लिहायला. आपला तो पिंड नव्हे. आमची रास मेष, स्वभाव तडक फडक. ती त्याची ती अपेक्षित भाषा, तो मजकूर, संकोच वाटायचा लिहायला आणि वाचायला सुद्धा. ते वीर धन्य असोत ज्यांना जमले हे करायला ते.

अगदी पत्नीला लिहिलेली पत्रेही रुक्षच असायची, असे तीही म्हणायची.

फोन नव्हते एवढे तेंव्हा, त्यामुळे सविस्तर पत्रे लिहिली जात असत. मायन्यांत प्रिय, आदरणीय, किंवा काहीच नाही. सा.न.वि.वि, स.न.वि.वि, सप्रेम नमस्कार, सस्नेह नमस्कार, अनेक आशीर्वाद. किती छान प्रकार होते पत्र सुरू करायचे. मजकूर, त्याची भाषा कोणाला लिहितोय त्यावर अवलंबून, खाली आपला, तुमचा, तुझा, तुझाच, आपला, आपलाच, आणि सही ठोकून द्यायची. झाले पत्र.

आजकालचा २४० कॅरॅक्टरचा जमाना नव्हता, त्यामुळे पत्र चांगले लांबलचक असायचे. आणि शब्दांचे शॉर्टफॉर्महीं नव्हते, त्यामुळे आपला माणूस वाटायचा, वाचणारा आणि लिहिणारा.

शिक्षणाची भाषा शाळेत संस्कृतप्रचुर मराठी आणि कॉलेजमध्ये राणीची इंग्लिश. दोन्ही आपल्याला चांगल्या येत, त्यामुळे पत्रांत चुका फारश्या नसायच्या. पत्र वाचतांना मजकूर जेवढा महत्वाचा तशीच लिहिण्याची स्टाईल आणि भाषाही. मग पत्र वाचायला मजा येते. नाहीतर मोडके तोडके लिखाण, चुकीचे शब्द, काळ, वाक्य, व्याकरण अलंकार यांचा पत्ता नाही. असे वाचले की त्यांतला गोडवा जाणवत नाही.

पुढे ऑफिसची पत्रे लिहितांना रुक्ष कसे लिहावे, गोल गोल मतलब कसा आणावा, सरसकट खोट्या भावना कश्या लिहाव्या यांत पारंगत झालो.

डियर सर, रिस्पेक्टेड सर, युअर एस्टीम्डसेल्फ, युअर सिंसीयरली, युअर फेथफुली, बेग युअर पार्डन, गिव्हिंग यू अवर बेस्ट अटेन्शन ओल्वेज वगैरे बेधडक लिहू लागलो. लिहिणाऱ्याही माहिती आणि वाचणाऱ्यालाही माहिती की काय प्रेम उतू जातेय ते. पण ऑफिशियल पत्र असेच लिहितात ना! इंग्रज

शिकवून गेले आम्हाला, खोटे कसे सफाईदारपणे लिहायचे ते. पत्र म्हणजे फक्त एक रेकॉर्ड तिथे. पोहोचले की लागू झाले.

मोठ्या लोकांनी दुसऱ्या मोठ्या लोकांना लिहिलेली पत्र वाचली आहेत काही. शास्त्रज्ञ लिहितात असे. आपले काम, शोध दुसऱ्यांना लिहून त्यांनी मान्यता दिल्यावरच प्रसिद्ध करायचे असा त्यांचा दंडक आहे म्हणे. आणि आपल्याकडे नेहरूंनी इंदिरेला लिहिलेली पत्रे तर डोक्यावर घेतली होती काही लोकांनी. त्या पत्रांचा मतलब आणि संदेश डोक्यावरून गेला असावा त्या डोक्यावर घेणाऱ्यांचा.

पत्रातून कितीतरी सिक्रेट पाठविता येतात. वाचता आला तर आली, नाहीतर साधी गोष्ट समजायचे.

आता आला जमाना इमेल आणि व्हॉटसऍप चा. तिथे तर प्रिय किंवा आपला म्हणायची गरजच नाही. चार वाक्ये टाकली, झाले. कॉन्टॅक्ट वाढले आहेत भरपूर पण नात्यांचा आणि मैत्रीचा गोडवा कुठे गेला आहे?

आजकाल पत्र फक्त दोन तीन प्रकारचीच येतात, इन्शुरन्सवाली, पोर्टफोलिओवाली, नाहीतर टेलिफोनची किंवा गॅसची बिले. टॅक्सवाल्यांची

धमकावणीची पत्रेही आजकाल कमी झाली आहेत. आता ते ऑनलाईन, इमेल किंवा एसएमएसनीच धमकावतात आता.

नाही म्हणायला आमच्यासारख्या पेन्शनवाल्यांना प्रेमपत्रे येतात अजून, जीवंत आहे ते सिद्ध करा म्हणून. एकाकडून नाही अनेकांकडून. एलआयसी, माय बाप सरकार आणि असेच.

पण ती तरी येतात आपल्या नावाने. त्यांच्याकडे पाहून गोड मानून घेतो आपला.

# व्यवस्थितपणा

शाळेत एक धडा होता, "व्यवस्थितपणाचे वेड", त्यांत त्या लेखकाने व्यवस्थितपणाची भरपूर टिंगल केली होती. "काय हे गृहस्थ, केवढे त्यांचे व्यवस्थितपणाचे खूळ".

शाळेचा धडा होता मुकाट्याने शिकणे भाग होते, नाहीतर बाई रागावून शून्य मार्क द्यायच्या. आधीच आम्ही असे, त्यांत शून्य मार्कांची वही घरी पाहिली तर सलून मध्ये जायची पण गरज नाही. चांगले महिने दोन महिने केशकर्तनकाराचे मुखदर्शनही नको.

पण त्या लेखकाने अशी व्यवस्थितपणाची चंपी का केली असावी? तो स्वतः गबाळा असला पाहिजे.

व्यवस्थितपणा हा मनुष्याचा एक गुण किंवा दोष आहे. प्रत्येक गोष्टीला जागा आणि प्रत्येक गोष्ट तिच्या जागेवर, हे सर्व ठीक आहे. जर असे असेल तर मग घरांत आपल्याला कामच काय? घर जर "आवरले" असेल तर गोष्टी मिळेनाश्या होतात त्याचे काय कारण असावे बरे?

घरच्या मालकिणीकडे बघा. घरांत, स्वैपाकघरांत तिला सगळे सापडते सगळे. एकदा स्वैपाकघरांत जाऊन वस्तू शोधावी त्या गृहसम्राटाने, कळेल कोण व्यवस्थित आहे आणि कोण नाही ते.

आमच्या नातवाने काहीही न बोलता आम्हाला खूप गोष्टी शिकविल्या. त्याच्याकडे वीस मोटारी आहेत. त्यांनी तो घाट घाट खेळतो. पहिल्यांदा सगळ्या मोटारी एकसाथ लाईनमध्ये पार्क करायच्या. मग एक एक मोटार घाट चढून आणि उतरून येणार आणि तिच्या स्लॉट मध्ये पुन्हा पार्क होणार. मग दुसरी. अशा वीस एका सेशन मध्ये. डब्यातून गाड्या काढल्या की बरोबर त्याच क्रमाने पार्क करतो, रंग ही ठराविक क्रमाने. आता याला हे कुणी शिकविले? म्हणजे व्यवस्थितपणा अंगचाच असतो.

कोणी कोणी व्यवस्थित असण्याला सवय म्हणतात. ही सवय चांगली की नाही हे गौण. शाळेच्या वह्यांना एक रंगाची कव्हरे, नीट अक्षरांत नाव इयत्ता शाळा लिहिलेली, उघडून पाहिली तर वही टिपटॉप, कुठेही शाईचे डाग नाहीत, पुस्तकेही तशीच, टिपटॉप. काय म्हणाल या सवयीला? ज्यांना टिंगलच करायची आहे ते म्हणतील, "वापरलीच नाहीत वह्या पुस्तके तर नीट राहणारच."

पण व्यवस्थितपणाला दोन मार्क असायचे. ते तरी मिळवायचेच.

एखादा प्रतिभावान आहे, अभ्यासात, कामात अगदी टॉपचा आहे, हुशारी तर आईन्स्टाईन सारखी, पण कपडे गबाळे, कामाचे टेबल म्हणजे ढिगारा ठेवायची जागा, बॅग, ट्रंक सामानाने कशीतरी भरलेली, चष्मा न पुसलेला, केस अस्ताव्यस्त. काय म्हणाल अशा व्यक्तीला, "ते सगळे छान आहे हो, पण थोडासा व्यवस्थितपणा पाहिजे माणसांत".

दुसरा एकदम टिपटॉप. कपडे स्वच्छ, इस्त्री केलेले, बुटाला पोलिश, दोन पेने खिशाला बरोबर त्याच ठिकाणी खोचलेली, केस एकदम जाग्यावर, पण डोक्याने असातसा, कामांत सो सो, तर काय म्हणणार? "सगळे व्यवस्थित आहे, पण थोडेसे कामही आले तर बरे".

एखाद्याच्या ऑफिस मध्ये जाऊन टेबल बघा त्याचे. लगेच आयडिया येईल त्या व्यक्तीबद्दल. टेबलावर कागदांचा ढिगारा, कॉम्पुटर, कीबोर्ड पसरलेले, टेबलाच्या टॉप ने कधी सूर्य पाहिला आहे की नाही अशी अवस्था.

आणि तो दुसरा बघा, टेबल स्वच्छ, एकही कागद इकडे तिकडे पडलेला नाही, कॉम्प्युटरचा कीबोर्ड, माउस नीट खोचून ठेवलेले, टेबलाची काच झळकत असलेली. इन ट्रे, आऊट ट्रे रिकामे, खुर्चीही टेबलाच्या पोटांत घालून ठेवलेली.

दोन चित्रे, एक हुशार आणि कामसू पण गबाळा, अव्यवस्थित आणि दुसरा एक तर अतिशय कामसू, लगेच करून टाकणारा, किंवा दुसऱ्याकडे काम लगेच पाठविणारा, किंवा कोणी त्याला कामच देत नाही असा, पण टिपटॉप म्हणजेच व्यवस्थित.

काय म्हणता? काय तुमचे मत, व्यवस्थितपणा थोडेतरी ज्यास्त मार्क मिळवितो की नाही.

ज्या ऑफिस मध्ये दवंडी पिटायला लागते की आज टेबले नीट करा, गेस्ट येणार आहेत, ते ऑफिस धन्य असो. पण अशी दवंडी पिटल्यानंतर जी काही हालचाल सुरू होते की बास. काम रहाते बाजूला आणि वर्षनुवर्षे साठलेले कागद बाहेर येतात. हरवलेली सर्टिफिकेट्स सापडायला लागतात आणि न पाहिलेले मेमो ज्यावरून कधीतरी रणांगण माजलेले असते ते सापडतात आणि गुपचूप केराच्या टोपलीत जातात. या रणधुमाळीत साहेब लोकही सामील होतात, मग आपल्याला नको ती रिमाईंडर यायला सुरुवात होते. संध्याकाळी केर काढणाऱ्याची टोपली किंवा ड्रम पूर्ण भरून जातो आणि ऑफिस थोडे हलके होते.

a

व्यवस्थितपणा कधी दोष ही ठरतो. काही लपून रहात नाही. किल्ली कुठे शोधायची, पासवर्ड काय असेल, कधी येईल, कधी जाईल याचा परफेक्ट अंदाज करता येतो. त्याचे बरेचसे छुपे राहतच नाही.

पासवर्ड आणि व्यवस्थितपणा याचा छत्तीसचा आकडा. व्यवस्थित माणसाचे पासवर्ड म्हणजे बायको मुलांची नावे त्यांच्या जन्म तारखा किंवा आपला एम्प्लॉयी कोड. थोडा विचार केला की झाला क्रॅक. तेच गबाळे दिसणारे हुशार लोक नेहमीच पुढे असतात या बाबतीत. कधी कधी न सापडणारी गोष्ट हमखास सापडते त्यांच्या कडे त्यांनी कधी टेबल न आवरल्यामुळे, मग सगळे त्यांचा हा जपून ठेवण्याचा "गुण" जपावा असे वाटायला लागते.

व्यवस्थित व्यक्तीही सांभाळून ठेवण्यांत चांगली तरबेज असते. "अमुक तारखेला अमुक गोष्ट झाली होती ती आहे का?" चे उत्तर नेहमी "हो" असेच येते आणि मग त्यांचा सत्कार होतो, "किती सिस्टीमॅटिक आहे पहा" म्हणून.

आज व्यवस्थितपणाही कॉम्पुटराईझ्ड झाला आहे. वेळच्या वेळेला बॅकअप, डेटा नीट सॉर्ट केलेला, मागाल तेंव्हा इन्फॉर्मेशन, असे लोक आवडतात साहेब लोकांना.

माणसाने व्यवस्थित असावे पण प्रेडिक्टेबल असू नये.

गुप्तहेर गबाळा ड्रेस घालतील, बावळट चेहरा असेल पण त्यांचे काम व्यवस्थित असेल तर तो सगळ्यांना हवा.

ऍबे लिंकन महाहुशार वकील होता, त्याच्या ऑफिस मध्ये एक पोते ठेवलेले होते, कुठलीही चिठ्ठी चपाटी शोधायची तर त्या पोत्यांत पहायचे, दहा दहा वर्षांपूर्वीच्या चिठया बरोबर सापडत त्यांत अशी आख्यायिका आहे. बाकी लिंकनला कुणी व्यवस्थित म्हटले नसते.

मी कसा आहे? थोडा अतिव्यवस्थितच. आमचे ऑफिस मधले टेबल नेहमी मोकळे, काच नेहमी चकाचक. टेबलावर एकही बिन कामाचा कागद मिळणार नाही. डिझाइन, ड्रॉईंग्ज करतांना रेफेरन्स मटेरियल लागायचेच, पण काम झाल्यावर ते नाहीसे व्हायचे. नशिबाने आम्हाला कामाचा झपाटाही देवदत्त होता, त्यामुळे कामही होई आणि टेबलही रिकामे दिसे. पुढे स्पेशल स्किल्स आणि कोअर कॉम्पिटनसी असल्यामुळे कन्सल्टंट झाल्यावर तर एकांडा शिलेदार होतो, एकट्याने काम करायचे, त्यामुळे दुसऱ्यांना काम वाटून द्यायची वेळच आली नाही.

आपले आपण कौतुक करू नये. पण आपला एखादा गुण दोष सांगायला काही हरकत नसावी.

कुठल्याही गोष्टीचा अतिरेक म्हणजे वेडच. व्यवस्थितपणाचे वेड ही त्यातलाच प्रकार. त्या मानवाला इकडची गोष्ट तिकडे झालेली खपत नाही. डोळे मिटून हात घाला, वस्तू मिळाली पाहिजे असा त्याचा आग्रह असतो.

असेही असतील की जे म्हणतील की व्यवस्थितपणात जी एनर्जी घालवायची ती कार्यांत घालवू की.

विश्वांत काय दिसते? केयोस, chaos, की व्यवस्थितपणा, order? शास्त्रज्ञ अव्यवस्थितपणात व्यवस्थितपणा शोधतात. त्या सगळया विश्व गोंधळात सिस्टीम शोधतात. सिस्टीम समजायला चांगली, गोंधळ गोंधळवतो! आता लावा अर्थ तुम्हीच की व्यवस्थितपणा चांगला की नाही ते.

तसे का असेना. पण व्यवस्थित असल्याने कुणाचे नुकसान झाल्याचे ऐकिवात नाही. आपल्याला आवडतो व्यवस्थितपणा.

# कवींचे साम्राज्य

आपल्या मनांतील विचार प्रकट करायची साधने म्हणजे संभाषण आणि लेखन. दोन्हीमध्ये समान धागा म्हणजे गद्य आणि पद्य. गद्य म्हणजे सरळसोट, लाईनशीर वाचत जायचे अर्थ लावायचा आणि पुढच्या वाक्याकडे जायचे. पद्य म्हणजे काव्य, गीत, ते वाचायला आणि समजायला मागे पुढे करावे लागेल कदाचित. म्हणजे लेख हे टेप सारखे असतात तर काव्य सीडी सारखे असते.

लेख काय किंवा काव्य काय, किती जोरदारपणे मांडले आहे त्यांत त्याचा जीव असतो. भले ते लिखित असेल किंवा मौखिक असेल.

प्रत्येक मनुष्याला देवाने सूर आणि लय याचे ज्ञान दिले आहे. लेख असो की काव्य, त्यालाही सूर ताल असतोच. लेखक एका लाईनमध्ये विचार करतो तर कवी वळणे वळणे घेत. त्यामुळे लेख आणि काव्य यांचे चाहते वेगवेगळे असू शकतात.  उपमा, उत्प्रेक्षा, छंद, ताल हे भाषेचे अलंकार. ते दोन्हीतही असतातच.

जे विचार अलंकारीत प्रकट करता येत नाही ते मुक्तछंदात प्रकट करता येतातच. म्हणजे विचार प्रकट करायला काही बंधने नाहीत. दुसरे म्हणजे त्याला

काही लिमिट नाहीतच, "न देखे रवी, ते देखे कवी". फक्त कल्पनाशक्ती, दुसरे काही लागत नाही त्याला.

समजा एकाने लिहिले आहे -

"एक माणूस वनातून जात होता, त्याने पाहिले की एका हरणाला वाघाने पकडले आहे आणि तो आता त्याचा जीव घेणार हे निश्चित. यालाच म्हणावे जीवः जीवस्य जीवनं ".

दुसरा लिहील -

"जात होतो मी वनातून, व्याघ्र पकडी शावकाला
काय करावे ना उमजे, मला आणि त्याला
आयुष्य त्याचे व्याघ्र घेई, गेला याचा प्राण
याला जीवन ऐसें नाव, हे तू निश्चित जाण".

एकच कथा, दोन स्वरूपांत, पण वेगळ्या भावना जागविते, कारण माध्यम वेगळे. एकांत फक्त कथा आहे तर दुसऱ्यांत कथा आणि भाव. एक लेख आहे आणि दुसरे काव्य.

कवी आपल्या भावना ज्यास्त जोरदारपणे मांडू शकतो, त्यामुळे कवींचे कथन लोकांत ज्यास्त भिनते, लेखकाला ते भिनण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. पहा, जगांत निबंधकार कमी आणि कवी ज्यास्त आहेत.

मागे वळून पहा, इतिहासांत कवींचे साम्राज्य आहे. जगभरांत सगळीकडे. अगदी विज्ञानातही. ज्यावेळी पृथ्वी गोल असण्याची आणि कोपर्निकसची सूर्यकेंद्रीत सृष्टीची कल्पना लोकांच्या गळी उतरवणे अवघड झाले होते तेंव्हा काव्याचा आधार घेऊन त्यांनी रचना केल्या आणि आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवले. "द डिव्हाईन कॉमेडी" ही ती रचना.

कवींचे नेहमी कौतुकच झाले आहे. रामायण, महाभारत, इलियड, ओडिसी ही महाकाव्ये आजही मानली जातात. मोठे मोठे निबंध काळाच्या कुशीत गडप झाले पण महाकाव्ये आणि गीते आजही तरली आहेत, यातच काय ते आले.

सर्वसाधारणतः कवीच ज्यास्त लक्षांत राहतो, लेखक तसा कमीच. कवींनी कलांना जी प्रेरणा दिली आहे ती लेखकांनी जरा पहावीच.

१९६० साली नवरंग नावाचा चित्रपट आला होता. एक कविमनाचा मनुष्य आपल्या साध्या सुध्या पत्नीमध्ये आपली कल्पना पाहतो आणि स्वप्नरंजन करीत काव्य रचना करीत राहतो. कोणीही त्याला फारसे मानत नाहीत पण

a

एकदा राजाच्या दरबारांत एक राजगायक त्याची कविता आपल्या पद्धतीने गातो आणि हा कवी एकदम प्रसिद्ध होतो. पण अंतर्मनात तो तसाच राहतो आणि शेवटी त्याच्या साध्या सुध्या पत्नीला कळते की कल्पनाही तीच आहे आणि वास्तवही तीच आहे.

सर्व कविराजांनी आपले साम्राज्य पसरविले आहे. चित्रपट, नाटक, मेळे आणि कविसंमेलने सगळे व्यापलेले आहे. अध्यात्म, प्रेम, जीवन, वास्तव, कल्पनाविलास, भक्तिमार्ग, काय प्रकट केलेले नाही कविराजांनी? अफाट आहे त्यांचे साम्राज्य. जगभर पसरलेले आहे ते.

साम्राज्य म्हटले की सम्राट आलेच आणि सेनापती, सैनिक आणि ती दुबळी जनता ही आलीच. काव्य संमेलनाला जावे, "कवी संमेलन दोस्त बडा झगडा होता है", दिसून येईल. पण ही लुटुपुटूची लढाई, त्यांत रक्तपात नाही, हां, थोडा बहुत शाब्दिक रक्तपात असेल कधी कधी.

कवींच्या साम्राज्यांत वास्तविकतेला फारसे स्थान ही नसते आणि फारशी किंमतही नसते असे जे आपण समजतो ते बरोबर नाही. काव्य जसे कल्पना फुलवू शकते तसेच वास्तवही तेवढ्याच शक्तीने दाखवू शकते.

a

पोवाडे जी स्फूर्ती निर्माण करू शकतात, ज्वलंत कवी काय करू शकतो ते इतिहासाने पाहिले आहे. राजांचे, वीरांचे पोवाडे ऐकून बाराबंदीचे बंद तुटल्याची उदाहरणे दंतकथा सांगतात. त्याला अजून जोश येण्यासाठी "मर्दाचा पोवाडा मर्दानेच ऐकावा", अशी डिवचणीही लावलेली असते.

जेंव्हा समाज जीवन थंड गोळयासारखे झालेले असते तेंव्हा "अशी तुतारी द्या मज आणून, जी मी फुंकीन स्वप्राणाने, भेदून टाकीन सगळी गगने, दीर्घ तिच्या त्या किंकाळीने", असे म्हणून राष्ट्रकवींनी लोकांत जोश भरला आहे.

रेडिओ वर अशी राष्ट्रगाने, स्फूर्तिगीते ऐकली आहेत की नाही १९६२, १९६५ आणि १९७१ मध्ये. त्यावेळी भाषणे नाहीत, काव्यगाने आणि देशप्रेमाची गीते ऐकली आपण. आठवते ना? लोकांत जोश जगविण्यासाठी कवनाचाच आधार घेतला.

"अपनी आझादी को हम हरगीज मिटा सकते नही, सर कटा सकते हैं लेकिन सर झुका सकते नहीं।"

"मेरे देश की धरती सोना उगले, उगले हीरे मोती"

"माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमचे सुरू, जिंकू किंवा मरू"

आणि अशी असंख्य गीते आज ही हृदयांत जाऊन बसलेली आहेत.

ज्यावेळेला राज्यकर्ते शक्तीवान होते तेंव्हा कवितेच्या, नाट्यगीतांच्या, चित्रपट गीतांच्या माध्यमातून कवींनी त्यांना विरोध केला आहे. इतका की नाटकेच्या नाटके त्यावेळी बंदीला सामोरी गेली.

"जेथ मित्रा तत्वार्थ पाहण्याला दृष्टी नसते भूपाल लोचनांला

तिथे वक्त्याला दैन्य रोंकडे ते, समज अथवा बहु निंद्य मरण येते", असे म्हणून कवींनी राज्यकर्त्यांवर प्रहार केला आहे.

कवी साम्राज्यांत कवी कोमल, कठोर, मृदू, कठीण, पुष्पप्रेमी, खडगप्रेमी, स्वमग्न आणि समाज सुधारकही होतो. आपण हे सारे आहोत, ओळखायला थोडा वेळ लागतो आहे एवढेच.

कवी किंवा लेखक व्हायला शिक्षण नाही, भावना पाहिजे. संत जनी, बहिणाबाई काही मोठ्या शिकलेल्या नव्हत्या, जुजबी शिक्षण घेऊनही आपल्याला हे करता येते.

तुम्ही कवी आहात, सिद्ध करतो, पहा.

a

नातवंडांच्या कडे पहा, "जगू माझा शाणा, मोत्याचा दाणा, खांद्यावरती बसतो, माझे डोके पुसतो!".

सगळ्यांनी केले आहे असे कवन. काय त्याला लागले? पण नातवंड खूष झाले त्याने.

आपल्या सर्वांत काव्य भावना आहे, काही विकसित कमळे आहेत तर काही कमलकळीसारखे. त्या भावनेला जगवा आणि जागवा. स्वतःला प्रकट करा.

या कवी साम्राज्यांत आपल्याला खूप जागा आहे, वाव आहे, तिचा उपयोग करूया.

# चंद्राच्या मागे

चंद्र पृथ्वीचा मुलगा आहे असे आता खगोलवैज्ञानिकही मानू लागले आहेत. चार बिलियन वर्षांपूर्वी ग्रहांच्या धडका धडकी मध्ये मंगळाच्या आकाराचा एक बनता ग्रह पृथ्वीला धडकला आणि मोठ्या प्रमाणांत खडक धूळ उसळवून तिच्यांत सामावला गेला. ते खडक आणि धूळ अंतराळात उडाली पण पृथ्वीच्याच भोवती फिरत राहिली. आणखी लाखो वर्षांनी ती फिरत असतां हळू हळू एकत्र येऊन त्याचा आणखी एक ग्रहगोल बनला आणि तो पृथ्वी भोवती प्रदक्षिणा करीत राहिला. तो चंद्र.

त्यावेळची पृथ्वी आणि चंद्र वितळलेल्या खडकांचे गोळेच होते. आणखी लाखो वर्षांनी ते हळू हळू थंड होत गेले आणि त्यांची कवचे साकळली. त्या वेळेला चंद्र पृथ्वीच्या खूपच जवळ होता आणि पृथ्वीचा दिवस अठरा ते वीस तासांचाच होता. पण पुढील अध्यायांत धूमकेतू आणि लघुग्रहांचा वर्षाव सुरू झाला. दोघेही त्या वर्षावांत नाहून गेले, पण पृथ्वी होती मोठी आणि चंद्र लहान. पृथ्वीने ते धूमकेतू आणि लघुग्रह पचविले. चंद्र होता लहान, त्याला काही ते जमले नाही. पृथ्वी भोवती वातावरण आणि सागर निर्माण झाले, चंद्र कोरडाच राहिला. त्याला काही ते वातावरण धरून ठेवता आले नाही. त्याने सागरांत मोठ्या भरत्या आणि ओहोट्या मात्र केल्या आणि त्यांचा परिणाम म्हणून तो

a

हळू हळू दूर गेला, आत्ता आहे तिथे. याचा दुसरा परिणाम म्हणून पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी झाला आणि चंद्राचाही. आणि चंद्र लॉक झाला, एकच चेहरा पृथ्वीकडे ठेवून प्रदक्षिणा घालू लागला.

आपल्या हयातीत माणूस चंद्रावर गेला आणि आपली पावले तिथे उमटविली. पण ती आपल्या बाजूला.

हा झाला वास्तव विलास.

आता कल्पना विलास.

इकडे आमच्या पृथ्वीवर मिळवलेल्या धनसंपत्तीचे काय करायचे अशा विवंचनेत पडले आहेत कित्येक जण. कॉम्पुटरही मोजू शकणार नाही इतकी संपत्ती मिळविलेली आहे त्यांनी. ती इन्व्हेस्ट करायला पाहिजे कुठेतरी, ती सुद्धा लोकांच्या दृष्टीआड. पृथ्वीवरची जमीन घेऊन झाली, तिचा सांभाळ करणे किती अवघड आहे ते समजून झाले. कधी कोण डल्ला मारील ती शाश्वती नाही. एक जागा आहे, मस्त थंड, गरम ठिकाणी आहे, ताऱ्यांच्या खाली, अखंड विश्व दर्शन, कुणाचीही दृष्टी कधीच पडणार नाही तिथे, अगदी पृथ्वीवरच्या टॅक्सवाल्यांचीही नाही. चांदोबाच्या मागे!

a

अजून चंद्रतारे विकायला काढले नाहीत, त्यामुळे अजून कायदे कानूनही नाहीत तसे. हम करे सो कायदा चालेल तिथे. जागा उत्तम आहे, व्हर्जिन आहे, मस्त रात्रीचे आकाश दिसते तिथून, कुठलाही गोंगाट नाही, अगदी रेडिओ गोंगाटही नाही. जागा एकरांत नाही, स्क्वेअर माईल्स मध्ये मिळते आहे, घ्याल तेवढी जमीन तुमची, अजून एजंट नाहीत त्या जागेचे. त्वरा करा. घेईल त्याची जागा आहे. किंमत? पैशांत नाही काढली अजून. विकणार कोण?

तुमच्याकडे एक स्पेसपोर्ट पाहिजे, एलोन मस्क देईल तुम्हाला रॉकेट. लँडरही करून मिळतील. जाण्या येण्याचा, परत येणार असाल तर, आणि सामान सुमान नेण्याचा खर्च तुमचा. तिथे डॉलरला दगडाचीही किंमत नाही. जागा, गुहा, पाणी, बर्फ, शोधून मिळेल. जायचे, हवी ती गुहा निवडायची, दारेबिरे बांधून घ्यायची, मातीतून ऑक्सिजन, पाणी काढायचे, शेती करायची, संध्याकाळ साठी बर्फ खूप आहे तिथे. मस्त रहायचे. वाट्टेल तेवढी पॉवर आहे तुमच्या अंगणात, तो सूर्य कधीही दगा देणार नाही. उगवे पासून मावळे पर्यंत वीजच वीज. साठवून ठेवायची बॅटरीत.

कंटाळा आला तर स्पेससूट चढवायचा, मस्त एक चालत दहा वीस मैलांची चक्कर मारून यायचे. गुडघे, कंबर अजिबात दुखणार नाही, तुमचे वजन खूपच उतरलेले असेल, ६६ किलोचा माणूस ११ किलोचा झालेला असेल. सुपरमॅन सारखी शक्ती असेल तुमच्यांत. फक्त परत वजन वाढवायचे नाही.

तिथून पृथ्वी दिसणार नाही. त्यामुळे इकडची लफडी, मारामाऱ्या, पोल्यूशन, ते राजकारणी, कुठलीही काळजी लागणार नाही तुमच्या मागे. फक्त एकदा सूर्य उगवेल आणि दोन आठवड्याने मावळेल मधले ते दहा दिवस सांभाळा, शक्यतो उन्हात जाऊच नका. मधून मधून भूकंप होतील, पण घाबरू नका, तुमची गुहा काही पडणार नाही.

तुम्ही तिथे जाणार असाल तर एक सॅटेलाईट सोडून ठेवा पृथ्वी आणि चंद्राच्या लाग्रेनजियन पॉइंटला. कम्युनिकेशन अशुअर्ड! स्वतःचा तो सॅटेलाईट असेल, तो दिसला की फोन लावायचा.

तिथे टॅक्सचे रेट अजून ठरलेले नाहीत त्यामुळे वाट्टेल तेवढा पैसा आणि संपत्ती ठेवू शकता तुम्ही. टॅक्सवाल्याने नोटीस पाठवलीच तर त्याला सांगा येऊन भेट, मांडवली करू म्हणून. पण तो कसचा येतो, त्याला बकरे आहेत इथेच खूप.

पण जरा जलदी करा. तिथे आत्ताच कोणी कोणी जायला लागलेत. उगाच भांडण नको अश्या लोकांबरोबर. फक्त वैज्ञानिक आले आणि तुमच्या जवळ पासची जागा घेतली त्यांनी तर घेऊ द्या त्यांना. अगदी हार्मलेस आणि निरुपद्रवी असतात ते. त्यांना फक्त दुर्बिणी लावायच्या आहेत तिथे.

आमचे इंजिनिअर लोकही येतील तिथे काम करायला. ते बिचारे कुठेही जातात  जगभर आणि काहीही काम करतात. आणि कसेही कुठंही राहतात, फार काही लागत नाही त्यांना. त्यांना मात्र नीट सांभाळा. खूप मदत करतील तुम्हाला, आणि ती सुद्धा तुमचे हात पाय न मागता, अगदी स्वस्तात. त्यांना काही लागत नाही, दोनवेळा जेवण आणि निश्चिन्त वातावरण, बास. वाट्टेल ते करून दाखवतील आणि देतील तुम्हाला.

ते इंजिनिअर आले तुमच्याकडे तर चहा पाणी झाल्यावर त्यांना नक्की विचारा कुठून झाले इंजीनियर ते. सांगली म्हणतील कदाचित. इंडियात आहे ते.

चांगले सज्जन लोक आहेत ते. चांगले मनोरंजनही करतील तुमचे, गाणीबिणीही गातील तुमच्या बरोबर.

परत यायचा विचारच करू नका. खरा स्वर्ग आहे तिथे, ताऱ्यांखाली.

# शुद्धलेखनाचे महत्व

बोलीभाषा आणि लेखीभाषा यांत एक फरक आहे. बोलीभाषेत आपण काहीही म्हटले तरी दुसऱ्याला लगेच समजते. लेखीभाषा नियमांच्या साखळदंडांनी जखडलेली असते. असेच लिहा तसेच लिहा, प्रास, अनुप्रास, व्याकरण, काळ, शब्दांचा उपयोग, परभाषाशब्द, परिभाषा, वाचन सुलभता, विचारांचा प्रवाह वगैरे नियमांनी बांधलेली असल्यामुळे लेखक आणि वक्ता यांच्यांत बरेच अंतर पडते.

व्याकरणशुद्ध लेखन वाचकसमूह फार चिकित्सापूर्वक पाहतो. भाषेमधले प्रतिशब्द तोलून मापून घेतो आणि त्यांतही निरनिराळे अर्थ काढत बसतो. या चिकित्सापूर्ण वाचनाने लिहिणाऱ्यांचा मतितार्थ काय आहे त्यापेक्षा कसे लिहिलेले याचकडे लक्ष वेधले जाते आणि मग लेखक डोक्याला हात लावून "हेचि फळ काय मम तपाला", असे म्हणून विचार करीत बसतो की मी लिहिले काय आणि झाले काय.

लेखनोत्तेजक वाचक समूहाला आनंदित कसे करायचे आणि वाचनोत्तेजक चिकित्सक समूहा पासून त्याचे रक्षण कसे करायचे याचीच चिंता लेखकाला लागून रहाते. वाचनोत्तेजक समूहाला संबोधित कसे करावे याचा विचार तो लेखनोत्तेजक समूहांतला लेखक करीत बसला तर तो लेखनोत्तेजक वातावरण निर्मिती कशी करणार?

आमची शाळा चिकित्सक समूह शिरोळकर उच्चशाला, (हायस्कूल), गिरगाव, मुंबई ४, अशी असल्याने आम्हास शुद्धलेखनाचे धडे फार बालक असतांनाच मिळाले. लिहितांना "मी" "मी" म्हटल्याने गर्व दिसून येतो त्यामुळे आम्ही किंवा आपण किंवा अस्मादिक म्हणावे, असे बाळकडू शाळेंत मिळाले. नासिकाप्रचुर संस्कृत पारंगत शिक्षक मिळाल्याने अनुस्वार जागच्या जागीं असावेत असे आम्हांस दर्शविले गेले. ऱ्हस्व दीर्घ नियम पाळले नाहीत तर अर्थाचा अनर्थ होतो हे आम्हास फार लौकर उमगले. लेखनांत काळ हा एक मोठा नियम असल्याचे आमच्या मनांत बिंबवले गेले. काळाची सरमिसळ करू नये, अनुस्वार नेहमी जागीच द्यावेत, "चिता आणि चिंता" हे उदाहरण फार लहानपणीच आमच्या डोक्यांत शिरले. ग्रामीण आणि ग्राम्य भाषा कशा वेगळ्या असतात ते आमच्या वर्गमित्रांनी शिकविले.

मोरोपंत यांच्या कवितांचे रसग्रहण करतांना शुद्धलेखन आणि मतितार्थ जाणून घ्यावा असे आम्हास आग्रहपूर्ण प्रतिपादन केल्यामुळे आम्ही शिक्षक जसे शिकवितील तसेच आपणही म्हणावे असे आमच्या बालमनांत ठसविले गेले. दुसऱ्यांना संबोधतांना त्यांचा आदर करावा आणि त्यांना माननीय व्हावे अशाच पद्धतीने लेखन करावे असे आमच्या शिक्षकांनी जाणीवपूर्वक आणि आग्रहपूर्वक प्रतिपादन केले.

त्यामुळे आमची लेखनपद्धती घोटविली गेली. पण काय करावे, एकदा चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलचा संबंध संपल्यानंतर, राणीच्या इंग्रजीतच संवाद साधण्याचे आमच्या भाग्यांत आले. शुद्धलेखित आणि अलंकारीत भाषेचा आपल्या संवादांत वापर करावा ही परिस्थिती राहिली नाही. नाही म्हणायला एक मराठी भाषेतील विषय आमच्या शिक्षण कार्यक्रमांत होता, पण त्यांत उत्तीर्ण होण्यापलीकडे आमचे मुंबई विद्यापीठ फारसा रस घेत नाही असे दिसून आले.

आमच्या विल्सन महाविद्यालयांत इंग्रजी सोडून दुसऱ्या भाषेतून व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रामीण किंवा ग्राम्य समजले जाण्याची खूपच शक्यता होती. म्हणून आम्ही संस्कृतप्रचुर मराठी आणि हिंदी भाषांत पारंगत असून आणि तशी प्रशस्तीपत्रके मिळवूनही आम्हास शुद्धलेखित मराठी आणि हिंदी यांना बासनांत बांधून ठेवायला लागले.

आमच्या चिकित्सक समूह शिरोळकर उच्चशालेने (हायस्कूलने), आम्हास राणीच्या इंग्रजीत लिहिण्यातही समृद्ध केले होते. आमच्या विल्सन महाविद्यालयाने राणीच्या इंग्रजीतूनच शिक्षण द्यायचा ध्यास घेतला होता. पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणितशास्त्र आम्हास फक्त राणीच्या इंग्रजीतूनच परिवर्तित केली गेल्याने आम्हास तसेच परिवर्तन करण्याचे निर्देश मिळाले होते. बोलीभाषेत आम्ही मराठी, हिंदी आणि इंग्रजी यांची उत्तम

मिश्रणे करून आपसांत आणि आमच्या प्राध्यापकांत संवाद साधत असू. मुंबईत राहात असल्याने शुद्ध मराठी आणि शुद्ध हिंदी यांचे शुद्ध मिश्रण करून इतरांशी संवाद साधत असू. परंतु त्यास बंबैय्या हिंदी असे म्हटले जात असे.

नंतर वालचंद अभियांत्रिक महाविद्यालयांत प्रवेश घेतल्यानंतर तेथील शिक्षणपद्धतीने आम्हास आमच्या शुद्ध मराठी किंवा शुद्ध हिंदी च्या वापरास अनुमती न दिल्याने आम्हास राणीच्या इंग्रजीतूनच व्यवहार करणे भाग पडले. आमच्या शिवाजी विद्यापीठानेही प्रश्नपत्रिकामंजुषा इंग्रजीतूनच काढण्याचा निर्णय घेतल्याने आमचाही नाईलाज झाला आणि आम्ही राणीच्या इंग्रजीची कास धरली. प्रश्नपत्रिकेचा अर्थ समजून त्याप्रमाणे आमच्या उत्तम इंग्रजीत उत्तरे लिहू लागलो. उत्तर काहीही असो त्याची भाषा शुद्धच असली पाहिजे यावर आमचा कटाक्ष होता. त्यामुळे गुण मिळण्याऐवजी फक्त शुद्ध उत्तरपत्रिका लिहिण्यात आमची ऊर्जा जाऊ लागली. आमचे काही वर्गमित्र असे लिहायचे की त्यांस धन्य म्हणावे.

एकदा यांत्रिकी अभियांत्रिकीची पदवी मिळाल्यानंतर बाहेरच्या विश्वांत प्रवेश केला तेंव्हा असे जाणवले की आपल्या शुद्ध मराठीला आणि शुद्ध हिंदीला आणि शुद्ध इंग्रजीला कोणीही मान देत नाही. सगळे अर्थाकडे पाहतात. आमचे इतर काही वर्गमित्र आणि कार्यमित्र इतकी भयानक लेखनक्रिया करायचे की आमच्या अंगावर कांटा येत असे. आम्ही त्यांना शुद्ध लिहिण्याचा आग्रह

a

करीत असू आणि ते आमच्याबद्दल आमच्या वरिष्ठांकडे तक्रारी घेऊन जात की हे भाषा पाहतात, अर्थ नाही.

असो. जे झाले ते झाले. आज आमच्या शुद्धलेखनाबद्दल आम्हांस  सार्थ अभिमान आहे आणि आज बहात्तराव्या वर्षीही आम्ही तितकेच शुद्ध लिहू आणि बोलू शकतो याचा आम्हांस गर्व वाटतो.

आता या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील आमच्या वर्गबंधु आणि वर्गभगिनींचा जो समाजसमूह स्थापन झाला आहे, त्यास कसे बरे संबोधित करावे हा आम्हास कधीतरी प्रश्न पडतो. शुद्ध मराठीत लिहावे का शुद्ध हिंदीत की शुद्ध इंग्रजीत की सरमिसळ करून आपली भाषा एक स्वतंत्र माध्यम करावे असा प्रश्न आमच्या मनांत घोळत असतो. बहुभाषिक समाजाला समजेल अशी भाषा उत्पन्न करावी आणि तिचा वापर करावा हेच आमचे ध्येय आहे.

चिकित्सा करणारे करोत, अर्थ काढणारे काढोत, जो पर्यंत आम्हास काय म्हणायचे आहे ते त्यांना समजते आहे तोवर कसली काळजी? आम्ही अर्थाचे वितरण करू इच्छितो. माध्यमाचे विवरण नाही. माध्यमावर आपली पकड आहेच तरीही.

अर्थाला महत्व देतो माध्यमाला नाही.

# मानवी इंद्रधनुष्य

मनुष्य स्वभाव म्हणजे सर्व रंगांचे मिश्रण. जगांत कुठेही जा मानवी स्वभावाचे पैलू दिसतील. काही अस्पष्ट पण काही अगदी खणखणीत स्पष्ट. त्यामुळे जगातल्या माणसांचे स्वभाव अगदी स्वच्छ ओळखू येतील.

इंग्लिश माणूस म्हणजे घट्ट ओठ मिटलेला, आपण बोलले तरच बोलणारा. उच्चभ्रू म्हणजे काय ते इंग्लिश माणसाकडून शिकावे.  त्याची वागण्याची पद्धत म्हणजे अगदी कडक. डोळ्याला डोळा मिळणार नाही. कुणीतरी ओळख करून दिल्याखेरीज तुमच्याशी बोलणारही नाही. सामाजिक भेद कसे करावे आणि पाळावेत हे इंग्लिश माणसाकडून शिकावे. सराईतपणे खोटे कसे बोलावे आणि वागावे याचे इंग्लिश मॅनर्स म्हणजे एक गाईड. थॅंक्यू, सॉरी, पार्डन मी, म्हटले तर सद् गृहस्थाचे लक्षण, मॅनर्स, किती मी तुमच्याशी समरस आहे, हे दाखविणे. खरे का, की सगळे खोटेच? विचार करा.

इंग्लंड मध्ये राजे राण्या, सरदार, भालदार, चोपदार रक्तांत भिनलेले, मग त्यांचे राजे रजवाडे आलेच मागोमाग. त्यामुळे सगळा समाज सोशल स्टेटसनी समृद्ध. जिकडे गेले तिकडे ही संस्कृती घेऊन गेले आणि तिकडे ती रोपली.

सोशल स्टेटस मानायचे, जपायचे मग आपल्या वरच्याला मान नाही द्यायचा अशी वृत्ती.

दुसरा एक "गुण" म्हणजे आम्हालाच काय ते सर्व माहीत, ही प्रखर भावना, ती ही जिकडे नेली तिकडे रोपली. आज महायुद्धानंतर ७५ वर्षे झाली, बाकीचे त्यांचे आश्रित "जिंकलेले" देश पुढे निघून गेले तरी यांचा ताठा आणि पोकळपणा तसाच.

अमेरिकन माणूस बघा. मुळांत अमेरिकन म्हणजे उत्तर अमेरिकन हे जवळ जवळ गृहीत धरले जाते. दक्षिण अमेरिका आहे की नाही अशी परिस्थिती करून ठेवली आहे. तर अमेरिका ही मुळातच सगळी भेसळ. ज्यांना त्यांच्या गावात कोणी विचारत नव्हते ते नशीब काढायला अमेरिकेत आले. बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुरंगी, मल्टीकल्चरल देश बनला तो. ऐन उमेदीतले लोक तिथे आल्याने आणि त्यांची सरमिसळ झाल्याने मोकळेपणा, उमेद आणि विविधता याने तो देश भरून गेला. सगळ्या रंगांचे मिश्रण झाले तर पांढरा रंग होतो पण इथे आपापले रंग शाबूत ठेवूनही एकत्र राहण्याची किमया त्याने केली. बोस्टन टी पार्टीनंतर आपापल्या देशांचे वर्चस्व झुगारून दिले आणि स्वतंत्र झाला. विशाल देश, नैसर्गिक विविधता अफाट, नैसर्गिक संपत्ती अगणित. कधीही पारतंत्र्याची चव न चाखलेला. दोन महासागरांमध्ये संपूर्ण सुरक्षित. उत्तरेला

a

दुबळा कॅनडा. दक्षिणेला दुबळा मेक्सिको. देशांत आदिवासी लोक, तेही ढकलत ढकलत कोपऱ्यात पाठविलेले.

आलेले लोक त्यांच्या "समृद्ध" देशांचा त्याग करू आलेले. सगळेच नशीब काढायला आलेले, त्यामुळे तिथे सोशल स्टॅटस समान झाले आणि माणसांचा स्वभाव मोकळा, आनंदी आणि समाजमुखी झाला. इथे या आणि उत्कर्ष करा हा या देशाचा लोगो झाला. तो दुसरे युद्ध जिंके पर्यंत. युद्धांत युरोपिअन देश थकून गेलेले, अमेरिका ताजीतवानी.  शेवटी जसे इतर देश मरगळले तशी अमेरिकनांची आर्थिक आणि सामरिक ताकद वाढत गेली आणि मग आला स्वभावांत ताठा. इगो. त्यामुळे आजचा अमेरिकन मोकळया स्वभावाचा, कष्टाळू, धडपड्या, धनलोभी, पण तेवढाच उद्योगी, संशोधक, समाज सुधारक स्वभावाचा दिसतो.

वरचा कॅनडा, नाही त्याला इंग्लिश लोकांची उच्चभ्रू संस्कृती जपता आली नाही फ्रेंच लोकांचा अवखळपणा. आहे एक देश तिथे, अशी अवस्था झाली. शेजारी मोठा दादा. मग त्याला भिऊन रहावेच लागेल. लोकही तसेच झाले त्यामुळे. तो ही बहुरंगी, बहुभाषिक, बहुधार्मिक, मल्टीकल्चरल देश असूनही दादाच्या पुढे यांचा ठसा उमटत नाही.

फ्रेंच लोक म्हणजे अवखळ, वर म्हटल्या प्रमाणे. खाओ पीओ मझा करो. फ्रेंच माणसाला कुणी सिरीयस वृत्तीचा मानणार नाही. कला, कलाकार यांत देश पुढे. सर्वोत्तम कलाकृती, सर्वोत्तम साहित्य फ्रेंच. संस्कृती जपली आणि वाढवली त्यांनी. देशाचा स्वभाव लोकांत उमटतो. आणि लोकांचा स्वभाव देशावर.

शेजारचा जर्मन पहा. कडक, लवचिकपणाचे वावडे, सगळे जिकडल्या तिकडे म्हणजे जर्मन. एक शरीर सोडले तर प्रत्येक गोष्टीचे स्टॅंडर्ड. सगळ्या गोष्टी एकसारख्या. जर्मन शहरांत जा, कुठेही गेलात तरी फरक पडत नाही. वागण्यात कामात जराही फरक पडला की तो अस्वस्थ होईल. रस्त्याने डावीकडून चाला, तो तुम्हाला उजवीकडे घेऊन जाईल. स्टॅण्डरडायझेशन म्हणजे कलात्मतेला दिलेला छेद. बदल करायला काही वावच नाही. मग माणूसही त्यापासून वेगळा कसा असणार. त्याचा स्वभाव तसाच.

दक्षिणेचा इटालियन बरोब्बर दुसऱ्या ध्रुवावरचा. बंडखोरी रोमन काळापासून रक्तांत भिनलेली, कायद्याचा अतीव तिटकारा. जमले तर मोडायचाच. मग अश्या वातावरणांत बंडखोर कलात्मकता बहरली तर नवल काय? नवनवीन कला, नवनवीन कृती स्टॅण्डरडायझेशनचा अति तिटकारा त्यामुळे सतत नाविन्याची आस. नवीन काही करायचे तर हे करणारच.

a

शेजारी स्पेन, नाही इंग्लिश लोकांचा ताठा, नाही त्यांची उच्चभ्रू वृत्ती, नाही फ्रेंचांचा अवखळपणा की नाही इटालियनांची बंधने फेकून देणारी कलात्मता. त्यामुळे ते लोक कसे अवघडल्या सारखे वागतात. एके काळी दर्याचे सम्राट, पण आज दबल्यासारखे वाटतात.

जवळचा पोर्तुगीज तर आजीबाई सारखा वाटतो, सारखा बोटे मोडत गेले ते दिवस म्हणत असल्या सारखा. जगांतले देश शोधले ह्यांनी, नवनवे सागरी मार्ग शोधले ह्यांनी, पण आज "काप गेले आणि भोके उरली" अशी मानसिकता. यांचा स्वभाव आज समजणे कठीणच.

दक्षिण अमेरिकेतले देश आणि ते लोक कशातच मिसळत नाहीत, मुळांत जे युरोपिअन तिथे गेले आणि तिथल्या लोकांना त्यांनी विस्थापित केले, त्यांच्यातच ते मिसळून गेले आणि आपले वैशिष्ट्य काय याचाच त्यांना विसर पडला की काय असे वाटावे.

आफ्रिकेचा निराळाच स्वभाव. एक तर आपसांत मारामाऱ्या करण्यांत आपली शक्ती खर्च करायची किंवा आपल्या नैसर्गिक वातावरणांत लुप्त व्हायचे. दुसरे लोक येवोत आणि आपली नैसर्गिक संपदा ते लुटून नेवोत यांना काही त्याची फिकीर नाही. जगांत आहेत आपले एवढेच. नाही म्हणायला एक कलंक लावून घेतला आहे गुलामगिरीचा आणि गुन्हेगारीचा. का असे वागतात हे

a

लोक? एवढी विविधता आहे तिथे आणि इतकी नैसर्गिक समृद्धता आहे, मग त्यांचे वागणे असे कां?

ऑस्ट्रेलिया बघा. युरोपातील म्हणजे ज्यास्त करून इंग्लंडमधील नकोशा झालेल्या लोकांना तिथे पाठवून दिले. मोठ्ठा देश, अतिशय कमी लोकसंख्या. सगळ्या गोष्टींना भरपूर वाव. इथे थोडी मुक्त संस्कृती बहरली, खेळ, खेळाडू चांगले विकसित झाले. स्वभाव मूळचा इंग्लिश पण तिथून हाकून दिल्याने इंग्लंड बद्दल प्रेम कमीच, स्वतंत्र नसून स्वतंत्र. आपले आपण राहून जगणारे लोक. मोकळ्या स्वभावाचे, खेळाडू वृत्तीचे. आनंदाने स्वागत करणारे. सुखी लोक.

चिनी माणूस पहिल्यापासून शोधक स्वभावाचा. जगांतले पहिले शोध त्याने लावले. आपली राजेशाही जपूनही तो स्वतंत्रच राहिला. लोक अध्यात्माकडे थोडेसे झुकलेले त्यामुळे दुसऱ्यांवर आक्रमण करायची वृत्ती नाही, उलट दुसऱ्यांची आक्रमणे थांबवण्यासाठी जगप्रसिद्ध भिंत त्यांनी बांधली. चिनी माणूस झोपाळूच राहिला अगदी आत्ता आत्ता पर्यंत. बांबूच्या पडद्याआड काय चालले आहे तेही इतरांना समजू देणारा. गूढ स्वभावाचा.

शेजारी जपानी म्हणजे गूढतम स्वभावाचा खास नमुना. म्हटले तर शांत स्वभावाचा, म्हटले तर आपल्या राजाचा मूक नागरिक, म्हटले तर जग

a

जिंकायला निघालेला, म्हटले तर एक खास यंत्रमानव. गूढपणा, मनातले दुसऱ्यांना काही समजू न देणारा हा मानवी स्वभावाचा खास नमुना. उद्यमशीलता पराकोटीची, नाहींतून आहे निर्माण करणारी शक्ती, युद्धामध्ये पुरेपूर उध्वस्त झाल्यावरही उफाळून आणि उभारून येणारी मनशक्ती नि आपल्याच जेत्यांना त्यांच्याच देशात गुडघे टेकायला लावणारी प्रचंड क्रियाशक्ती आणि कल्पकता. लोकही त्याच स्वभावाचे. तुमच्याकडून घेऊन तुमच्यावरच मात करणारे. आपले काहीही दुसऱ्यांना न देणारे.

रशियन म्हटले की निर्मनुष्य देशाचा नागरिक. नावाला राजेशाही. ती ही अशी की आपल्याच देशावर राज्य करण्याची शक्ती नसलेली. पण युद्धानंतर सगळे बदलले. आहे ते सर्वांचे, आम्ही फक्त त्याचे रक्षक अशी राज्यव्यवस्था असूनही राज्यकर्त्यांपासून अलग राहिलेले. प्रत्यक्ष युद्धानंतर अघोषित युद्धांत इकडून तिकडून लोक गोळा करून, त्यांच्या कडून येन केन प्रकारेण काम करवून घेऊन ४५ वर्षे लोक जगापासून विलग केले. आज रशियन म्हटले की विद्येने, शास्त्राने, कलेने समृद्ध पण वित्ताने पाठ फिरवलेली असे. अतिशय कल्पक, पण समाज रचनेने बांधले गेलेले लोक. पोलादी पडद्यामागे काय चाललेय ते इतरांना न समजताही आपली प्रगती चालू ठेवली. इतकी विविधता, इतकी चिकाटी, कठीण राजसत्तेला तोंड देऊन आपले जीवन सुरू ठेवणारी आणि विघटना नंतरही आपली वैशिष्ठ्ये जपणारी ही जमात विरळाच. देशांत एवढ्या भाषा असून आणि संवादाचा अभाव असूनही लेखन, शास्त्र, कला जपणारे हे लोक.

a

मध्यपूर्व म्हणजे टोळ्यांचा समूह, नैसर्गिक संपत्तीचा अभाव, त्यामुळे जगणे अति कष्टदायक. सारख्या आपापसातल्या मारामाऱ्या, राजकीय स्थिरतेला काही वावच नाही. जमिनीखालचे ते धन, तेही परक्यांनी शोधलेले, त्यामुळे त्यावरही काही कंट्रोल नाही. आपल्याच नैसर्गिक धनाचे मोल नाही, आपलेच धन सांभाळण्याची ताकद नाही, कधी नाही तेवढे पैसे मिळाल्यावर जो काही बेफिकीरपणा आणि बेजबाबदारपणा येतो त्यांनी परिपूर्ण. लोकही तसेच झाले. कष्ट न करता मिळालेल्या धनावर चैन करणाऱ्या उनाड मुलांसारखे.

आणि आम्ही भारतीय? शतकानुशतके परकीयांची आक्रमणे सहन करून त्यांच्या स्वभावांना शरण जाऊन आणि नंतर त्यांनाच आपल्यासारखे करून आपल्यातच बेमालूम पणे मिसळवून एकजीव पण बहुरंगी लोक झालो आहोत आपण. मूळचे लोक आणि येणारे लोक यांच्यात काहीच फरक राहिला नाही. सुलतानांना आपण आपलेसे केले. पण इंग्रज आल्यावर आपण त्यांच्या सारखे व्हायचा प्रयत्न केला. फ्रेंच आणि पोर्तुगीझांचा नायनाट इंग्रजांनी केल्यावर आपण इंग्रजांना नाही भारतीय केले. आपण उलटे आपण इंग्रजी होण्याचा प्रयत्न केला. तिथेच बिघडले सगळे, स्वत्व जायची वेळ आली. भ्रष्ट इंग्रज झालो आपण. ते इथून गेल्यावरही त्यांचीच कॉपी करत राहिलो. असो. जे झाले ते झाले.

मानवी इंद्र धनुष्याची ही झलक कुणालाही अचंबित करणारी असेल. जगातले इतर प्राणिजीव स्वभावांत इतके वैविध्यपूर्ण असतील का नाही हे

आपल्याला कळणे कठीण. पण या इंद्र धनुष्यातील प्रत्येक रंग विविधता, वैशिष्ठय दाखवतो.

आपला भारतही असेच इंद्रधनुषी रूप धारण करणारा देश आहे. आपल्यातही अमेरिकेचा बहुरंगी, बहुढंगी, बहुभाषिक, मल्टिकल्चरल समाज आहे. विविधता आपल्यांत भिनली आहे. फ्रेचांसारखे आपण अवखळ आहोत. आपण कलात्मक आहोत. जर्मनांच्या पोलादी चौकटीचे नाही. पण आपलेही काही स्टॅण्डर्ड्स आहेत. इटालियनांसारखे आपण बंडखोर आहोत. ऑस्ट्रेलियनांसारखे आपण खिलाडूवृत्तीचे आहोत. आपण जपानी यंत्रमानवासारखे उद्यमशील आहोत. आपण चिन्यांसारखे शोधक आहोत. आपण शास्त्रीय दृष्टिकोनावर विश्वास ठेवतो. आपला अध्यात्मातावरही विश्वास आहे. आपल्याकडेही निसर्गसंपदा आहे. आपणही निसर्गांत मिळून मिसळून राहू शकतो. शास्त्रांच्या अभ्यासात आपण प्रवीण आहोत. कॅनेडियनांसारखा सारखा आपल्याला शेजारी कोणी दादा नाही. स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे आपल्याकडे. आपण मध्य पूर्वेचे  टोळीवाले नाही आहोत, आपल्याला आपली सुदृढ संस्कृती आहे. आपली धनसंपदा कधीतरी लुटली गेली आहे पण आपल्याला कोणी धन दिलेले नाही, आपण आपल्या निसर्ग समृद्धीचे मोल जाणतो. आपणही तीन बाजूने सागर आणि एकबाजूने हिमालय असे सुरक्षित आहोत.

पण आपण आळशी आहोत. "ठेविले अनंते तसेची राहावे" ही आपली वृत्ती आहे. दुसऱ्यांशी स्पर्धा करतांना आपण स्वत्व विसरतो. आपण कुणावरही आक्रमण केले नाही, जी युद्धे केली ती स्वसंरक्षणासाठी केली. आपला स्वभाव युद्धाने जग जिंकायचा नाही, मनाने जग जिंकायचा आहे. पण आपल्याला कधीच परक्या आक्रमकाला परतून लावता आलेले नाही, उलट तोच आपल्यांत सामावून गेलेला आहे. आपल्याला आपल्याच भाईबंदांशी युद्धे करावी लागली आहेत.

मानवी इंद्रधनुष्यच आहोत आपण भारतीय. जगाची एक मिनी आवृत्ती आहोत आपण. आपल्याला इतरांची कॉपी करायची जरूरीच नाही. इतरांच्या खांद्याला खांदा मिळविण्याची ताकद आहे आपली. फक्त जागे व्हायचे आहे आपल्याला. आपली सुप्त शक्ती ओळखायची आहे. आपापसात भांडून ती खर्च न करता तिचा उपयोग "एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" करता करायचा आहे.

देवाची आरती करतांना आपण त्याला जाणवून देतो की तो केवढा शक्तिमान आहे, केवढा दयाळू आहे, केवढी त्यांची कीर्ती आहे, त्याने मला प्रसन्न होऊन वरदान द्यावे.

आज आता आपली आपण आरती करायची वेळ आली आहे.

# कला, शास्त्र आणि अभियांत्रिकी

कुठलीही गोष्ट करतांना कल्पकता आणि कसब यांचा मेळ घालून मिळविलेली क्षमता म्हणजे कला.

उपयोजित कलेला वळण लावून नियमबद्ध केले, तिला पुनःप्रत्ययाचा आकार दिला की शास्त्र झाले.

उपयोजित शास्त्राला व्यवहारितेची जोड दिली की अभियांत्रिकी.

प्रत्येक जिवंत प्राणी सतत शिकत असतो. मानवी आणि अमानवी हा भेद त्याच्यात नसतो. जीवन जगताना आजूबाजूच्या जगांत काय चालले आहे त्याच्याशी जुळवून घेणे आवश्यकच आहे. पर्यावरणाशी जुळवून घेतांना नवीन गोष्टी शिकत जातो आणि आपल्यांत त्याप्रमाणे बदल घडवत जातो. बदल घडवतांना कल्पक कसे असतील, त्यांत अधिक समाधान कसे असेल ते पाहणारे प्राणी ज्यास्त प्रगत.

सगळ्याच जीवांना सगळ्याच गोष्टी जीवनावश्यक असतात असे नाही. अन्न, वस्त्र, निवारा आणि मनोरंजन यांची साधना करतांना आणि नवनवीन

a

गोष्टी करतांना आपल्या मनाचा कल वापरून नवनवीन पद्धती आणि साधने यांचा तो प्राणी शोध लावतो.

नाट्य, लेखन, चित्र, संगीत, संभाषण, काव्य, अभिनय, पाक, नृत्य, स्थापत्य, आदी जीवनावश्यक नसलेल्या कला. शुद्ध आत्मसंतोष आणि समाधान हे त्यांचे हेतू. नुसत्या विचारांनी उत्पन्न झालेली ही मानसिक शक्ती.

शुद्ध ज्ञान आणि मनोरंजन यांतून निर्माण झालेली ही रचना म्हणजे कला.

कलेचा वापर करून शास्त्र निर्माण होते. शास्त्राला व्यावहारिक रूप दिले की अभियांत्रिकीचा उदय होतो.

झाडावर मस्त फळे फुले लागलेली दिसताहेत. कशी मिळवावीत? झाडावर चढावे, ती तोडावीत, खाली टाकावीत, खाली उतरावे आणि गोळा करावीत. एक उपाय झाला.

झाडावर चढतांना हातापायांचा उपयोग कसा करावा याचे नैसर्गिक ज्ञान म्हणजे कला.

पुन्हा पुन्हा झाडावर चढतांना तीच तीच पद्धत वापरावी कशी ते शास्त्र.

झाडावर चढताना दोरीचा किंवा फासाचा उपयोग कसा करता येईल ती म्हणजे अभियांत्रिकी.

अगदी साधे उदाहरण दिले आहे इथे.

कला जन्मजात असते, शास्त्र निर्माण केले जाते. काय करावे ही कला, कसे करावे हे शास्त्र, अस्तित्वांत असे आणावे ही अभियांत्रिकी.

कलेला निर्बंध कमी, शास्त्राला खूप. कला बंडखोर शास्त्र नियमबद्ध. कला निर्माण करते, शास्त्र पुनर्निर्माण करते.

मुंग्या झाडावर चढतात. फुलांफळांपर्यंत जातात. त्यांतला रस घेतात आणि पुन्हा उतरून आपल्या वारुळांत जातात. त्यांना न शिकता जन्मजात ते ज्ञान दिलेले आहे देवाने. मुंग्या हार्ड वायर्ड असतात. त्या कधी वेगळ्या पद्धतीने गेलेल्या पाहिल्यात का? एकच पद्धत, जन्मभर.

पक्षी गातात. त्यांचे गाणे निसर्गनुरूप बदलते. प्रत्येक ऋतू प्रमाणे ते वेगळे गातात.

a

गरुड, ससाणे उडतात, खाणे शोधण्यासाठी. मासे पोहोतात खाणे शोधण्यासाठी आणि स्वतःचा जीव वाचविण्यासाठी. त्यांच्यात जन्मजात कला आहे आणि सरावाने केलेले शास्त्रही आहे पण एकमेकांत अगदी मिसळून गेलेले.

मानवजात महान. इतर प्राण्यांसारखी शक्ती, नजर, श्रवण, गंध यांची देणगी नाही दिली देवाने, पण डोके चांगले दिलेले, त्याचा उपयोग करून आपल्या वैगुण्यांवर मात केलेली. आम्हाला पक्ष्याची तीक्ष्ण नजर नाही की हत्तीची शक्ती नाही तरीही आम्ही त्यांच्यावर मात केलीच आहे.

हत्ती सारखा शक्तीवान प्राणी आमचे ऐकतो, वाघासारखा बलवान आमच्या पिंजऱ्यात राहतो, गोड गाणी गाणारे पक्षी आमच्या घरांत आमचे मनोरंजन करतात.

माणूस डोळ्यांना न दिसणाऱ्या गोष्टी पाहतो, ऐकू न येणाऱ्या गोष्टी ऐकतो. गोंधळातून पद्धत शोधतो. कुठून आली ही कला माणसाच्यांत? ही देवाने दिलेली देणगी आहे.

कलेची देणगी देवाने ज्यांचा मेंदू प्रगत आहे त्यांनाच दिली आहे, असे म्हणणे थोडे धाडसाचेच होईल. कारण आपण इतर प्राण्यांच्या मनांत डोकावू

शकत नाही, त्यांच्याशी संवाद साधू सहजता नाही. फक्त जे दिसते त्यावरून अदमास करू शकतो.

खेळ ही एक प्रकारची कलाच आहे. इतर प्राण्यांत बहुधा बाळेच खेळतांना दिसतात. खेळतांना ती अगदी मुक्त आणि कल्पक वाटतात. प्रौढ प्राणी खेळतांना कमीच दिसतात. कला उपजत असून लहान वयात प्रकट राहते आणि मोठे झाल्यावर मागे पडते असे का?

दुसरा एक गुण मानवजातीला मिळालेला आहे तो म्हणजे, नाही मध्ये आहे शोधण्याचा, अबस्ट्रॅक्षन. या एका गुणांमुळे आपल्याला रंगांमध्ये रंगसंगती दिसते, ध्वनिमिश्रणामध्ये संगीत दिसते आणि शब्दकल्लोळामध्ये कविता दिसते.

आपण सूर्योदय पाहतो, ते दृश्य आपल्याला साठवून ठेवावेसे वाटते. मग दोन चार रंगीत मऊ दगड शोधतो आणि मिळेल त्या पृष्ठभागावर रेखतो. चित्रकलेचा जन्म होतो. नुसता नळ बादलीत गळत असतांना आपल्याला त्यांत एक सुरांची रचना वाटते, लयीचा भास होतो आणि संगीत निर्माण होते. दगडांचे आकार आपल्याला भावतात, त्यातून आपल्याला मूर्ती दिसतात आणि शिल्पकलेचा उगम होतो.

a

सगळ्याच जणांना ही भावना होते, पण काहीजण ज्यास्त उत्कटतेने ती अनुभवतात. ते सृजनशील होतात, कलाकार होतात. शून्यातून निर्मिती करायची त्यांना स्फूर्ती येते. ते करतात आणि आपण इतर जण त्यांची निर्मिती पाहतो आणि त्यांची स्तुती करतो.

ही दृष्टी सगळ्यांनाच असते पण आपण त्याकडे लक्षच दिलेले नसते. आपण सारे कवी, चित्रकार, शिल्पकार असतो, सुप्त असतो.

मग दुसऱ्याची ही कला पाहून आपल्यालाही स्फूर्ती येते तसे करायची. कलाकाराने कसे केले हे पहात पहात आपण त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो. एक एक पायरी शिकत जातो. शिस्तबद्ध शिकून त्या पायऱ्या आत्मसात करतो. त्या इतरांनाही शिकवितो. शास्त्र बनत जाते.

शास्त्राचे नियम पाळले की आवृत्या करता येतात. सगळ्या पायऱ्या नीट पार पाडल्या की तंतोतंत प्रती निर्माण होतात. सगळ्यांना जमते आता ते करायला. शास्त्राच्या समूहाने विज्ञान तयार होते, पुढच्या लोकांना मार्ग मिळतो.

आणि तो कलाकार? तो अजून पुढे निघून गेलेला असतो.

कला श्रेष्ठ की शास्त्र की अभियांत्रिकी?

कोणीही श्रेष्ठ नाहीत की कनिष्ठ नाहीत. एकमेकांना पूरक आहेत. नुसती कला असेल तर त्या व्यक्तीबरोबर ती जाईल. नुसते शास्त्र काय करणार? आणि शास्त्राचा आधार नसला तर अभियांत्रिकी काय करणार?

कलाकार नक्कीच गिफ्टेड असतात. त्यांना देवदत्त देणगीच असते. ते पहिली रचना करू शकतात. कोणी संगीतकार रचना करतो पण कशी स्फुरली ते सांगत नाही. त्याच्या मनांत कोणी शिरू शकत नाही. त्याच्यासारखे कोणी होऊ शकत नाही. तो जर आपल्याबरोबर कोणी चेले घेईल तर कदाचित ते त्याची स्टाईल उचलतील पण त्याची प्रज्ञा? ती कायम त्या कलाकाराबरोबरच राहील आणि त्याच्या बरोबरच जाईल. सगळ्या कलाकाराची हीच कथा.

कलाकार कल्पनावान असतोच. शास्त्रज्ञही तेवढाच कल्पनावान असतो पण जरा वेगळ्या मार्गाने. ज्यांनी भौतिक शोध लावले ते कलाकारच नव्हेत काय? ज्यांनी परमाणू शोधले, ज्यांनी भौतिक नियम शोधले त्यांना ते दिसले नव्हते, त्यांनी त्यांचा कल्पनाशक्तीनेच शोध लावला होता. पण ते नियमबद्ध पद्धतीने जात राहिले, पायरी पायरीने शोधत गेले. त्यांनी कुठली नवरचना नाही केली. पण  त्यांनी आपल्या मागून येणाऱ्या लोकांना मार्ग करून दिला.

a

पण शास्त्र? ते जगते, टिकते, त्यांत सुधारणा होऊन ते समृद्ध होते. शास्त्रबद्ध पद्धत करणेही तेवढेच महत्वाचे.

कलाकार बहुधा आपली कला आपल्या पाशीच ठेवतात, दुसऱ्यांना देत नाहीत. संगीताच्या विश्वांत किती अश्या गोष्टी आपण ऐकतो की एखादा गुरू त्याच्या चेल्याला काही विद्या काही कला देतो पण सगळी देत नाही.

शास्त्राच्या विश्वांत असे दिसत नाही. शास्त्रज्ञ एकमेकांशी संपर्क ठेवतात, आपले काम इतरांना सांगतात, त्यांची मते जाणून घेतात, देवघेव करतात. शास्त्रे लिहून ठेवली जातात, त्यांत सुधारणा होत जातात, जगाला त्याचा उपयोग होतो प्रगती करायला.

शास्त्र जाणतो तो शास्त्री. पण शास्त्र जाणून पुढे घेऊन जातो तो शास्त्रज्ञ. काही फरक वाटला का दोन्ही शब्दांत?

शास्त्री आणि शास्त्रज्ञ. अर्थ जवळ जवळ एकच पण दोन स्वभाव वाटतात. शास्त्री अध्यामिक, धार्मिक आणि साहित्यिक विश्वांत आणि शास्त्रज्ञ भौतिक विश्वांत अशी विभागणी दिसते. आईनस्टाईनला कोणी शास्त्री म्हणत नाही आणि धर्मशास्त्रींना कोणी शास्त्रज्ञ म्हणत नाहीत. अलिखित भेद केलेला आहे हा.

कला सिद्ध करायला लागत नाही. आपोआपच दिसते आणि स्वीकारली जाते. कलाकाराला प्रमेये नाही मांडायला लागत. प्रयोग मात्र तोही करतो. कलाकार क्वचितच एक कलाकृती बरोबर दुसरीसारखी करत असेल. प्रत्येक कलाविष्कार वेगळा, नवीन. क्रिएटिव्हिटी हा कलाकाराचा प्राण. तो मागे वळून पहात नाही, पुढेच जातो सारखा. तो रिव्ह्यू करत बसत नाही, ते सर्व मागच्यानी करावे.

शास्त्रज्ञ फुलपाखरांसारखे ज्ञानाचे कण एक एक करून गोळा करतात आणि त्याची विज्ञानांत एकता करतात. शास्त्रीय दृष्टिकोन म्हणजे पटल्याखेरीज आणि सिद्ध झाल्याखेरीज न स्वीकारणे. तिथे भावनेला महत्व कमी आणि सत्यतेला ज्यास्त. प्रयोगांना महत्व ज्यास्त. प्रमेये मांडायची आणि सिद्ध करायची, त्यांना ऑब्झरवेशन ची जोड द्यायची आणि सगळया निकषांवर तावून सुलाखून निघाले की मगच स्वीकारायचे. एकदा स्वीकारले की तो दुसऱ्या संशोधनाचा पाया मानायचा, दुसऱ्या कुणीतरी ते चुकीचे सिद्ध करी पर्यंत.

आईन्स्टाईन तर एक खास शास्त्रीय कलाकारच म्हणायचा. अर्थात, त्याने केलेले संशोधन गणिताच्या आधारे आणि न्यूटनच्या सिद्धांतांवरच बेतलेले होते. पण त्यांची प्रज्ञा एवढी मोठी की त्याने वर्तवलेले सिद्धांत कित्येक दशकांनंतर खरे निघाले. आज आपण विज्ञानातील शोधांच्या बातम्या वाचतो

a

आणि त्या आईन्स्टाईन कसा खरा होता तेच सिद्ध करतात. कला आणि शास्त्रीय दृष्टिकोन याचे याहून उत्तम उदाहरण सापडणार नाही.

शास्त्री अभ्यास करतात. पुरातन साहित्य, धर्मग्रंथ, अध्यात्म यांचे अभ्यास करून त्यांतून योग्य अर्थ आणि त्यातून समाजाचे बोधकार्य ते करतात. यांत शास्त्रीय दृष्टिकोन मनाशी निगडित असल्याने त्यांच्या या शास्त्रविस्तारांत भौतिक गोष्टींना प्राधान्य कमीच दिलेले दिसते.

कवींच्या जगतात तर एकाहून एक सरस उदाहरणे दिसतील. एक छोटीशी कथा, पण अशी फुलविलेली की ती अमर होईल. रामायण, महाभारत, इलियड, ओडीसी, बायबल, कुराण पाहिली तर कलाविस्ताराचा अमर अनुभव येतो.

चित्रकार, कवी, संगीतकार, शिल्पकार, वास्तुशिल्पकार सगळे कलाकार, कल्पनाशक्तीवान. शास्त्री आणि शास्त्रज्ञ त्यांचे मागले. आणि अभियंते? शास्त्रज्ञांच्या मागले.

मागले म्हणजे कनिष्ठ नाहीत, त्यांना आधार देणारे, त्यांची पद्धत पुढे घेऊन जाणारे. प्रत्यक्षांत उतरवणारे. वेळ आली तर कलेला शास्त्रबद्धही करणारे.

कलाकारांनी निर्मिती करावी, शास्त्रज्ञांनी दिशा दाखवावी. अभियंत्यांनी करून दाखवावे. शास्त्र पाळून त्यांत आपली भर घालून गोष्टी प्रत्यक्षांत आणाव्या. वैज्ञानिक ज्ञान प्रत्यक्षांत उतरू शकेलच असे नाही, त्यालाही अभियांत्रिकी प्रयत्नांची जोड लागते.

संगीताचे उदाहरण घ्या. ध्वनी, ध्वनिशास्त्र आणि ध्वनी अभियांत्रिकी. तीन वेगळी जगे, तीन वेगळी कसबे, तीन वेगळ्या पद्धती, तीन वेगळ्या दिशा.

ध्वनिमिश्रणाने संगीत होते. संगीताचे नियम आणि शास्त्र पाळले नाही तर गोंगाट होतो, ध्वनी श्रोत्यांकडे नीट पोहोचविण्याची पद्धत पाहिजे. तिन्ही गोष्टींचा मेळ बसला पाहिजे.

तसेच इतर विज्ञानातही. खगोलशास्त्र, रसायन शास्त्र, भौतिक शास्त्र आणि अशी अनेक शास्त्रे.

खगोल शास्त्रज्ञ म्हणतो, पृथ्वीच्या आकाराची दुर्बीण पाहिजे, आणि तिला शून्याखाली १०० डिग्रीची खोली पाहिजे. मग आमचे हे किंवा ते चालेल. कसे ते तुम्ही बघा. कदाचित तो थोड्या फार कल्पना देईल पण ते करून दाखविणारे ते अभियंते.

अभियंते कलाकारही आणि शास्त्रज्ञही असतातच. पण त्यांना अजूनही काही येते. कलाकाराच्या अमूर्त रचनेला शास्त्रीय दृष्टिकोन देऊन मूर्त स्वरूपात आणायचे ते अभियंत्यांनी.

"अभियंता ही अभियांत्रिकीचा व्यावसायिक वापर करणारी व्यक्ति आहे जी वैज्ञानिक ज्ञानाच्या, गणिताच्या व अनुभवाच्या भरवशावर तांत्रिक बाबींचे समाधान होण्याजोगी उकल काढते. त्यांचे काम, विज्ञानाचा मानवी गरजांसाठी प्रत्यक्ष वापर व जीवनाच्या गुणवत्तेसाठी झटणे, असेही आहे." इति विकिपीडिया.

निर्मितीची तीन चाके आहेत ही. कला, शास्त्र आणि अभियांत्रिकी. कलाकार, शास्त्रज्ञ आणि अभियंता ही एक साखळी आहे. ती जर तुटली तर निर्मिती होत नाही किंवा कल्पना प्रत्यक्षांत पाहिजे इतकी उतरत नाही.

कुठल्याही भव्य रचना पहा. तिन्ही चाके दिसतील निर्मितीची. ताजमहाल कला, शास्त्र आणि अभियांत्रिकी याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. इजिप्त मधले पिरॅमिड, पेरू मधली माचू पिचू इन्का रचना, केदारनाथाचे मंदिर, दक्षिणेतली भव्य मंदिरे, सिडनेचे ते भव्य कलादालन. जिवंत उदाहरणे आहेत ही त्या निर्मितीच्या त्रिमिलापाची.

माणसाला एक रोग आहे. बोअर होण्याचा. नेहमी तेच तेच करून कंटाळण्याचा. इतर प्राणी बोअर झाले तर काय करतात ते माहीत नाही पण माणूस बोअर झाला तर नवनिर्मिती करतो. गुहांमध्ये चित्रे काढतो. आकाशांत

त्याला ताऱ्यांमध्ये त्याला चित्रे दिसतात, तिथे काय असेन त्याची उत्सुकता वाटते. हे सर्व कसे झाले याचा अचंबा वाटतो. आपण हे करू शकत नाही तर कोणी हे कसे केले असेल आणि हे असे का असा विचार येतो त्याच्या मनात. मग देव ही संकल्पना निघते. आपल्याला करता येत नाहीत ते देव करतो ही भावना निर्माण होते. एक आदर्श त्याच्यापुढे होतो. आपणही तसेच व्हावे अशी कामना त्याच्या मनांत येते आणि तो ती प्रत्यक्षांत आणायचा प्रयत्न करतो. देव होऊ पहातो.

देव नाही तर देवाची प्रतिमा बनवतो. त्या प्रतिमेला साजेशी भव्य मंदिरे तो बांधतो. मग तयार होतात पिरॅमिड, माचू पिचू आणि मंदिरे, त्या देवाला एक उच्च पातळीवर नेणारी. मानवी कलेला, शास्त्राला, अभियांत्रिकीला चालना देणारी. एक आदर्श पुढे ठेवणारी.

मनुष्य देवाने केलेली सृष्टी स्वतः करू पाहतो, चंद्र, ग्रहावर जाण्याचा प्रयत्न करतो, प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रतिसृष्टी निर्माण करू पाहतो, विश्वामित्रासारखा. प्रयत्नाचे फळ हळूहळू दिसायला लागते. कला शास्त्रांत आणि शास्त्र अभियांत्रिकीच्या माध्यमातून प्रकट होते.

मग त्यांच्या कडे पाहून माणूस समाधानी होतो, प्रसन्न होतो.

# पतंगबाजी

"चली चली रे पतंग मेरी चली रे
चली  बादलोंके पार होके डोरपे सवार
सारी दुनिया ये देख कर जली रे"

"भाभी" नावाच्या चित्रपटांतील हे गाणे मी लहान असताना फार प्रसिद्ध झाले होते. मुंबईत त्यावेळी पतंग उडविण्याची तेंव्हा मोठी क्रेझ होती. आमच्या डोंगरीमध्ये पतंगांचे बरेच "कारखाने" होते. आमच्या बिल्डिंगमध्ये पतंगांचे चॅम्पियन खूप होते. त्यांच्याकडे बघून आपणही असेच चॅम्पियन व्हावे ही माझी मोठी महत्वाकांक्षा होती.

आमच्या घराच्या आजूबाजूला सगळया उंच इमारती, त्यामुळे तशी मोकळी जागाच नव्हती. मग बिल्डिंगच्या वरच्या मजल्याच्या गॅलरीमधून पतंग उडविण्याखेरीज आम्हाला दुसरा उपाय नव्हता.

डोंगरीच्या जेलच्या पश्चिमेला बरेच कारखाने होते. तिथे पतंग, मांजे, फिरक्या वगैरे बनायचे. आमच्या घराच्या गॅलरीतून पतंग उडवितांना तो समोरच्या बिल्डिंगच्या छपरा पर्यंत गेला तरी खूप झाले असे वाटायचे. पण

a

बिल्डिंग मधली ती दुसरी मुले, सगळीच माझ्यापेक्षा मोठी, उंच उंच पतंग उडवायची आणि त्यांच्याकडे पाहून, त्यांचे ऐकून पतंगाची बरीच टेक्नॉलॉजी आत्मसात केली होती.

पतंगाचा बिझिनेस इतका मोठा होता की आमच्या बिल्डिंगमधली बाप्यांसारखी मुले घरी सगळी साहित्ये घरी आणून पतंग बनवीत असत.

पतंगांचे प्रकार, मांज्यांचे प्रकार, पतंग कसे उडवायचे, लढाया कशा करायच्या, तुटलेले पतंग आपल्या पतंगात अडकवून असे मिळवायचे, मांज्या आणि धागा किती कसा लावायचा यांत एकदम वाकबगार होते.

पतंगांचे कमीत कमी चार पाच प्रकार मला माहित झाले होते. कच्ची गोटी पतंग, कौवा पतंग, फायटर पतंग, उंच "बदवायचा" पतंग एकमेकांपासून एकदम वेगळे. बदवायचा म्हणजे उंच उंच उडवायचा.

मांज्यांचे तीन चार तरी प्रकार होते. साधा मांजा, घासलेटी मांजा, नायलॉन मांजा असे.

फिरकी कशी वापरायची, पतंग तुटला तर आपला मांजा बरोबर कसा रिकव्हर करायचा ती खास टेक्निक होती.

ही मुले पतंगांवर किती खर्च करायची ते एक देवालाच माहिती. मुंबईत वारा सकाळी पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि संध्याकाळी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतो. तर सकाळी सात ते अकरा आणि संध्याकाळी चार ते सात, कधी कधी तीन ते सात असे पतंगांचे सेशन असायचे. शेजारपाजारच्या बिल्डिंगमधले असेच चॅम्पियन आमच्या बिल्डिंगमधल्या चॅम्पियन ने आव्हान द्यायचे.

आपल्याला पतंग जरी उडविता नाही आला तरी त्यांच्याकडे पाहत तीन चार तास आरामांत जात. त्यांची ती हालचाल आणि रनिंग कॉमेंटरी ऐकूनच मजा यायची.

पतंगांच्या कारखान्यांत तो पातळ कागद, बांबूच्या चिरफळया, धाग्यांची रिळे आणि फिरकीचे सामान पडलेले असायचे. पतंग बनवायला लागणारे ते बैठे डेस्क, त्याला लागणारी ती "लई", मांज्याला लागणारी काचेची पावडर, मांजा करायला लागणाऱ्या त्या भिंतींत ठोकलेल्या खुंट्या खास प्रसन्न वातावरण करायच्या. "लई" म्हणजे तो पीठ शिजवून केलेला डिंक. साधा डिंक चालायचा नाही.

एकरंगी पतंगांसाठी एकच चौरस कागद, पण दुहेरी, तिहेरी, चार रंगांच्या पतंगांसाठी तेवढे तुकडे. तेही परफेक्ट कापलेले, त्याकरता कागद कापायची ती

a

गिलोटीन असायची. मग तो पतंगाचा कारीगर त्या बैठ्या डेस्कशी बसून पतंगांचे कागद तयार करायचा. दुसरा एकजण बांबूच्या पात्तळ काड्या करायचा. हे त्यांचे काम आम्ही शाळेतून जात येता बघत उभे राहायचे. तो काड्यावाला कारीगर हातांत एक छोटा चाकू घेऊन, बोटाला बँडेज बांधून करायचा.

प्रत्येक काडी अगदी युनिफॉर्म असली पाहिजे, एक काडी पतंगांच्या मध्ये उभी बरोबर मध्यभागी आणि दुसरी गोलाकार दुसऱ्या दोन कोनांना जोडणारी. मधली उभी काडी कडक तर ती दुसरी लवचिक. अगदी विशिष्ठ पद्धतीने लई लावून चिकटवायची की पतंग तयार.

बाळगोपाळांचे पतंग लांबट, त्यांना मोठी शेपटी. ते थोडेच आकाशांत जाणार?

कौवा पतंगांना एक विशिष्ठ पद्धतीने एका विशिष्ठ लाटण्याने लाटून रेघा पाडलेल्या. त्यामुळे पतंगाचा कागद थोडा रिइनफोर्स होतो आणि लवकर फाटत नाही. शिवाय त्याच्यासगक्या बाजूने एक धागा चिकटवलेला. त्याच्या शेपटीला स्पेशल बांबूच्या काड्या असलेला त्रिकोण चिकटवलेला. पतंग एकदम बॅलन्स असलेला. सतत एका ठिकाणी उडत रहायची गॅरंटी द्यायचे त्याचे कारागीर. असले पतंग संक्रांतीला आणि विशेष कार्यक्रमांत शोपीस म्हणून

a

उडविले जायचे. त्यांची किंमतही तशीच भारी असायची. एक अलिखित नियम होता की कौवा पतंग कुणी काटायचा नाही. तो म्हणजे एक शान.

फायटर पतंग करायला वेगळी पद्धत होती. तो पतंग "सांभाळायला" लागायचा. तो पतंग जड, थोड्या जाड कागदाचा असायचा. त्याच्या काड्या भक्कम आणि शेपटीला कौवा पतंगासारख्या बांबूच्या काड्या. हा पतंग उडविणाऱ्यांत एक कला किंवा कसब नसेल तर तो एकतर उडणारच नाही किंवा झाडा तारांत गुंतेल. गिरक्या, डाईव्ह आणि सरळ हल्ला करायला हा बेस्ट.

पतंग उडतो त्याच्या "कन्नी" वर. कन्नी कशी बांधलेली आहे त्यावर. कन्नी कशी बांधतात माहीत आहे का? सांगतो. पहिल्यांदा जिथे दोन काड्या, उभी आणि गोल क्रॉस करतात तिथे दोन भोके पाडायची ती अशी की काड्या बांधल्या गेल्या पाहिजेत. मग शेपटीच्या त्रिकोणापासून तीन बोटे सोडून दोन भोके पडायची, काडीच्या दोन बाजूनं, पण जवळ जवळ. मग मांज्या घ्यायचा, एक टोक वरच्या भोकातून ओवून घट्ट गाठ मारायची. मांजा पतंगांच्या उंच बाजूपेक्षा डबल लांबीचा असला पाहिजे. मग दुसऱ्या टोकाने खालच्या त्या भोकातून ओवून घट्ट गाठ मारायची. मग तो बांधलेला दोरा चिमटीत धरून चिमट वर खाली करून गाठ मारायची ती अशी की वर केली तर गाठ वरच्या भोकांच्या पुढे दोन बोटे आणि खालच्या भोकावर बरोबर आली पाहिजे. मग या कन्नीला फिरकीचा मांजा बांधायचा की पतंग उडवायला तयार.

कन्नी वर दोन बोटे आणि खाली शून्य असेल तर ती दोन झिरो. म्हणजे जरा बघा, कन्नी दोन झिरो, तीन झिरो किंवा झिरो झिरो असू शकते. झिरो एक वाला पतंग कसातरीच उडतो आणि झिरो दोन वाला उडतच नाही. कन्नी ऍडजस्ट करता येते. अगदी कधीही.

कन्नी कशी बांधली त्यावर पतंग कसा उडेल ते कळते. वाहणारी हवा बरोबर अँगलनी पतंगांवर गेली पाहिजे. मग मांज्याला बरोबर हिसके दिले की पतंग वर उड्या मारतो आणि लौकर वर चढतो.

नवशिके लोक दोन झिरो, तीन झिरो कन्नी बांधायचे पण चॅम्पियन एक झिरो किंवा झिरो झीरो कन्नी बांधायचे.

मांज्याखेरीज पतंग उडणार कसा? तसा तो धाग्यानेही उडतो पण ते दुष्ट लोक टपून बसलेले असतात, ते बरोबर समजतात की धागावाला पतंग कुठला ते, आणि बरोबर काटतात आपला. मांजा हे आपले शस्त्र आहे पतंग उडवितांना.

दुसरे ते दुष्ट लोक म्हणजे "लंगस" टाकून आपल्या पतंगावर हल्ला करणारे. डाकूच ते. मांज्याला लिंबाची फोड बांधायची म्हणजे लंगस झाला. तो गरगर

a

फिरवायचा आणि मांज्यावर टाकून खेचायचे की मांजा तुटतो आणि पतंग "गुल" होतो. अश्या लोकांवर चपला फेकल्यात आम्ही वरून.

मांजा बनवतांना काचा कुटून अगदी बारीक पावडर करायची. कारखानावाले तर ग्रायंडर मशीन वापरायचे. अगदी बारीक पावडर करायची, मग त्यांत एक स्पेशल डिंक आणि रंग घालायचा आणि हे सगळे मळून मळून एकदम एकजीव करायचे.

तो पर्यंत तो आपला साथीदार कारागीर भिंतींना ठोकलेल्या खुंटयांवरून धागा बांधत जातो आणि एक मोठा जुडगा तयार करतो. मग मांज्यावाल्यानें हातात हे केलेले मिश्रण घ्यायचे आणि त्या धाग्याच्या जुडग्याला अगदी समान लावत लावत एक खुंटीपासून दुसरी पर्यंत लावायचे. लावतांना गाठी होऊ द्यायच्या नाहीत.

मग तास दोन तासांनी मांजा वाळल्यावर एक फिरकीचे "मशीन" आणायचे, त्यांत फिरकी बसवायची आणि एका हाताने फिरकी फिरवत दुसऱ्या हाताने मांज्याला अजून एक कोट द्यायचा. त्यावेळी त्या साथीदाराने एक एक मांजा त्या खुंटीवरून सोडायचा आणि जिथे ते मांज्यांचे मिश्रण लागले नाही ती खुंटीची जागा मांज्यावर कव्हर करायची.

a

मला वाटायचे की जाड मांजा चांगला. पण तसे नाही. मांज्यांचे प्रकार वापरावर ठरतात. जाड धाग्यावर केलेला मांजा दिसायला खरखरीत वाटतो पण त्याला बारीक धाग्याचा मांजा काटू शकतो कारण बारीक मांजा जाड मांज्याच्या खरखरीत फटीत शिरून त्याला काटतो. तर असे आहे मांज्यांचे ते मला नंतर समजले.

पतंग उडवितांना लढाई केली नाही तर तुम्ही वीर कसले? दुसऱ्याचा पतंग काटून शिवाय तो आपल्या पतंगांत गुंतवून जिंकणे म्हणजे वीरांचे लक्षण. इथे पतंगाचा "जडपणा" कामाला येतो. कन्नी प्रमाणे पतंग उडतांना जड किंवा हलका होतो. लढाई करतांना जड पतंग चांगला. बर, हल्ला करायचा का डिफेंड करायचा ते उडविणारा ठरविणार. हल्ला करताना पतंग "घसटावा" लागतो आणि डिफेंड करतांना ढील द्यावी लागते.

पतंग "घसटत" असतांना हाताची जी हालचाल होते तो म्हणजे एक नृत्य प्रकारच म्हणावा. इथे हातांचे कोऑर्डीनेशन फार महत्वाचे. घसटतांना मांजा भराभर आपल्याकडे ओढायचा, त्यामुळे आपला पतंग शत्रूच्या पतंगाखालून वर येऊन त्याचा पतंग काटतो. ही दोन्ही हातांची हालचाल फक्त प्रॅक्टिसनेच येते. डिफेंड करतांना अगदी नाजूकपणे कंट्रोलमध्ये ढील द्यायची की आपले पतंग दूर दूर जात शेवटी शत्रूचा पतंग कटतो. मग त्याचा पतंग आपण अडकवायचा आपल्या पतंगात. अडकला आणि खेचून आपल्याकडे आणला

की दोन्ही बाजूने हातांची आणि तोंडांची जी भेदक हालचाल होते ती क्या बोल्या! कधी कधी लढाईत दोन्ही पतंग काटले जातात मग जे रण माजते ते तेवढेच मनोरंजक असते ते आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. अगदी कधीतरी दोन्ही पतंग तुटतात, मग एकमेकाकडे पाहून "जाने दो, जाने दो" च्या खुणा करायच्या.

पतंगांच्या लढाईवरून ज्या लढाया उडविणाऱ्यांत झाल्या आहेत त्यांचे तर वर्णनच करता येणार नाही. मुंबईची काळबादेवी आणि डोंगरी यांत प्रसिद्ध.

पतंग उडवितांना पहिल्यांदा खाली सोडायचा आणि "उचक" द्यायची, म्हणजे हिसका द्यायचा. की पतंग वर सूर मारतो. मग ढील देऊन अजून एक उचक. एकदा बिल्डिंगच्या वर गेला की वाऱ्याने तो आपोआप उडायला लागतो. मग ती हातांची लयबद्ध हालचाल आणि ढील दिली तो उंच उंच जातो. हवेचा रोख नीट असेल तर इतका उंच जातो तो हवेत फक्त मांजा दिसतो.

मुंबईत वारा दुपारच्या बाराच्या सुमारास दिशा बदलतो मग पतंग थेट आपल्या डोक्यावर येतो. आमच्या बिल्डिंग मध्ये दोन गॅलऱ्या होत्या, एक घरांत पश्चिमेकडे आणि एक कॉमन, पूर्वेकडे. हा पतंग असा वर गेला की उतरायला लागायचा कारण तो डोक्यावरून दिसेनासा व्हायचा. मग एक सेशन संपला.

a

पतंग उडवितांना बालगोपाळांचे पतंग कधीच वरच्या वाऱ्यांत जायचे नाहीत. शेवटी त्यांचा अंत समोरच्या बिल्डिंगच्या छपरावर किंवा मागच्या आंब्याच्या झाडांत व्हायचा.

पतंग उडविणाऱ्याची जर एक फिल्म तयार केली आणि त्यांतून मांजा, फिरक्या वगळल्या तर जे दृश्य तयार होईल ते कुठल्याही नृत्याला मागे टाकेल. अशी ती लयबद्ध हालचाल असते हातापायांची, कसे तो फिरकीवाला ही त्यांचाच एक पार्ट होतो ते दृश्य अविस्मरणीय!

मुंबईत काळबादेवीत पतंगाची जी उलाढाल व्हायची ती आजही जुने जाणते लोक सांगतात. त्या काळातही लाखोंची उलाढाल व्हायची.

इंग्लिश, अमेरिकनांचे पतंग अगदीच मेंगळट, नुसते हवेत उडणारे. लांबच्या लांब शेपट्या असणारे, त्यांना काही जीव नाही की कला नाही. नाही म्हणायला बेंजामिन फ्रॅंकलिनने पतंग उडवून आकाशातली वीज आणि वायर मधली वीज एकच असते हे दाखवून दिले आणि विद्युत निरोधकाचा शोध लावला.

तो कधी आमच्या मुंबईत आला असता आणि आमच्याशी पतंग खेळला असता तर त्याला कळले असते की आम्ही हा शोध कधीच लावला आहे म्हणून.

चिनी लोक आमच्यासारखेच पतंगबाज. चिनी पतंग निरनिराळया आकाराचे आणि स्वभावाचे. चिनी लोक पतंगाच्या लढाया करतात की नाही ते शोधले पाहिजे. आम्ही मुंबईकर त्यांना युद्धभूमीवर नाही तरी पतंगभूमीवर हमखास हरवू.

संक्रांतीला पतंगाची लढाई करतांना आमचे जे वीर गच्चीतून आणि टाक्यावरून पडले आहेत त्यांची स्मारकेच करायला हवीत. एक सात आठ फूट ज्यास्त उंचावरून पतंग उडविला तर तो काय आकाशाला भिडणार होता काय? पण आपले स्मारक व्हावे म्हणूनच त्यांनी हे डेअरिंग केले असेल. तसेच तुटलेले पतंग पकडणारे. त्यांना नाही रहायची ट्राफिकची शुद्ध नाही विजेच्या तारांची भीती. तेही कधी कधी "अमर रहे" व्हायचे.

दिवाळीत पतंगाला आणि मांज्याला कंदील अडकवून पतंग उडवतात ते फार मस्त दिसते. पण त्याला कौवा पतंगच पाहिजे. तो रात्री आकाशांत दिसत नाही पण कंदील दिसतात, त्यातली मेणबत्ती विझेपर्यंत. मग अगदी अंदाजाने उडवायला लागतो तो.

तुम्हाला माहीत आहे का? पतंग एकदाचा फाटल्यावर जर रिकव्हर झाला तर मग त्याचा धनुष्य बाण करता येतो ते. ती गोल काडी डोरा बांधून धनुष्य होते आणि ती मधली काडी बाण. अजून एक दोन तास खेळायचे, धनुष्य बाणांनी. इतका संपूर्ण उपयोग असलेला दुसरा कुठला खेळ माहीत आहे तुम्हाला?

आपण दुसरीकडले खेळ आणून का खेळतो? पतंगा सारखा मनोरंजन आणि व्यायाम एकाचवेळी देणारा खेळ का नाही खेळत. अमदावादी, सुरती आणि राजकोटी लोक पतंगांच्या खेळांत तेवढेच प्रवीण असे ऐकले आहे. मग गुजरात आणि महाराष्ट्र अशी कॉम्पिटिशन का नाही घेऊ? माझे तर म्हणणे असे आहे ती भारत सरकारने आपले वजन खर्ची घालून ऑलिम्पिक मध्ये पतंगबाजी हा खेळ यावा असा आग्रह धरला पाहिजे.

इतर लोक आपले खेळ शिकून भले ऑलिम्पिक मध्ये सुवर्ण पदके मिळवत असोत, पण त्यांना हा खेळ जमायला थोडा वेळ लागेल. तो पर्यंत आपण तीन चार पदके मिळविलेली असतील.

आता राहिला प्रश्न धंद्याचा. पतंगबाजीमधील उलाढाल पाहून चिनी लोकांच्या तोंडाला पाणी न सुटते तरच नवल. आज चिनी पतंग सरसकट मिळत नसतील तरी चिनी मांजा नक्कीच मिळतो. आमच्या साधा मांजा आणि

घासलेट मांजा, चिनी मांज्या सारखाच सारखा, पण तो चिनी मांजा अजून बळकट, लोकांचे गळे कापण्या इतका बळकट. त्यावर बंदीच आणली पाहिजे. आमचा मांजा गळे कापू शकत नाही काय? चिनी कशाला पाहिजे.

पतंगाचा उद्योग भारतीयच राहिला पाहिजे. त्यांत इतर देशांची लुडबुड नको असे आम्हा देशप्रेमी भारतीय पतंगबाजांना वाटते. आपले काहीतरी विशेष असले पाहिजे की नाही? मग ती पतंगबाजीच का असेना.

तर मग मंडळी, मी शपथ घेतो की मी यापुढे फक्त भारतीय पतंगबाजीच करीन, त्यांत परक्यांचा समावेश होऊ देणार नाही. मी माझ्या पुढील आणि त्या पुढील पिढीला पूर्णतः भारतीय पतंगबाजच बनवीन. आपल्या भारतीयत्वाचा पतंगबाजीचा अभिमान बाळगेन आणि भारतीय पतंगबाजीचीच भरभराट करीन.

"भाभी" सिनेमांतले गाणे माझे राष्ट्रगीत असेल -

चली-चली रे पतंग मेरी चली रे
चली बादलों के पार, हो के डोर पे सवार
सारी दुनिया ये देख-देख जली रे
चली-चली रे पतंग मेरी चली रे

यूँ मस्त हवा में लहराए
जैसे उड़न खटोला उड़ा जाए
ले के मन में लगन, जैसे कोई दुल्हन
चली जाए रे सांवरिया की गली रे
चली-चली रे पतंग मेरी चली रे

रंग मेरी पतंग का धानी
है ये नील गगन की रानी
बांकी-बांकी है उठान, है उमर भी जवान
लागे पतली कमर बड़ी भली रे
चली-चली रे पतंग मेरी चली रे

छूना मत देख अकेली
है साथ में डोर सहेली
है ये बिजली की तार, बड़ी तेज़ है कतार
देगी काट के रख, दिलजली रे
चली-चली रे पतंग मेरी चली रे

# हिंदी नाटिका "भेजा"

पात्र - वोह और उनकी भाग्यवान

जगह - घरकी बैठक और रसोई

वो (बैठक से) - अरी सुनती हो? पप्पूको बहार भेजा है क्या?

भाग्यवान (अंदरसे) - मैंने भेजा नही है।

वो - वो तो ठीक है, लेकिन भैंसा भी दिख नही रहा, उसेभी बाहर भेजा है क्या?

भाग्यवान - में क्या जानू? आपनेही बाहर भेजा होगा।

भाग्यवान - आपनेही भेजा है क्या?

वो - उन दोनों को कहां भेजा है? भैसेंके साथ मुझेही भेजा होता तो अच्छा होता।

भाग्यवान - हां जी। येभी तो सही है।

जरा जानिये-

बोली हिंदीमें "मैने" याने "मुझे" और "आपने" याने "आपको"

जैसे की, "मैने" नही जाना है, यानी "मुझे" नही जाना है।

# गोरे और काले

"जसोमती मैयासे बोले नंदलाला, राधा क्यूँ गोरी में क्यूँ काला"

जब नंदलाला को ये सवाल आता है तो हमें कैसे ना आये? काला क्या और गोरा क्या बाहरी रंग हैं। अंदरसे तो सब एक जैसे हैं। फिरभी यह सवाल क्यों आता है?

हमारे भारतवर्ष में बहुत पहलेसे बाहरी लोगोंके आक्रमण हुए हैं। यहांके लोग तो सांवलेही थे। आर्य लोग बहुत पहले यहां आए। वे उत्तरी दिशासे आये जहां वातावरण ठंडा था और लोग गौरवर्णीय थे। ऐसा नही है के केवल वे ही गौरवर्णीय थे। ईरान, मेसपोटेमिया, अफ़ग़ान भी गोरेही थे। लेकिन बात केवल आर्योंकी ही होती है।

आर्य उत्तरी देशोंमें रहते थे जहां ठंड और सूरजकी रोशनी कम होनेसे उनके वर्ण विशेष गोरे हो गए थे। और एक वंशत्रुटिके कारण उनकी आंखें नीली, हरी, या भूरी थी।

a

यहां भारतवर्षमें आकर वे स्थायी होने लगे। धीरे धीरे यहांके लोगोंमें मिलघुलने लगे तो उनका वर्ण गेहुआ हो गया. ये कहते हैं कि मानवजाति तीन चार अलग अलग जगहोंसे विकसित हुई और धीरे धीरे सब जगहोंमे फैल गयी। अफ्रीकामें उनका वर्ण काला हो गया तो चीनमें पीतवर्णी हुए। उत्तर दिशामें वे गोरे हो गये और भारतवर्षमें वे गेंहुए हुए।

अब जब आर्य यहां आकर यहांके लोगोंमें घुलमिल गए तो वे भी गेंहुए हुए और उनमें कोई फर्क नही रहा।

मानवी दृष्टिकोण एक अजब बात है। हमें उजला रंग अच्छा लगता है। नीली आंखे हमें प्रसन्न करती हैं। वास्तविकतः अंदरसे हम एकही हैं। फिरभी हमें गोरेपनका विशेष आकर्षण रहा है।

देखिये ना, हमें स्त्री वर्ग गोरा चाहिए। पुरुष चाहे कितनेही काले क्यों न हो, स्त्री गोरीही होनी चाहिए। वैसे तो कोई भेदभाव नही करना चाहिए लेकिन हमारी संस्कृतिमें, कविताओंमें, साहित्योंमें स्त्री का वर्णन गोरी और सुंदर ही होगा। हम कविताओंमेंभी स्त्री को "गोरी" ही कहते आये हैं।

गोरापन हमें शुभ, पवित्र और दैवी लगता है और कालापन हिंसक, राक्षसी और अपवित्र लगता हैं।

पुरुष काले होकर भी बलवान, राजस, दैवी दर्शाए जाते हैं। इतने की हमारे जो देव वीरता, शक्ति और पूज्यता के प्रतीक हैं वे सब कालेही दर्शाये गयें हैं। राम, कृष्ण, शिव और विष्णु इसके उदाहरण हैं। गोरे देव कभी युद्धमें नही दिखते। वे केवल आपसमें भेदभाव करके अपने राजा इंद्र को सुखी रखते हैं। जहां भी युद्ध की बात आयी तो शिव और विष्णु के अवतार ही दिखाए गए लड़नेके लिए। ऐसा क्यों?

देवियां बहुतांश गोरीही दर्शायी गयीं हैं। लक्ष्मी, पार्वती, सरस्वती, सीता और दूसरी देवीयोंको देखिये। सब गोरी दिखाई जाती हैं। केवल जब दुष्टोंका, दानवोंका, अत्यचारीयोंका विनाश करनेके लिए देवियां सज्ज की गयी तभी वे काली दिखायी गयी हैं। तो यह भेदभाव भी हमने बना लिया है।

हम योरप, रशिया के लोगोंको देखते हैं, तो हम उनके गोरेपनसे उनको हमसे उच्च समझने लगते हैं। अफ्रीकी लोग भी उतनेही काबिल होते हुए हम उनका इतना सम्मान नही करते। हमारे परदेसी गोरेही होते हैं।

चित्रोंमें और फ़िल्मोंमे गोरे नायक नायिकाएँ हम देखना पसंद करते हैं। हमारी फिल्मी "कलियाँ" गोरीही होती हैं। हमारे फ़िल्मोंमे गोरा नायक और

काली नायिका कभी देखी है हमने? या तो दोनोंही काले? बहुत क्वचित। ना के बराबर।

हमारी इस दृष्टिका व्यावसायिक लोग उपयोग ना कर लेते तो ही अचरज होता। हमारी इंडस्ट्रीसे आती विज्ञापनोंको देखिये। बहुतांश विज्ञापन हमारे केश, त्वचा, दांत और सौदर्य साधनोंकेही होते हैं। केश वस्तुतः निर्जीव होते हैं। उनके लिए आधेसे ज्यादा विज्ञापन होते हैं, जैंसे केश अपनी जीवन और प्रकृतिको अतिआवश्यक हों।

युवा जब बड़े ही जाते हैं तब उनके शादीब्याहकी बातें चलती हैं। बहुतांशी उन्हें गोरी स्त्रीही चाहिए, वे खुद ऐसे तैसे हो तो भी। फिर हमारे विज्ञापन "फेयर एंड लवली" बनानेमें जुट जातें हैं।

"फेयर" की एक बात छोड़िये वोह तो भगवानकी देन है, लेकिन लवली तो कोई भी हो सकता है।

लेकिन हमारी लड़कियां "फेयर" होनेमें जुट जाती हैं। ये कौन देखता है कि कैसे सांवली लड़की या लड़का "फेयर" हो जाये। अब जब फेयर होनाही है तो लगालो इनका क्रीम। दस दिनोंमें फेयर, पंधरा दिनोंमें फेयर, गारंटी के साथ! चाहे इनके कितनेही साइड इफ़ेक्ट हो, चिंता कौन करता हैं। पंधरा दिनोंके बाद लड़की

गोरी हो गयी, किन्तु उसने क्रीम लगाना छोड़ दिया तो फिर सांवली हो गयी, अब वो जाएगी स्किन स्पेशालिस्टके यहां और अब पैसे खर्च करेगी त्वचापर हुए दुष्परिणामोंको उलझने के किये।

हमारे भारतवर्षमें सर्व सामान्य रंग सांवलाही हैं। कोई कम कोई ज्यादा। व्यक्ति केवल दिखनेसे गुणवान नही होता। वो एक पॅकेज है। वो संपूर्ण है जैसा भगवानने बनाया। सौंदर्य ये व्यक्तिमत्व का एक हिस्सा है। गोरापन तो सौंदर्य काही एक हिस्सा मात्र है।

शारीरिक सौंदर्य की व्याख्या ही क्या है? चेहरेकी रेखा, शरीरका ढांचा, रंग, तेज, रूप, आंखे, केश सब सौंदर्य जे केवल हिस्से ही हैं। फिर केवल रंगको इतना महत्व क्यों दिया जाय? विभिन्न हिस्सोंसे आकृति बनती है। केवल एक हिस्सा लेकर कोई सुंदर नही होता।

ऊपरवाला भगवान हंसता होगा यह देखकर, की मैंने इनको जो दूसरे गुन दिए हैं वे छोड़कर ये लड़के और लड़कियां केवल फेयर होनेमें क्यों लगी हैं। हमारे भगवान किसीपर अन्याय नही करते। कहीं ना कहीं सब गुणोंकी बिखरन करते हैं। हमही उन गुणोंको पहचान नही पाते।

a

बात रही लवली होने की। वो तो प्रकृतिकी देन ही होती है। "षोडश वर्षे प्राप्ते गर्दभीपी अप्सरा भवेत"। स्त्री और पुरुष अपने आपही आकर्षक होते है। पुरुषोँका सौदर्य है शक्ति और स्त्रियोंकी शक्ति है सौंदर्य।

रंगोंकी भिन्नतामें पुरुष काले हो तो भी शक्तिवान हों तो सराहे जाते हैं। गोरा जवान हो और शक्तिहीन हो तो उसे कौन सराहता है? क्योंकि पुरुष का नैसर्गिक काम है रक्षा करना। उसे शक्ति चाहिए, सौंदर्य नही। स्त्रियोंमे यह बात नही होती। उनसे कोई शक्ति की अपेक्षा नही करता। उन्हें केवल सुंदर दिखना है।

स्त्री और पुरूष दृढ़ हो, निरोगी हो, बात बनती है।

फिरभी हममें एक त्रुटि है। जो हमारे पास नही होता उसकी हमें आस लगी रहती है। नदी का दूसरा तट ज्यादा आकर्षक लगता है। इस से निर्माण होती है असूया। "उसका घोड़ा मेरे घोडेसे सफेद कैसे?" फिर लग जाती है उन घोडोंमें रेस। देखिये, इसमें भी सफेद रंग आ ही गया! हम गेंहुए हों तो गोरे होना चाहते हैं और काले हों तो गेहुआ भी चलेगा।

कितनी ही बार शादी तय करते हुए गोरेपनकी इच्छासे हमने दूसरे गुणोंको न देखते हुए अत्युत्तम रिश्ते होये होंगे। रंगांध हुए होंगे हम तब।

a

शायद पूरी मानवजात घुलमिल जाए तो शायद ये अंधापन कम हो जाएगा। सबके सब मानव एक वर्णके होंगे तो शायद हम सही तरीकेसे घुलमिल जाएंगे।

जब तक ये ना हो तब तक तो इस फर्क जे साथ रहनाही पड़ेगा।

हमारे कृष्ण कन्हैयाको भी गोरे काले का सवाल आया। जसोमतीने उनको समजाया की -

"बोली मुस्काती मैया ललन को बताया, काली अंधियरी आधी रात में तू आया, लाडला कन्हैया मेरा काली कमली वाला, इसी लिए काला।

बोली मुस्काती मैया सुन मेरे प्यारे, गोरी गोरी राधिका के नैन कजरारे
काले नैनों वाली ने ऐसा जादू डाला, इसी लिए काला।"

चलो, शायद कन्हैया मान गए ये सुनकर।
लेकिन हम? हम कैसे माने?
तो हमको भी फ़िल्म वालों ने समझाया -
"गोरे रंग पे न इतना गुम्मान कर
गोरा रंग दो दिन में ढल जाएगा!

समझ गए ना?

# राखी का फंदा

मध्या काल थोडक्यांत वाचला.

स्वारी नेहमीसारखी तयारी करून, कॉलर ताठ ठेवून, दाढी बिढी चकाचक करून, सेंट बिंट मारून बाहेर पडली. नेहमीच्या बसस्टॉपच्या अड्ड्यावर. येणाऱ्या जाणाऱ्या "गाड्या" बघत आणि मनातल्या मनात कॉमेंट्स करत. तेवढ्यांत तिथून एक घोळका आला, किलबिल करत. मध्याचे कान टवकारले गेले. चार पांच निरनिराळे गोड आवाज येत होते. घोळका बस स्टॉप जवळ आला. तिथे मध्याचे दोन तीन कॉम्पिटीटर उभे होते. घोळक्यांतील एकीने विचारले, "किती वाजले हो"? त्या बावळटाला कळलेच नाही काय होते आहे ते. त्याने आपला हात खिशांतून काढला आणि काय, चार पांच नाजूक हात पुढे झाले आणि त्याचा टोटल "भाऊ" झाला! पांच भावी बाळांचा तो "मामा" झाला!

मध्याने ते पाहिले मात्र, जो धूम ठोकून पळत सुटला तो सरळ हॉस्टेल च्या खोलीतच येऊन थांबला. जरा धाप लागलेली कमी झाल्यावर त्याला आठवले. "यार, आज कर्फ्यु चा दिवस. कसा काय विसरलो. जाऊ दे, दैव बलवत्तर म्हणून

वाचलो." मग गपचूप पॉवर इंजिनियरिंगच्या पुस्तकांत डोके खुपसून आख्खा दिवस काढलान त्याने.

हात सलामत तो लडकी पचास!

एक नाजूकसा रेशमी धागा, एक छोटेसे रंगीत कापशी फूल आणि एखादा मणी शोभेला. पण काय पॉवर असते या गोष्टींत! भल्याभल्या वीरांना खोलीत जखडून ठेवता येते संपूर्ण एक दिवस. एक दिवस तरी पक्का लक्षांत रहातो त्यांच्या.

राखी पौर्णिमेच्या सणाला एक पवित्र बंधनाने दोन जीव बांधले जातात. राखी बांधून घेणाऱ्याने राखी बांधणारीचे "रक्षण" करायचे, जन्मभर.

आमची शाळा कोएज्युकेशन वाली, मुले मुली एक वर्गांत, फिफ्टी फिफ्टी प्रमाणांत. अगदी शाळेपासून आमच्या मनावर बिंबवले गेले आहे की, "परस्त्री मातेसमान" किंवा, "परस्त्री भगिनीसमान", (पण एक सोडून). (कंसातली सप्लिमेंट आमची). "भारत माझा देश आहे, सगळे भारतीय आपले बंधू भगिनी समान आहेत", हे पहिली दुसरी पासून आमच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न चालला आहे त्यांचा, पण आम्ही कसले वस्ताद, आम्ही त्या घोषणेमध्ये "एक सोडून" घुसवलेच आहे.

आता, आमच्या शाळेत जेवढी मुले तेवढ्याच मुलीही होत्या. रेशो एकाला एक होता. त्यामुळे भाव खायला एवढा वाव नव्हता. सायन्स कॉलेजमध्ये गेल्यावर हा रेशो पाचाला एक इतका कमी झाला पण तेंव्हा त्या अभ्यासाच्या टेन्शन मध्ये असल्या गोष्टींमध्ये लक्ष घालायला वेळच नव्हता. इंजिनियरिंग कॉलेजमध्ये आमच्या बॅचला रेशो दीडशे ला चार एवढा झाला. तिथे गेल्यावर, जरा थोडा रंग चढायला लागला या बाबतीत. शेजारी दोन अजून कॉलेज होती मन रमवायला. तिथून रेशो वाढविण्यासारखा होता, पण फारसा सिरीयस विचार करायची ना हिम्मत होती ना ऐपत. मध्यासारखी थोडीफार हिरोगिरी करणे आणि नाही नाही ते विचार मनांत आणून अभ्यासाचे खोबरे करणे हेच हातांत होते.

सिरियस विचार करायची वेळ आल्यावर, "चर्चगेटच्या त्या प्लॅटफॉर्म वरची फुलपाखरे आपले लग्न जुळत असतांना कुठे नाहीशी होतात, आणि लग्न ठरल्यावर पुन्हा कशी प्रकट होतात ते ब्रह्मदेवाला विचारले पाहिजे" हा युनिव्हर्सल सवाल पुन्हा पुन्हा विचारला जातो. ब्रह्मदेवही आता त्या प्रश्नाला कंटाळून गेलेला असेल.

परस्त्री माते समान किंवा भगिनी समान हे आम्हाला, अगदी त्या मध्यालाही अगदी मान्य आहे, पण ते आम्ही लग्नबंधनांत गेल्यानंतर. पण तोपर्यंत काय?

राखी बांधून रिजेक्ट करणे ही हा एक फर्स्ट क्लास उपाय आहे. राखी बांधवून घेऊन रिजेक्ट करणे हाही एक छान पर्याय आहेच. हे पहा, शेवटी एकच

a

जोडी होणार आहे, हे तर उघडच आहे. पण तोपर्यंत तरी काहीतरी स्वातंत्र्य असले पाहिजे की नाही?

पण एकदाचे आपले लग्न झाले की मग आपल्या मनाचा रंगच बदलतो, कायमचा. मग राखीची काहीच दहशत रहात नाही. मग ताठ मानेने आणि छाती काढून कोणाच्याही पुढे जायला आपण भीत नाहीसे होतो. अर्थांत आपला गार्ड असतोच आपले रक्षण करायला हजर तिथे. उलटे ती पॉवरलेस झालेली राखी आता आवडीने बांधून घेतो आणि बांधून घेतांना बांधणारीने आपल्या गार्ड कडे टाकलेल्या कटाक्षांकडे संपूर्ण दुर्लक्ष करतो.

बघा, एके कालचे ते पॉवरफुल शस्त्र कसे बोथट होते ते.

पण राखीमध्ये सामर्थ्य असते यांत वादच नाही. तिचे हे सामर्थ्य इतिहासकालीन आहे. जर आपला नवरा लढाई करायला असमर्थ असला किंवा झाला किंवा शहिद झाला तर राण्या शत्रूला राखी पाठवून आपलेच रक्षण करीत असत, असे ऐकले आहे आणि इतिहासाच्या पुस्तकांतही वाचलेले आठवते.

राजस्थान हे एक लढाऊ राज्य. पण तिथे दिला शब्द सच्चा करायची आणि मानल्या बहिणीचे रक्षण करायची कडक पद्धत. सगळेच काही वीर नसणार,

काही काही राजकारणी आणि काही तर अगदी सरळ भित्रेही असतील. पण तिथल्या स्त्रिया म्हणजे ज्वलंत बाण्याच्या. त्यांना शीलाची किंमत प्राणांहून ज्यास्त. राणा जर नाउमेद झाला असेल तर राखी आणि बांगड्या एकाचवेळी पाठवून त्याची मर्दानगी जागी केलेल्याचीही उदाहरणे प्रसिद्ध आहेत.

आपले सैन्य हे एक शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत संस्था आहे. ऐन रणधुमाळीतही आपल्या सैनिकांनी एक आचार पाळला आहे. एक अभिमानाची गोष्टही ऐकली आहे की आपले जवानांनी, परस्त्रीकडून राखी बांधवून तिचे रक्षण केले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या मुलाबाळांचे आणि वृद्ध आणि अशक्तांचेही रक्षण केले आहे. राखी इथे रक्षकाचे रूप घेऊन आली आहे. इथे भावाने भावालाही राखी बांधली आहे. राखीचा सन्मान केला गेला आहे.

आपले चित्रपट म्हणजे एक अजब रसायन असते. आख्खा पिक्चर हिरो हिरोईन आपले नाचतात आणि गातात. पहा "बम्बई का बाबू". आणि शेवटच्या रिळांत त्यांना कळते की आपण भाऊ बहीण आहोत म्हणून. मग शेवटच्या रडारडीत पिक्चर संपतो, आणि प्रेक्षक डोळे पुसत त्या अश्रूंच्या लोंढ्या बरोबर वहात वहात बाहेर पडतो. "मेरी राखीका बंधन कभी नही तोडना, तुम्हें कसम है मेरी" वगैरे वाक्ये आठवत आपल्या घरचा रस्ता धरतो.

आपल्या चित्रपटांत मात्र सैन्याचा चांगला सन्मान केला आहे, राखीच्या बाबतीत, पहा "हिंदुस्थान की कसम".

बाकी फक्त राखी या विषयावर कमीत कमी पन्नास तरी पिक्चर निघाले असतील. पण सगळे रडके ते रडके. राखीचा आनंदी पिक्चर निघूच शकत नाही की काय?

राखीची मनी पॉवर पहायची असेल तर एकदा श्रावण वद्य चतुर्दशीला मार्केट मध्ये चक्कर मारून या. बंधुप्रेमाची किंवा भगिनींप्रेमाची किंमत बघून डोळे माश्या सारखे गोल होतील. कुठे तो "कच्चा धागा" आणि कुठे ती डिझायनर राखी!

असेल राखीची किंमत काहीही, पण म्हणून तिचे महत्व आणि भावना कमी होत नाहीत. एक सिम्बॉल आहे तो मानवी नात्याचा. त्याची किंमत काय करायची?

तर बंधूंनो, राखीचे सामर्थ्य समजून असा, तिचा कधीही अपमान करू नका. तिला भ्यायचे दिवस कधीच मागे गेले आहेत. आता दिवस आले आहेत तिला मान द्यायचे.

## श्रद्धा आणि अंधश्रद्धा

सगळ्या अंकांत सातला विशेष महत्व आहे असे दिसते.

सूर सात. रंग सात. आठवड्याचे दिवस सात. चंद्राचा प्रवास सात दिवसांच्या पटीत होतो. सात वर्षांच्या मुलाची मुंज करतात मग तो "मुलगा" होतो. स्वर्ग सात आणि नरक ही सातच.

सप्तसुरांच्या मिश्रणाला संगीत म्हणतात. सप्तरंगाच्या मिश्रणाला इंद्रधनुष्य. पण सात दिवस झाले की "आठवडा" का म्हणतात ते कोणीतरी समजवावे.

आणि अरे हो, माझा लकी नंबर सातच आहे.

असेल, योगायोग असेल. पण वालचंद कॉलेज मध्ये आल्यावर मला हा सात आणि चारचा योगायोग लक्षांत आला. सातच्या निम्मे साडेतीन पण जवळचा पूर्णांक म्हणजे चार. म्हणून सात आणि चारचा योग म्हटले.

माझ्या, म्हणजे कोणाच्याही जन्मतारखेची बेरीज करायची. माझा पृथ्वीतलावरचे अवतरण २० ऑक्टोबर १९४८ साली झाले. पण आमच्या अहमदाबादच्या शाळेतल्या हेडमास्तरांनी आमची जन्मतारीख २० नोव्हेंबर

१९४८ करून टाकली. माझ्या आईवडिलांनी ती मुंबईच्या शाळेंत बरोबर करायचा फार फार प्रयत्न केला. पण काय करावे, सरकारी हत्ती सहज चालत नाही. मी चांगला आठवीत जाई पर्यंत कसून प्रयत्न करूनही जन्मतारीख काही सुधारली नाही. मग काय करणार, २० नोव्हेंबर १९४८ लाच माझा सरकारी वाढदिवस लागू झाला. पण आपले धरावतरण ज्या दिवशी झाले तोच वाढदिवस म्हणून साजरा करतो बापडा.

काही लोकांची जन्मतारीख १ जून असते. का तर शाळेत घालतांना सहा वर्षे पूर्ण झालेली असावीत म्हणून. माझ्या ओळखीचे असे कितीतरी जण आहेत.

तर मग, २० ऑक्टोबर १९४८ ची बेरीज होते ५२, म्हणजे सात. मग माझा लकी नंबर सात झाला.

कॉलेजच्या पहिल्या वर्षांत सगळे ठाकठीक झाल्यामुळे चिरोच्या पुस्तकाचा फारसा अभ्यास झाला नाही. सगळा अभ्यास इंजिनियरिंगची पुस्तके, Nइ फ्लेमिंगच्या कादंबऱ्या, जेम्स हॅडली चेझ ची थरारक पुस्तके आणि इतर वाङमयांत केला गेला.

a

पुढच्या वर्षी मात्र आपल्या दाणादाणीचे "चिंतन" करतांना लक्ष्यांत आले की आपला रोल नंबर आणि परीक्षेचा सीट नंबर चार दाखवितो आहे. मग चिरोच्या त्या ऋषीवाणीची आठवण झाली. जीवन चक्र गोल गोल फिरते म्हणे. कधी वर कधी खाली. आमचे जीवनचक्र सात आणि चार पॉईंट्स धरून फिरत असावे. सात आकडा आला की बेस्ट, चार आला की वर्स्ट.

आख्ख्या SE मध्ये माझा रोल नंबर आणि परीक्षेचा सीट नंबर चार दाखवत राहिला. मला टेन्शन देत राहिला. TE ला सगळे हे आकडे सात झाले. वर्ष छान गेले. BE ला नऊ आकडा आला, मध्यम, ना टेन्शन ना आनंद. बरे गेले वर्ष.

नंतरही जेंव्हा जेंव्हा बऱ्या वाईट गोष्टी होत गेल्या तेंव्हा तेंव्हा हे आकड्याशी ताडून पाहिले मी. बऱ्याच गोष्टी जुळल्या. पण ज्यावेळी लक्षांत आले की आपला यावर काहीच कंट्रोल नाही, तेंव्हा फक्त जुळविण्या पलीकडे काहीच केले नाही. टेन्शन घेत राहिलो आणि वाट पाहत राहिलो.

चिरोने अजून एक केले आहे, पळवाटा ठेवल्या आहेत. पूर्ण जन्मतारीख, फक्त वर्ष, फक्त तुमच्या गाडीचा नंबर वगैरे. अक्षरावरून आकडे काढायचे. कुणी निराश व्हायचे नाही. कुठलातरी आकडा आपल्याला लकी होतोच.

a

मी काय म्हणतो, तुम्ही एकदा तुमच्या आयुष्यांत काय काय घडले याचा आढावा घ्या ना. तुमच्या जन्म तारखेची बेरीज आणि त्यांत चार मिळवून दोन अंक काढा आणि चांगल्या वाईट घटनांना जोडून बघा. फार सिरियसली नाही. एक गम्मत म्हणून. कदाचित जुळेल.

काही साधु आणि काही संत म्हणतात की हे सर्व झूठ आहे आणि आपली कर्मेच आपल्याला जीवनाचे रंग दाखवतात. असेल. पण मजा म्हणून एकदा बघायला काय हरकत आहे.

राशीचक्र पुस्तकांत लिहिले आहे की तुमचे आयुष्य, तुमचा तो लकी नंबर धरून, हे विधिलिखित आहे. साडेसाती ही एका खडबडीत रस्त्यासारखी आहे. अश्या रस्त्यांवर कोणी १०० किमी वेगाने गाडी चालवतो काय. पण तुम्हाला माहितीचे होते की पुढचा रस्ता कठीण आहे, जीवनाची गाडी जपून हाका.

हे सगळे त्या साडेसाती सारखे आहे. होणार नक्की पण काही करू तर शकणार नाही. तर मग मन घट्ट करणे आणि आल्या योगाला तोंड देणे, धीराने. मग या राशीचक्र किंवा चिरोच्या पुस्तकाचा उपयोग काय? सावधानता, तयारी आणि मनशक्ती.

आता कुणी म्हणेल की हा सगळा चक्रमपणा आहे हा. असेल. जेंव्हा झटका बसतो तेंव्हाच देवाची आणि चिरोची आठवण येते.

आपला हा चंद्र आहे म्हणून आठवडा वगैरे होतो. जर चंद्र नसता तर फक्त दिवस आणि वर्षच राहिले असते. मग साताची जोड कमी झाली असती. चंद्र नसता तर साडेसातीच नसती.

अंधश्रद्धा विरोधक आता माझ्यावर हल्ला करतील. माझी कुचेष्टाही करतील. फक्त ती करतांना त्यांनी हे पहावे की  कितीजण गाडीला लकी नंबर मागतात आणि त्या नंबरला अधिकचे पैसेही देतात, कितीजण नवी गाडी घेतली की तिला हळद कुंकू लावतात, कितीजण तिच्या टायर खाली लिंबू चिरडतात, कितीजण गाडीला लिंबूमिर्ची लावतात, किती लोकांनी नव्या घरांत रहायला जातांना गृहशांती केली आहे, किती लोक नवीन मशीन चालू करतांना नारळ वाढवितात, कितीजण अलाबला करून बालकांची दृष्ट काढतात, किती जण नवीन प्रोजेक्ट चालू करतांना बळी देतात. ते सगळे श्रद्धाळू! नशिबावर विश्वास असणारे.

आपल्याला वाटते ती श्रद्धा, दुसऱ्याला वाटते ती अंधश्रद्धा असे एक सोपे गणित आहे. जे दिसत नाही त्यावरचा विश्वास म्हणजे श्रद्धा किंवा अंधश्रद्धा.

इंजिनीयर म्हणून मी डिझाइन केले, योग्य पद्धतीने फॅब्रिकेट केले, मला माझ्या डिझाइन मध्ये पूर्ण विश्वास आहे आणि त्या केलेल्या वस्तूंवर पूर्ण भरवसा

आहे. नक्की चालणार आहे ती वस्तू, जशी पाहिजे तशी. पण तरीही मी चालू करतांना नारळ वाढवतो, गृहशांती करतो, लिंबूमिर्ची लावतो. अगदी टोकाची गोष्ट म्हणजे कोंबड्या बकऱ्याचा नैवेद्य दाखवतो, ते सगळे कामकरी म्हणतात म्हणूनच बरका. असे का बरे?

अंतराळात पृथ्वीसारखे अजून ग्रह असतील आणि त्यावरही आपल्यासारखी विचारवंत सृष्टी असेल ही एके काळची श्रद्धा आता कदाचित आपल्याच आयुष्यांत दृष्टीस पडण्याची शक्यता झाली आहे आणि पृथ्वीच्या खालचा तो नरक किंवा ते सागरातील कासव नाहीसे झाले आहेत.

आपल्याला जेंव्हा वैचारिक लिमिट येते तेंव्हा झाल्या गोष्टीचा उलगडा करण्यासाठी काहीतरी नवीन कल्पना लढवायला लागते. कुठेतरी, कुणावर तरी त्याचे खापर फोडायला. मग आम्ही चिंतामुक्त. आता तो सगळे बघून घेईल.

देव आणि कर्म या अश्याच कल्पना.

आपल्या प्रश्नांची उत्तरे कोण देणार, तर देव. जसजसे आपले ज्ञान वाढत जाईल आणि प्रश्नांची उत्तरे मिळत जातील आणि जेंव्हा आपल्या ज्ञानाचा आधारे प्रश्नच नाहीसे होतील तेंव्हा देवाने काय करायचे? पण एक चांगले आहे की एक उत्तर पुढचे दहा प्रश्न उपस्थित करते. त्यामुळे देव कधीच ऑबसोलीट

होणार नाही. आपल्या आयुष्याशी संबंधित प्रश्न तर राहतीलच.  देवाची गरज भासेलच.

काही चांगले झाले तर "देव पावला". आणि अघटित, वाईट झाले तर "कर्म माझे". "भोग आपल्या कर्मांची फळे". "देव देतो पण कर्म नेते". असे कां हो? कदाचित हा कॉन्सेप्ट सोपा करण्यासाठी सुकर्म म्हणजे धर्म आणि कुकर्म म्हणजे कर्म असे शॉर्टफॉर्म केले असावेत. तर मग चांगले कर्म हा विचारच चुकीचा आहे. कर्मधर्म संयोग हा अनैच्छिक असेल.

सुकर्मे आणि कुकर्मे बँकेच्या अकाउंट सारखी साठून राहतात काय? देवाची पूजा केली की धर्म. चावऱ्या कुत्र्याला लाथ घातली की कर्म. मांजराला दूध पाजले की धर्म, मग त्याने जाऊन सुदृढ होऊन उंदीर मारला तर ते कर्म कुणाचे? आणि हा धर्म आणि कर्माचा बॅलन्स शीट बघायचा कसा? ते आपल्या अकाउंट मधून मधून वाटता येत नाहीत का, किंवा खर्च जरून टाकता येत नाहीत का? कायमचे आपल्या अकाउंट मध्ये बसून रहातात का?

एक तर असा हिशेब मांडत बसूच नये. आपल्या पद्धतीने जीवन जगत राहावे, जे होईल ते चांगलेच असेल असे मानत जे काही कर्म धर्म करायचे ते करत रहावे. वरचा जो न्यायाधीश आहे, चित्रगुप्त नावाचा, त्याच्यावरच सोडून द्यावे हे बरे.

उगाच आपल्या डोक्याला ती धर्म, कर्म आणि लकी, अनलकी नंबरची कटकट पाहिजेच कशाला.

# संगीत साधना

सप्तसुरांच्या मिलापाने संगीत होते.आणि कलकलाटही. सात सूर एकमेकांना पूरक असतील तर मनाला उल्हसित करणारी संगीत रचना होते. सुरांचा एक संगम आणि त्याला साथ देण्यासाठी तालांची साथ.

संगीत रचनेला "राग" का म्हणतात ते मला आजपर्यंत उमगलेले नाही. आणि त्या "रागां"ना अशी नावे कोण आणि कशी देतो तेही.

अडाणा, मारवा, झिंझोटी, ललत (बाळांच्या भाषेत रडत), तोडी, मियाँ की तोडी, बैरागी, भूकोष, जोगीया, लचारी तोडी अशी नावे ऐकली की धसकाच बसतो आम्हाला. एक प्रकारची भीतीच वाटते त्या "रागां"ची. तसेच कलिंगडा, काफी, तिलक कामोद, जैत कल्याण, दरबारी कानडा, पहाडी, बिलासखानी तोडी अशी नावे ऐकली की विस्मय वाटतो, की नावे देणाऱ्याची कल्पनाशक्ती केवढी अफाट असेल अशी.

पण त्यांपासून सुटका करणारे इतर अनेक "राग" आहेत ते पाहून जरा हायसे वाटते.

a

निसर्ग एक सुंदर मिलाप करण्यांत  अतिशय माहीर आहे. स्वरांचे आणि तालांचे सुरेख किंवा गंभीर मिश्रण करावे ते निसर्गानेच. एकाच पर्जन्य ऋतूंत मेघांचा घनघोर आवाज, विजांचा कडकडाट किंवा पर्जन्यवृष्टीची नाजूक किणकिण निसर्गानेच करावी. षड्ज, रिषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत आणि निषाद या सुरांचा निरनिराळ्या प्राणी पक्ष्यांच्या आवाजात आणि नैसर्गिक ध्वनित उगम करून निसर्गाने ही मनुष्य मात्रांना देणगीच दिली आहे.

संगीत रचना आपल्याला सुखवितात, आनंदी करतात किंवा कधी दुःखी, निराश ही करतात. मनाचे सगळे मूड संगीत रचनांत प्रतिबिंबित होतात.

तसे आपल्याला उपजत "गळा" आणि सूर "रचना" देवाने दिलीच आहे. अंगावर पाणी पडले रे पडले की आपण गायक होतोच. नहान नावाचा राग असेल कुठंतरी पण अजून वर्णन कधी वाचले नाही, ऐकला मात्र खूपदा आहे. पाणी सुरू की नहान राग सुरू, पाणी बंद किंवा संपले की रागही बंद. आता काही लोक या गात्या गळ्याला "नरडे" म्हणतात, त्यांना विघ्नसंतोषी म्हणावे की दुष्ट तेच कळत नाही.

माणसाने गाणे शिकावे.

"पर गुरुबिन ग्यान न आवे|" या उक्ती प्रमाणे कोणीतरी गुरू पाहिजेच या विद्येला. आम्ही लहान असताना "ऑल इंडिया रेडिओ" आमचा गुरू होता. अगदी १९५४ पासून १९६४ आणि पुन्हा १९६६ ते १९७१ पर्यंत आम्ही त्याची "कास" सोडली नाही. पार १९७१ पर्यंत बिनाका गीतमाला असेपर्यंत रेडिओ आमचा गुरुजी झाला होता.

आमच्या घरांत सिनेमाची गाणी म्हणायला थोडीशी बंदीच होती. पण मुंगळा कसा गुळाकडे ओढला जातो तसे आम्ही सिनेमांच्या गाण्याकडे ओढले गेलो होतो. शाळेंत असतांना घडाळ्यापेक्षा रेडिओच्या गाण्यांच्या कार्यक्रमांवर आमचे टाईमटेबल बसलेले होते. कामगार सभा संपेपर्यंत घरातून निघाले नाही तर नक्की उशीर होणार शाळेला. रस्त्यातून चालता चालता रनिंग कॉमेंटरी सारखा रेडिओ आमचा पाठलाग करत असायचा. १९६४ मध्ये सायन्स कॉलेजला गेल्यावर दोन वर्षे खंड पडला. पण १९६६ पासून पुनर्भेट झाली आमची ती १९७१ पर्यंत.

आम्ही चौथी पाचवीत असतांना आम्हाला टेबलावर किंवा जाड पुस्तकावर ताल धरायला जमू लागले होते. नुसत्या उनाडक्या करीत फिरण्यापेक्षा काहीतरी संस्कृतीप्रधान करावे म्हणून आम्हाला माझगावच्या "सातमकर संगीत विद्यालया"त तबला शिकायला घातले. हळू हळू आम्हाला तीन चार ताल वाजवता येऊ लागले. आमचे गुरुजी बेने इस्राएल होते. त्यांची

a

सगळी मुले आणि स्वतः पती पत्नी संगीतांत प्रवीण होते. त्यांच्या कडे दोन तीन वर्षे शिकत होतो. सोलो वाजवता वाजवता ताल धरता येऊ लागला होता. आम्ही आठवीत गेल्यावर शाळा दुपारची झाली आणि क्लासला खंड पडला. पण त्या वयांत शिकलेले लगेच उडून जात नाही. रहाते आपल्याकडे काहीतरी.

आम्ही आठवी नववीत असतांना आमच्याकडे एचएमव्ही चा ग्रामोफोन, म्हणजेच फोनो आणला. त्याच्याबरोबर चाळीस पन्नास रेकॉर्डसही. त्यावेळी नाट्य संगीतांच्या रेकॉर्डस् फार प्रसिद्ध होत्या. आशा भोसले, छोटा गंधर्व, हिराबाई बडोदेकर यांच्या त्या रेकॉर्डस् म्हणजे अवीट संगीताची मेजवानीच होती.  काही थोड्या सिनेमांच्या गाण्यांच्या ही, अगदी निवडक, होत्या. मला गळा नाही तरी तालाचे देणे देवाने दिले होते. मला ऐकून ऐकून बरीच नाट्यगीते म्हणता येऊ लागली.

आमच्या शाळेत, सारस्वतांची शाळा बरं का, दोन तीन शिक्षक होते की ज्यांना नाट्यगीते आवडायची. एकदा मला त्यांनी नाट्यगीत म्हणायला सांगितले वर्गांत. आढेवेढे घेण्याचा आपला स्वभाव कधीच नव्हता. मृच्छकटिक नाटकांतले "रजनीनाथ हा नभी उगवला" हे खणखणीत आवाजात अगदी लयीत म्हणून दाखवले. सर खरंच खूष झाले त्यावर. मग मला एसीसी कॅम्प मध्ये आणि शाळेच्या गॅदरिंग मध्ये आमच्या वर्गाची फिक्स जागा

a

मिळाली नाट्यसंगीत आणि अजून काहीतरी गायला. हे सर्व छान चालले एसएससी पर्यंत.

सायन्स कॉलेज हे शाळेतले गुण विसरायला लावते वाटते. १९६४ ते १९६६ च्या कॉलेजच्या वर्षांत विसर पडला या सर्वाचा.

नंतर कानसेनच झालो त्यानंतर. नाही म्हणायला TE ला आणि BE ला असतांना तबला आणि ढोलक वाजवायला मिळाला एक दोनदा. ॲन्युअल डे ला प्रॅक्टिस पुरता काही ग्रुपना मी तबला आणि ढोलक वाजविला, एकदा दोनदा स्टेजवर ही कुणालातरी साथ म्हणून.

पण खंड पडल्यामुळे वाजविण्याचा हा प्रयत्न फारसा दिमाखदार झाला नाही. बरेच लोक असे असतील की ज्यांनी कधी न कधी गाण्याचे किंवा बजावण्याचे शिक्षण घेतले असेल. पण पुरेश्या सरावाखेरीज त्यांत गती रहात नाही हे सत्य आहे.

नित्य सराव करणारे मात्र पुढे येतात आणि त्यांची वाहवा होते. आपल्या वर्गांत कितीतरी जण होते की जे खरोखर सुंदर गायचे. काहींचे गाणे एवढे परफेक्ट होते की डोळे मिटून ऐकले तर त्या ओरिजिनल गाण्याची आठवण यायची.

a

वालचंद कॉलेजच्या ॲन्युअल डे ला कोनापुरे ने म्हटलेले "जीवन से भरी तेरी आंखे" अजून डोळ्यांपुढून जात नाही. किती परफेक्ट म्हटले होते त्याने.

आपण आपले सुप्त गुण आपल्यापाशीच ठेवतो. कधी करियरच्या दबावाने कधी भिडस्त स्वभावामुळे आपण त्यांचा विकास करत नाही. पण कलाकार आपल्या अंतरंगांत जागाच असतो.

आता सगळेच लता मंगेशकर, मोहमद रफी, मुकेश कसे होणार, किंवा भीमसेन जोशी, कुमार गंधर्व किंवा हिराबाई बडोदेकर कसे होणार? त्यांनी आयुष्य घालविले आहे त्या साधनेत. दुसरे सगळे बाजूला ठेवले आहे त्यांनी, ध्यास घेतला आहे त्यांनी. जर आपल्याला त्यांची पन्नास टक्के जरी कॉपी करता आली तरी विशेष म्हणावे लागेल.

कॉपी करणे इतर ठिकाणी एखादे वेळी अक्षम्य असेल कदाचित पण कलांमध्ये नक्कीच नाही. उलट ज्याची कॉपी करतो त्याचा तो एक प्रकारे सन्मानच होतो म्हटले पाहिजे. कॉपी कशाची होते, उत्तमोत्तम गोष्टीची. ते संगीत असो की चित्रकला.

आपली संगीत वाद्येच पहा. एक तानपुरा आपल्या चार तारांनी एकदम मन प्रसन्न करतो. तबला म्हटले तर सोलो वाद्य म्हटले तर साथीचे वाद्य. पण आपले

a

तबला नवाझ पहा. मंत्रमुग्ध करतात. तीच जादू सतारींत आहे. आपले स्वरमंडल छेडल्या बरोबर सगळे घर कसे सुरमय करते. माझ्यामते स्वरमंडल घरांत असावे. जातायेता त्याच्या तारा छेडल्या तर मनांत रागाचे, म्हणजे मनांतील रागाचे, विचारच येणार नाहीत.

जगांत अशी वाद्ये सगळीकडेच आहेत. आफ्रिकेतले लोक म्हणजे देवदत्त सुरेल असेच असतात. काहीही साथ संगत नसली तरी जात्याच ते लोक इतके सुरेल गातात की ते ऐकलेच पाहिजे. अकौस्टिक गिटार हे सतारी इतकेच नादमय वाद्य आहे. पण त्या इलेक्ट्रिक गिटार नावाच्या भयानक वाद्याने त्याला झाकोळून टाकले आहे. पाश्चिमात्य संगीत आपल्या रागदारी इतकेच मनभावन असते.

आपल्या वाद्यांची त्यांनी आणि त्यांची आपण कॉपी केली नसती तरच नवल. पण आपल्या संगीतकारांनी केली तर ती उचलेगिरी आणि त्यांनी केली तर ते फ्युजन म्युझिक असा भेदभाव करता कामा नये.

पंडित रविशंकर आणि पंडित झाकीर हुसैन यांनी आपले आणि पाश्चात्य संगीत यांचा जो मिलाफ केला त्याने भारतीय संगीत पृथ्वीवर अमर केले. त्यांची जोडी म्हणजे या भूतला वरचा एक चमत्कार आहे.

आपल्या संगीतकारांनी काही वेळा सरळ सरळ आणि काहीवेळा आपल्या भारतीय संगीतात त्याचे रूपांतर करून आपल्या चित्रपटसृष्टीला जे संगीताचे देणे दिले आहे त्यांचे ऋण कोण मानणार नाही?

कॉपी करायला सुद्धा टॅलेंट लागतो. कोणीही उठला आणि कॉपी केली तर ती चालत नाही. संगीत साधना फक्त क्लास मध्ये किंवा गुरुची सेवा करूनच होते असे मुळीच नाही. त्याला कान आणि मन असले की पुरे. रेल्वेगाडी चालतांना किंवा टांग्याची टपटप ऐकतांना तेवढेच सुख मिळत नाही काय?

साधे दोन पंखे फिरत असावेत, त्यांच्या मोटरचे आवाज बीट्स निर्माण करतात. नुसता एसीचा आवाज आपल्याला रागदारीची आठवण करून देतो. आपले मन गोंधळात लय आणि सूर शोधते, म्हणून गाडी चालवतांनाही गाण्याचा आभास होतो. पाहिले आहे का कधी? म्हणून आपल्याला बैलाच्या आवाजांत रिषभ सूर आणि कोकिळेच्या सुरांत पंचम जाणवतो.

सूर आणि तालात आपण खरेतर बुडालेले असतो. अगदी शांत रेकॉर्डिंग रूम मध्ये किंवा नाट्यगृहांत बसून बघा. मन बेचैन होईल. जिथे समुद्राच्या लाटांत आपल्याला लय सापडते आणि एखाद्या मशीनच्या आवाजांत सूर तिथे आपण संगीतबधिर आहोत असे कसे म्हणता येईल.

a

संगीताचा कान, म्युझिकल इयर, कमीज्यास्त प्रमाणांत सगळ्यांनाच असतो, अगदी शास्त्रज्ञांनाही. डॉप्लर नावाच्या शास्त्रज्ञाने डॉप्लर इफेक्ट शोधून काढला आणि तरंगमय शास्त्रांची नवीच एक कल्पना उगम पावली. असे म्हणतात की त्याने एका बग्गीवर दोन वादकांना बसविले आणि त्यांना अगदी काटेकोरपणे तेच सूर वाजवायला सांगितले, आणि बग्गी जवळून जात असताना अचूक सूर ओळखायला दोन लोकांना उभे केले. त्यांनी सुरांतला फरक डॉप्लरला दाखवून दिला आणि डॉप्लर इफेक्ट चा जन्म झाला. त्यावरून बग्गीचा वेग काढता येऊ लागला. हाच डॉप्लर इफेक्ट आज सगळ्या खगोल शास्त्राचा पाया झाला आहे. ही आहे संगीताची किमया.

सात सूर, त्यांची अगणित मिश्रणे आणि त्यातून निर्माण होणारे ते विलक्षण अनुभव यांत आपण अगदी जन्मापासून अंतापर्यंत बुडालेले असतो. आपल्याला संगीत वेगळे करता येणारच नाही.

भले रागांची नावे काहीही असोत आणि तालांचीही. जशी ही हृदयाची लय आणि कोकिळेची कुहुकुहू तसेच आपल्याशी एकजीव झालेले हे नादब्रह्म.

# आप कतारमें हैं

हमारे भाई बहनों, हम अब बहुतसी परियोजनाएं शुरू करने जा रहे हैं। सभी परियोजनाओंका सबको वितरण होगा और हम सबको इनका बहुत लाभ होगा। सभी परीयोजनाएँ आपको दृष्टिमें रखकरही बनायी जायेगी और सबका उद्देश्य सबको साथ लेकर जाना होगा। किन्तु आप जानतेही होंगे कि विस्तृत वितरण के लिये हमको अपनी कड़ी तपस्याका आधार लेनाही होगा। इसलिए भाई बहनों, हमको कतार लगानी पड़ेगी। आइये आप कतार में हैं।

पहली परियोजना

हम जानते हैं कि इलेक्ट्रिक गाड़ी खरीदना और उसमें बैठकर आरामसे प्रवास करना आपको कितना भायेगा। इसलिए हम इसका शुभारंभ पहले करेंगे। हमारी इलेक्ट्रिक कार दुनियाके किसीभी इलेक्ट्रिक कार से कम नही होगी। कीमतमें भी। हमने इसका निर्माण कार्य पहलेसे ही शुरू किया है। हमारी इलेट्रिक कार सबके किये सुलभ होगी और उचले और निचले स्तरोंकोभी किफायती और उपयुक्त होगी।

हमारी कार का नक्शा खास भारतीय रस्तोंके किये और खास भारतीय पद्धति के अनुसार होगा। उसमें एक हाथगाडी का ढांचा होगा और बिजलीपर

चलनेवाली मोटर होगी जिसकी पावर आप खुदही एडजस्ट कर पायेंगे। भला कैसे? अरे भाई, उसको आपही पावर देंगे ना, जितनी चाहे उतनी। चार व्यक्तियोंके किये चार कुर्सियां होंगी और पैरोंके यहां चार पेडल। जब आप पैड़ल मारेंगे तो वोह एक डाईनामो चलाएंगे और एक बैटरी चार्ज होगी। और फिर वो मोटर। फिर आप खुशीसे यहां वहाँ जा सकेंगे। ये रहा बेसिक मौडल।

डीलक्स मौडलमें एक छोटा इंजन रहेगा, वही जो आप पावर जानेपर घरमें या दुकानमें लगाते हैं। उससे बैटरी चार्ज होगी और आपकी इलेक्ट्रिक कार चलेगी। इंजन न चले तो पेडल तो होँगेही। देखिये ये कार दुगुना फायदा देगी। रास्तेपर तो चलेगीही और फिर आपको जिम भी जाना नही पड़ेगा। बनेगी और मिलेगी कब? जल्द ही, डिज़ाइन तो शुरुभी हो चुका है। तो बुक कीजिये आजही। कलसे ऍप लॉन्च होगा। आप कतारमें हैं।

दूसरी परियोजना

हम ये भी जानते है कि आपको रसोइमें कितनी कठिनाइयां होती हैं। गैस का सिलिंडर पाना, उसके किये नंबर लगाना। उसकी ऑन लाईन पेमेंट करकेभी दिनोंतक राह देखना इत्यादि। अब इस नयी परियोजनासे सब  कष्टोंसे मुक्ति मिलेगी। हम आपके लिए एक बेहतर डिज़ाइन बनाने जा रहे हैं, जिससे आपको न केवल गैस सिलिंडर से मुक्ति मिलेगी पर आप आत्मनिर्भर भी हो जायेंगे।

a

हमारे यहां सूर्य शक्ति की कोई कमी नही। कितना भी चाहो सूर्य शक्ति से आप चाहे जो कर सकते हैं। भोजन का निर्माण भी। आपको केवल हमारे यहां रजिस्टर करना होगा। हम आपको ऐसी तरकीब बताएंगे कि जिससे आप आत्मनिर्भर भी होंगे और आप अपनी पसंदीदा भोजन बना सकेंगे।

क्या है वो तरकीब? अभी बताते हैं। क्या आप गांवमें रहते है? या फिर शहर में? हमारे डिज़ाइन बहुत कस्टमाइज़्ड है। द्रौपदी की अक्षय थाली की कथा सुनीही होगी। बस उसी प्रकारका हमारा डिज़ाइन होगा। एक डिब्बा होगा और एक बड़ी सी कांच। बस हमारे शास्त्रीय पद्धति से जुटाइये, हो गया काम। कब मिलेगा डिज़ाइन? अभी हम आपका डिज़ाइन कस्टमाइज़्ड करनेमें जुटे हुएं है। फिर उसकी कीमत का सर्वे करेंगे। और फिर होगा डिज़ाइन लॉन्च। जल्दही हम पहले आओ पहले पाओ सिस्टिमसे एक ऍप लॉन्च करने जा रहे हैं। फिर आपको गैस सिलिंडर से मुक्ति। बस बुक कीजिये और थोडासा इंतजार। आप कतार में हैं।

तीसरी परियोजना

कपडे धोनेकीं मशीन तो आपके पास होगीही। किन्तु कपड़े सुखानेकी शायद नही। तो जुड़ जाइये हमसे। हमने एक टेक्नॉलोजी विकसित की हैं जिससे आप मशीनमें धोये हुए कपडे किसीभी एनर्जी या पावर का इस्तेमाल न करते हुएं

a

भी अच्छी तरहासे सुखा सकते हैं और बोनस के तरीके निरजंतुक भी कर सकते हैं।

क्या है यह तरकीब? देखिये, आजकल कॉम्पिटिशन बहुत है इसलिए हम यहां सबकुछ खुला नही कर सकते, पर यह जरूर कह सकते हैं कि आपके कपड़े बिल्कुल सुखेंगे। बस आपको हमारे वेबसाइटपर जाकर अपना नाम, पता, पैन नम्बर, ई मेल, और आधार कार्ड नंबर देना है। और कीमत अपनी सुविधासे अपने मोबाइल या कम्प्यूटर से अपनेही घरसे भेजनी है। आपको रसीद तुरन्त वेबसाइटसे ही मिलेगी और हमारा टेक्नीशियन आपके घर आके इंस्टाल कर देगा। बस जल्दीसे बुक कीजिये क्योंकि आप बहुत लंबी कतार में है।

अब आप पूछेंगे की ये परियोजनाएं यहांपर खुलके क्यों नही बताई जाती और उनका वर्णन इतना अगम्य क्योँ है। भाईसाहब, अभी बता देते हैं।

देखिये आजकल ये आईपीआर और पेटन्ट वगैरे का इतना झंझट हुआ है और फील्ड में इतनी कॉम्पिटिशन बढ़ी है कि हमें अपना उद्योग सम्भालनेके लिएभी नाकमे दम कर रखा है। हम आज कुछ तरकीबे और प्रोडक्ट खुला करें तो हमेही बैठ जाना पड़ेगा।

a

और फिर अब तो ऑनलाईन सबकुछ करनेकी आदत पड़ी है जिससे आज परियोजना खुलकर दिखानेमे भी डर है और धोखा है कि हमारी मेहनत पर कोई परदेसी आकर हाथ न मार जाए। इसलिए हमें यह तरीका अपनाना पड़ रहा है।

तो आ रहे हैं न आप हमारे साथ? करेंगे न हमारी प्रोडक्ट का इस्तेमाल?

देखिये ना हम भी आपकी सेवा करनेमें कतारमेही हैं।

# चित्रपट रसग्रहण "३ इडियट्स"

शाळेत असताना रसग्रहण नावाचा एक उपविषय असायचा, त्यांत दिलेली कविता किंवा लेखाचे रसग्रहण करायचे. त्यांत ती कविता किंवा लेख पूर्ण वाचून समजून त्यावर आपली टिप्पणी करायची. ५ मार्कांचा प्रश्न असायचा. आजकाल हा उपविषय आणि ते रसग्रहण थोडे विसरले गेले आहे. पण करून बघू.

३ इडियट्स हा चित्रपट २००९ साली आला होता. त्यावेळी आमची मुले कॉलेजांत होती, त्यांनी या चित्रपटाची सीडी आणली होती. मला त्यांनी फार आग्रह केला की बाबा तुम्ही बघाच एकदा, चांगला मेसेज आहे त्यात, म्हणून बघितला आणि इतका तो "चावला" मनाला की त्याची पारायणे झाली. चघळला संपूर्ण चित्रपट पुन्हा पुन्हा.

गोष्ट तीन मुलांची. इंजिनियरिंग कॉलेजमधले ते विद्यार्थी. तीन वेगळ्या स्वभावाचे. त्यांचे कॉलेज आपल्या वालचंद कॉलेजसारखे प्रसिद्ध. त्याचे डीन म्हणजे एकेकाळचे अतिशय हुशार अभ्यासू विद्यार्थी, विरु सहस्रबुद्धे. आपल्या विद्यार्थ्यांवर जबरु पकड असलेले. असेच शिकले पाहिजे आणि तसेच केले

a

पाहिजेचा अतिआग्रह धरणारे. कॉलेजला पहिल्या नंबरवर घेऊन गेल्याचा अभिमान आणि गर्व असणारे.

"रँचो" चांचड, राजू रस्तोगी, फरहान कुरेशी, विरु सहस्रबुद्धे, पिया सहस्रबुद्धे आणि मिलिमीटर ही मुख्य पात्रे. आपल्या कॉलेजची आठवण करून देणारी.

तीन विद्यार्थी, "तीन इडियट्स", कॉलेज मध्ये निरनिराळ्या कारणांनी आलेले. तिघांच्या तीन तऱ्हा. राजू सतत घरच्या विवंचनेत, फरहान "हिटलर कुरेशी" च्या आग्रहामुळे आलेला. "रँचो"मात्र हुशार आणि बिनधास्त, मनाला येईल ते करून टाकणारा. मिलीमीटर काहीही करायला तयार. आमच्या काश्या किंवा चांद सारखा. काश्या, चांद कडून कोणी जर्नल भरून घेतली आहेत की नाही की GT मारून घेतली आहे की नाही ते माहीत नाही, पण तेही ते करू शकले असते.

पियाची आणि रँचोची भेट तिच्या बहिणीच्या लग्नात होते. प्रोफेसरांची कन्या मेडिकल स्टुडंन्ट, गुपचूप लाईन मारणारी. एक दोन वेळा रँचोने "समजावल्या"वर त्याची फॅन झालेली. वर्गांत मुली पुष्कळ. पण रँचो तलावातल्या कमळासारखा अलग राहिलेला. एक सोडून.

रँचोचे वागणे त्याच्या डीनला आवडत नाही, फक्त मार्क मिळवायचे कसे ते शिकणे, रिसर्च वगैरे गोष्टींना दिलेला फाटा त्याला आवडत नाही. तो डीन ला बोलून दाखवतो. क्लास मध्ये शिकविण्याची पद्धत शिकवितो. डीन नाराज होतात. पण तोच नेहमी पहिला येतो आणि कॉलेजच्या फोटो मध्ये डीनच्या शेजारी बसतो, डीन निरुत्तर होतात.

जॉय लोबो कॉलेजमध्ये एक हुशार मुलगा, रँचो सारखाच. त्याचे प्रोजेक्ट, फार पुढचे, पण डीनने नापास केलेले, आता या डीनला कसे समजावयाचे म्हणून फ्रस्ट्रेट झालेला. शेवटी हार मानून जीव दिलान त्याने. त्याचे प्रोजेक्ट रँचोने सक्सेसफुल करून दाखविल्यावर.

आपल्या कॉलेजमध्ये असे जॉय लोबो होते. त्यांनी त्यांची प्रोजेक्ट अभ्यासक्रमाबाहेरची असूनही पूर्ण केलेली. एक आपल्या गोळी पाटलाचे टोकणी यंत्र आणि दुसरे विजय डावजेकरने केलेली ह्रीदम् बॉक्स. दोन्ही अफाट कल्पकतेची होती. त्यांना आपल्या शिक्षकवर्गाचा चांगला पाठिंबा मिळाला होता. अजूनही असतील असे जॉय लोबो, अव्यक्त.

चतुर म्हणजे एक स्टॅंडर्ड सॅम्पल. नुसती घोकंपट्टी करून आणि वर हीच ती पद्धत असे धरून चालूनही पुन्हा पुन्हा रँचो च्या मागेच असणारा आणि म्हणून रडव्या चेहेऱ्याने फोटोत बसणारा. आपल्या कर्तबगारीच्या बढाया मारण्यांत

पटाईत पण शेवटी टॅलेंटलाच शरण गेलेला. घोकंपट्टी करून मार्क मिळतील पण आपला टॅलेंट कसा दिसणार. पण आजचे क्लासेस हेच शिकवतात, घोकंपट्टी करायला.

फक्त उच्च प्रतीच्या शोबाज गोष्टी वापरणारा सुहास, त्याची इंजिनीयर झाल्यावर मग बिझिनेस स्कूल मध्ये जाऊन फायनान्स मध्ये गेल्याची थट्टा काही जणांना आवडली नसेल. पण असे झाले आहे. शेवटी प्रोफेसरकन्या त्याला सोडून देऊन रँचोकडे कशी वळते ते पहावेच.

मेकॅनिकल किंवा सिविल इंजिनीयर होऊन आयटी मध्ये गेलेले आज खूपच दिसतात. इंजिनीयर होऊन एमबीए करतांना फायनान्स घेतलेले ही कित्येकजण असतील. त्यांच्या काळाची गरज आणि पियर प्रेशर होते ते.

आपली मुलेही तशीच झालेली असतील.

दिग्दर्शकाने पात्रे आणि त्यांचे टिपिकल वागणे परफेक्ट दाखवलेले आहे. शेवटी टॅलेंटच पुढे येतो आणि घोकंपट्टी आणि घासूगीरी टॅलेंटलाच शरण जाते हा संदेश. आपल्याला फार आवडला तो.

मला तर या चित्रपटांत आपल्या कॉलेजचीच आठवण झाली. कॉलेजचे ते वातावरण, ते प्रोफेसर, त्यांचे शिकविणे यांचीही प्रकर्षाने आठवण झाली.

मला ती "मशीन"ची व्याख्या, पुस्तकातली, अजूनही आठवते. इनक्लाइन, लिव्हर, गियर चा उपयोग दाखवणारी. तेंव्हा सुद्धा अगदी काल बाह्य झालेली. नंतर कॉम्प्युटरलाही मशीन म्हणायला लागलोच की. "तुमको येही लिखना पडेगा, येही मशीनकी डेफिनिशन है।" असा आग्रह आपल्या सरांनी केला नव्हता कधी. की केला होता?

शिक्षक विद्यार्थ्यांना कसे शिकवितात आणि विद्यार्थी कसे शिकतात की फक्त आपल्याला काय पाहिजे तेच शिकतात हा वेगळा विषय आहे. ३ इडियट्स मधले ते मशीन क्लास ते प्रोफेसर काय करणार, त्यांना जसे शिकवायला सांगितले तसे ते शिकवत असतील. त्यांना तरी शिकवायची फ्रीडम कुठे असते.

प्रोजेक्ट घेतांना कोणी कोठले घ्यावे हे विद्यार्थ्यांना कधी विचारतात का? चांगली रुळलेली प्रोजेक्ट घेतली तर सगळ्यांनाच बरे. करणाऱ्याला पूर्वीची जर्नल, ड्रॉईंग्स मिळतात, तपासणाऱ्यांना तयार उत्तरे मिळतात. प्रोजेक्ट टीमला GT मारता येते, असेसरना रेडी उत्तरे मिळतात. दोघेही खूष. इथे रिसर्च करतो

a

कोण. आणि केलेच तर ते तपासणाऱ्याही मुळांत रिसर्च केल्याखेरीज कसे जमणार? आपल्या शिक्षणपद्धतीवर नेमके बोट ठेवले आहे या चित्रपटाने.

इंजिनियरिंगच्या शिक्षणांत लाटा येत असत. आपल्या वेळेला मेकॅनिकल ला जायला कॉम्पिटिशन होती, नंतर इलेक्ट्रिकल आणि मग सिविल. अर्थांत जे हुशार, गुणी होते त्यांनी अगोदरच आपली लाईन ठरवून ठेवली होती आणि ते त्या त्या लाईन मध्ये यशस्वी झाले.

दर चार वर्षांनी लाटा बदलतात, पण हे लक्षांत कधी येणार? लाटांसारखी मुले लाईन निवडतात. ते इंजिनीयर होईपर्यंत लाट ओसरलेली असते. नवा इंजिनीयर पुन्हा जुना झालेला असतो. मग तो आजच्या लाटेवर स्वार होऊ पहातो.

वर्ष २००० नंतर आयटी हा परवलीचा शब्द झाला आणि आता फायनान्स. मग त्याकरता इंजिनीयर का व्हायचे हा प्रश्न ना त्यावेळेला विचारला गेला ना आता विचारला जातो. इंजिनीयर होऊन ऍडमिशन लौकर मिळते, म्हणून इंजिनीयर व्हा आधी.

आता राजू आणि फरहानला बळेच इंजिनियरिंगला जावे लागले. पण त्यातही जेंव्हा वेळ आली तेंव्हा फरहानने "मनकी बात" त्याच्या "हिटलर

कुरेशी" बाबांना समजावलीच आणि राजूनेही घाबरणे सोडून सत्याचीच वाट चोखाळलीच. काय झाले त्यांचे? दोघेही आपापल्या क्षेत्रात स्टार झाले आणि रँचो? तो तर आदर्श शिक्षक झाला ज्याचा पाठलाग करत "दुसरी गाडी" पकडलेला चतुर त्याला शोधत आला. सुहास, चतुर रुळलेल्या मार्गाने गेले, वहात गेले.

शेवटी पियालाही पटलेच की दिखाऊ भपक्यापेक्षा अस्सल तेच चांगले.

आपल्याला आपल्या आयुष्यांत हेच थोड्याफार फरकाने दिसले नाही का? आपण पन्नास वर्षांनी पुन्हा भेटलो, काय काय केले त्याचा गोषवारा घेतला. कुणी सांगितले, कुणी नाही पण आपणही त्या तीन मित्रांच्या सारखे कित्येक वर्षे दूर राहूनही मित्रच राहिलो.

मुलांनी फार आग्रह केल्यामुळे मी हा चित्रपट पाहिला पण वस्तुतः त्यातला संदेश त्यांच्याच करता होता, मी तो त्यांना पुन्हा ठासून सांगितला नाही पण "समजदार को इशारा काफी होता है".

मनाला जे भावेल ते करा, यश आपोआप तुमच्या कडे येईल. खरेतर हे सांगायला दुसरे कशाला पाहिजेत, पण मन सांगते, आपण ऐकत नाही. कधी परिस्थितीच्या रेट्यामुळे तर कधी आपल्याच इगो मुले. जरा विचार करून बघा,

a

तुम्हाला १९६६ मध्ये काय व्हावेसे वाटत होते ते. आणि मग इंजिनीयर झाल्यावर काय झालात.

मला व्यक्तिशः इंजिनियरच व्हायचे होते, झालो कसातरी. पण एकदा इंडस्ट्रीमध्ये शिरल्यानंतर गोडी जी लागली की कधीच वाटले नाही की इंजिनीयर कशाला झालो असे.

मुले विचारतात, काय मिळविले तुम्ही इंजिनीयर होऊन, ते अमुकतमुकचे बाबा बघा, ते कुठे आहेत इंजिनीयर पण त्यांनी किती कमावले आहे ते. आता त्या बाबांनी जे मिळविले त्याकरता काय काय किंमत दिली असेल ते या मुलांना काय माहीत. आम्ही मुलांना आत्ताच उत्तर देत नाही. त्यांना फक्त सांगतो की जे मनाला आवडेल ते करा. तुम्ही सक्सेसफुल व्हाल. तुम्हीही मिळवाल. आता जेंव्हा मुले माझ्या वयाची होतील तेंव्हा त्यांना उमगेल की बाबा असे का म्हणत होते ते.

ठेच लागणारे दगड तिथेच रहातात, ठेच लागलेला पुढे निघून जातो.

मला स्वतःला विचाराल तर मी सांगेन इंजिनीयर व्हायचे होते, झालो. जे करायचे ते केले आणि मी हॅपी आहे जे केले त्यांत.

रणछोडदास "रँचो" चांचड सारखा.

# मनाचे श्लोक २०२१

श्री समर्थ रामदास स्वामींनी (१६०८ - १६८१) महाराष्ट्रांतील जनतेच्या आत्मउद्धारासाठी बहुत कार्य केले आहे. त्यांनी धर्मवृद्धीसाठी अनेक प्रयत्न केले आहेत.

जनतेच्या मनाला जागविण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले आणि जनतेत आत्मसन्मानाची भावना जागविण्यासाठी अनेक गद्य आणि पद्य रचना केल्या आहेत.

त्यांच्या रचना आज साडेतीनशे वर्षानंतरही तेवढ्याच प्रभावी वाटतात. मनाचे श्लोक (१६५० मधीलअंदाजे) आजच्या काळातही तेवढेच उपदेशपर आहेत.

अर्थात आमची उंची त्यांच्याएवढी होणे कसे शक्य आहे? आम्ही आमच्या काळांत त्यांच्या रचना आठवून आमच्या परीने अनुसरणे मात्र शक्य आहे.

पद्य रचना आम्हाला जरा जड जातात तर गद्य रचनांची कास धरून आपण आमचा होईल तेवढा उद्धार नक्कीच करू शकतो. आम्ही आमच्या काळाला अनुसरून मनाचे श्लोक करावेत आणि अनुसरावेत हेच उत्तम.

हे माझ्या मना, जरा धीर धर, ती कोविद१९ ची बला पाहून खिन्न होऊ नको. तुलाही लौकरच मोकळे पणे वावरता येईल. कारण मनुष्याने औषध नाही तरी प्रतिऔषधाचा शोध लावला आहे.

हे मना, लॉकडाऊन मुळे क्षीण झालेली आपली तनुशक्ती आपण गृहसेवा करून वाढवावी. इतकी वर्षे इतरांची सेवा करून तू शिणलेला होतास ना? मग प्रभू रामचंद्रांने ही संधी दिली आहे तुला.

हे मना, कोविद१९ च्या प्रभावाने दुःखी होऊ नको, त्याने तुला व्यर्थ खर्चाची लागलेली संवय मोडली आहे ना, त्यांत तू आनंद घे. तुझी संपदा वाचली यात समाधान मान.

माझ्या मना, मी काय कार्य केले नाही याचा व्यर्थ शोध घेऊ नको. जे केलेस ते पुरे झाले म्हणून दुसरे काही मनोत्तेजक कार्य कर. आपल्या पुत्रकन्यांमध्ये मन रमविता आले नव्हते तर पौत्रांमध्ये मन रमवायची संधी सोडू नको.

a

अरे मना, वनभ्रमंती करता आली नाही म्हणून निराश होऊ नको. वन संधारणाची संधी तुलाही मिळणार आहे. ते वन गर्द करून समाधान मिळव. मना धीर धर धीर धर, तुझे ते वन अगदी उत्तम होणार आहे आणि तुला समाधान देणार आहे.

आपली मनोदेवता काय सांगते आहे ते तुला ऐकू आले नसेल, कारण कार्यांच्या गलबल्यात तुझे कान किटून गेले असतील तेंव्हा. आता निरव क्षणी मनाचे एक. ते तुला प्रसन्नच करील.

अरे वेड्या मना, अर्थव्यवस्थेच्या कार्यक्रमांत विचार करून का शिणतोस? ती तर तुझ्यासाठीच आहे असे ते सांगतात ना? मन सज्जना कर देईत जावे, वृथा अर्थचिंता सोडून द्यावी.

हे मना, तुला आस होती ना मैत्रीची, ती संपन्न झाली ना, मग तू त्या मैत्रीचे संवर्धन करावे. अर्धशतका नंतर मित्र भेटीचा आनंद उपभोगावास.

हे मना, आपल्यासारखे आपणच हे अकालबाधित सत्य असताना दुसऱ्यांशी आपली तुलना कशासाठी करावीस? जगांत कोणी श्रेष्ठ नाही आणि कोणी कनिष्ठही नाही हे विधात्याने लिखित सत्य असतांना तू इतरांकडे पाहून खिन्न का व्हावेस? आणि मी कोणापेक्षा श्रेष्ठ आहे असे तरी का मानावेस?

अरे मना, लक्ष्मी आणि सरस्वती दोघींचा तुला वरदहस्त असतां तू देवतांमध्ये अनमान का करावेस? कोण भली कोण ना भली याची चिंता का करावीस. दोघी प्रसन्न आहेत, दोघींचे आशीर्वाद घ्यावेस.

मना सज्जना, आता अव्यक्त न रहावे, मनी जे आवडे ते करोन मुक्त व्हावे. दुसरे ते काय म्हणतील याची चिंता कशाला? आणि काहीही केले तर टीकाच जर होणार असेल तर त्याची खंत तरी कशाला करावी. जे आवडेल ते करून टाकावे आणि रिक्त मनाने संतुष्ट व्हावे.

हे मना, तुझे जग आता बदललेले आहे आणि तुला नव्या जगांत वावरायचेच आहे तर मग तो जुन्याचा हव्यास आणि आग्रह सोडणेच चांगले.

अरे मना, तुझे ऐकायला मी तयार असतां जर तनु साथ देत नाही तर मी का खिन्न व्हावे? तुझ्या मुक्त विहाराला ही तनु कशी अडवू शकेल. तुझे पंख या कायेकडे कुठे आहेत? आणि तुझी झेप तिने का थांबवावी? तिच्यांत ती थांबवायची तरी शक्ती आहे का? तर उन्मुक्त विहार कर.

a

हे माझ्या मना, तनूच्या संथपणी तू मुक्त विहार करू शकतोस. जे केले नाही त्याचा प्रयत्न करू पाहतोस. तुला काय मिळवायचे आहे आणि काय घालवायचे आहे?

तुला शांती मिळवायची आहे, आनंद मिळवायचा आहे, समाधान मिळवायचे आहे. तुला मीपण घालवायचे आहे, वृथाभिमान घालवायचा आहे, खंत घालवायची आहे, खेद घालवायचा आहे. तुला हे मिळवायला आणि घालवायला कशाची बंदी आहे?

मनारे मना, जरा स्वच्छता कर. सांदी कोपरे साफ कर. जुने पुराणे सामान टाकून दे, नव्याला जागा दे. ती जळमटे नवे किडे अडकवतील, ते किडे तुला कशाला हवेत? पण रिकामा राहू नको, काहीतरी नवे भर तिथे. ब्रह्मराक्षसाचा निवास होऊ नको.

तुला कवी व्हायचे होते ना, अक्षरसेवा करायची होती ना, सुरांत डुंबायचे होते ना, रंगांत बुडून जायचे होते ना, हे मना, आली बघ ती संधी. माझी कविता कुणाला आवडली नाही तर, माझे साहित्य कुणाला पसंत नाही पडले तर, माझा आवाज त्यांना कर्ण कर्कश वाटला तर, माझी चित्रकला कुणाला समजली नाही तर? पण त्याची चिंता तुला का? तुला जे करायचे ते तू करून टाक, त्यांना जे करायचे ते ते करतील.

बाबा मना, नेहमी व्यस्त अस. काहीतरी करायचे राहून गेल्याची भावना दिवसांती असू दे. उद्याकरिता काहीतरी करायचे शिल्लक ठेव. तुझ्या तनूच्या उद्याची केलीस अगोदरच आता तुझ्या उद्याची कर.

हे माझ्या मना, सत्तर वर्षे तू इतरांचे ऐकलेस, आता इतरांना तुझे ऐकू देत.

जगीं सर्वसुखी असा कोण आहे, पण जगीं सर्वदुःखी असाही कोण आहे, विचारी मना तूच शोधून पाहे. सुखे आणि दुःखे सापेक्ष आहेत जे मना तू जाण.

कधीतरी सूर्य वाढणार आहे, चंद्र पृथ्वीत सामावणार आहे, विश्वाचा प्रकाश लोपणार आहे. पण त्याची चिंता कशाला. नव्या ग्रहगोलांवर राहायची स्वप्ने पहा.

माझ्या हे मना, भूतकाळ होऊन गेला, भविष्यकाळ कोणी पाहिला आहे? वर्तमानकाळ सुखद कर आणि वर्तमानांतच रहा.

इति श्रीरंग स्वामी समर्थ।

# खिडकीची जागा

तुम्ही काहीही म्हणा, आपल्याला खिडकीची जागाच आवडते. वाहन कोणतेही असो, आपण खिडकीच्या जागेवरच बसणार. एवढेच काय घरांतही खिडकीचीच जागा आपल्याला पसंत पडते.

असे का असावे बरें?

एकतर आम्हाला आतल्यापेक्षा बाहेरच्या गोष्टी पाहायला आवडते. आतल्या गोष्टी काही कमी मनोरंजक नसतात पण बाहेरच्या ज्यास्त दिलखेचक वाटतात.

अगदी शाळेंत जाताना ट्रॅम मध्ये मिळेल ती खिडकीची जागाच पकडायची असा आमचा प्रयत्न असे. ती मागे मागे जाणारी दुकाने, त्यांच्या त्या पाट्या, त्या पटकन वाचायची आमची कॉम्पिटिशन, त्या पाठ करून झाल्या तरी पुन्हा पुन्हा वाचण्याची गंमत न्यारीच होती. ती अजूनही आहे. एक चांगले झाले की आमच्या रूट वरच्या सगळ्या पाट्या पाठ झाल्या.

a

आम्हाला एकूण चार ट्रॅमने प्रवास करायला लागायचा, शाळेंत येताजाता. एकदा पाचवीत असतांना ट्रॅमचे दोन पैसे पडले खिशातून कुठेतरी. ते सुद्धा व्हिटीला पोचल्यावर समजले. आता काय करायचे? सरळ ट्रॅमच्या रुळांच्या रस्त्याने चालायला लागलो. खांद्यावर ती शाळेची बॅग, रेनकोट सगळे होते. दुकानांच्या पाट्या पाठ होत्याच. एक एक दुकाने मागे पडत गेली. आलेच की आता आपले घर करत दीड तासाने दुपारी अडीच वाजता घरी पोहोचलो. इकडे आई अजून मुलगा आला नाही म्हणून काळजी करत बसली होती. तिने विचारले की रस्ता कसा सापडला? आम्ही सांगितले की रस्त्यांच्या पाट्या होत्या ना, त्या पहात पहात आलो. आई ऐकून धन्य झाली. सगळ्यांना ती किस्सा ऐकवला तिने.

ही आमची आवड नंतर ट्रॉली बस आल्यावर ही तशीच राहिली. वास्तविकतः ट्रॉली बसच्या खिडक्या सीलबंद होत्या पण आम्ही संवयीचे गुलाम. खिडकीची सीटच धरायचे.

विल्सन कॉलेजच्या दुसऱ्या वर्षांत कुलाबा ते चौपाटी असा १२३ नंबरच्या बसचा मस्त प्रवास होता. मरीन ड्राइव्ह वरून बस जातांना वरच्या मजल्यावर अगदी पुढची डावीकडली खिडकी पकडायची. मस्त समुद्रावरचा वारा खात विमानांत बसल्यासारखा प्रवास करायचा. प्रवास सुखाची परमावधी!

नंतर सांगलीला येता जाता रेल्वे मध्ये खिडकीची जागा मिळाली तर मग काय, उत्तम प्रवासाची गॅरंटी. त्यांतही इंजिना जवळच्या डब्यांत मिळाली तर तो गोड आवाज ऐकत मस्त प्रवास व्हायचा. काहीही म्हणा तुम्ही, रेल्वेच्या इंजिनाचा तो आवाज अजूनही भुलवितो आम्हाला. ती स्वतः भोवती फिरल्यासारखी दिसणारी झाडे, ते मागे मागे पडणारे सीन अजूनही मोहिनी घालतात आमच्या मनावर.

नंतरच्या काळांत रेल्वेपेक्षा बसनेच प्रवास ज्यास्त झाला. पण खिडकीच्या जागेची आवड कधीच कमी झाली नाही. असे कोण असतील की ज्यांना मुंबई पुणे वोल्वो बसमध्ये मोठया खिडकीच्या जागेवर बसून आपल्या खाली मीटर दोन मीटर असलेल्या गाड्या आणि ट्रॅफिक बघत प्रवास करायला आवडत नाही? किंवा गोव्याला जातांना खिडकीतून बाहेरचे सृष्टीसौंदर्य पाहायला आवडत नाही?

विमानाने जातानाही लौकर चेक इन करून बरोबर पूर्ण खिडकी असेल अशी सीट पकडणे हा आमचा उद्योग होताच. त्या करता दीड दोन तास लौकरही गेलो आहे. विमान प्रवास जरी तास दोन तासाचा असला तरी खिडकी पाहिजेच. टेक ऑफ, लँडिंग करतांना विमान कसे चालते, उंचावरून जमिनीवरची गावे, नद्या, धरणे, रेल्वेचे रूळ कसे दिसतात हे पहात पहात प्रवास कसा झाला ते समजतच नाही.

अशी आवड का लागली असेल आम्हाला? अतीव उत्सुकता हे एक कारण असेल आणि प्रवासाची आवड हे दुसरे. प्रवास हे एक कंटाळवाणे, निर्जीव कार्य आहे आणि ते कसेतरी पार पाडायचे असा आपला स्वभाव अजिबात नाहीये. त्यांत आता अजून एक भर पडली आहे. मोटारीने कुठे जाताना पॅसेंजर म्हणून जायची अतीव नावड. मोटारीने जायचे तर स्वतः चालवत. आमच्या खिडकीप्रेमाचाच हा आविष्कार.

खिडकीची जागा पकडून झोपणाऱ्या लोकांची मला दया येते. देवा त्यांना क्षमा कर, ते काय करताहेत ते त्यांना समजत नाहीये. हे म्हणजे गव्हाणीतल्या कुत्र्यासारखे झाले. स्वतः एन्जॉय करत नाही आणि दुसऱ्यांना करू देत नाही. मधल्या सीटवर बसून अशा लोकांकडे बघताना जीव जळतो आमचा.

ज्यास्त करून बघा, मुंबईच्या लोकल मध्ये जीवाचा आटापिटा करून, प्रसंगी जीव धोक्यांत घालून अशी मंडळी खिडकीच्या जागा पकडतात आणि मग खिडक्या बंद करून पत्त्याचा डाव मांडतात किंवा गाडी सुरू व्हायच्या आत मान खिडकीवर टाकून झोपायचा आभास आणतात. मुंबईच्या लोकल मध्ये खिडकी बंद करून घेतली की जीवाचा काय तळतळाट होतो ते अनुभवूनच बघावे.

असा नियम केला पाहिजे की खिडकीच्या जागेवरच्या माणसाने (किंवा बाईने) अजिबात झोपायचे नाही. कार मध्ये पुढच्या सीट वरच्या माणसाने (किंवा बाईने) ड्रायव्हरला जागे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केलाच पाहिजे. बऱ्याच वेळा ड्रायव्हर सोडून बाकीचे सगळेच झोपलेले दिसतात. आणि उलटे झाले तर?

तर मग मतितार्थ असा की खिडकीची जागा बेस्ट. वाहन कुठलेही का असेना.

हे झाले प्रवासी खिडक्यांबद्दल. घरच्या खिडक्याही काही कमी मनोरंजक नसतात.

खिडकीखाली वाहता रस्ता असावा. संध्याकाळची वेळ असावी. खिडकीशेजारी मस्तपैकी आरामखुर्ची असावी. काहीही अर्जंट काम नसावे. दिन तीन तास फ्री असावेत. आणि मग आपल्या जो क्लासिक टाईमपास होतो तो ज्याने केला तो जगातला आनंदी व्यक्ती असला पाहिजे.

त्यांतही कॉमेंट्स करायला कोणी साथीदार असेल तर मग अजून काय पाहिजे? तीन तासांचा पिक्चरच जणू. पुण्याच्या पेरुगेट रोडवर घर असावे, खाली वाहता रस्ता आहेच. मग काय? पूर्वी पुण्यात रहात असतांनाचा

a

गुरुवारच्च्या सुट्टीच्या दिवसाचा हा एक कार्यक्रम होता. आमचे घर तिकडे चिंचवडच्या माळावर होते, तिथे असले काही मनोरंजन नव्हते, म्हणून गुरुवार असा मनाची बॅटरी चार्ज करायचा हा उद्योग होता.

मुंबईतही आंबेडकर रोड किंवा लेडी जमशेदजी रोड वर असाच टाईमपास अजूनही करता येतो. फक्त कोणाचेतरी मोक्याचे घर पाहिजे.

मेनरोड पासून लांब असलेल्या घरांच्या खिडक्या अजून वेगळे जग दाखवतात. खिडकीबाहेर झाडे असावीत, त्यावर पक्षी, खारी फिरत असाव्यात. मग निसर्ग निरीक्षण करण्यात छान वेळ जातो. आम्ही आमचे नेचर व्हिडिओ खिडकीतून नाहीतर गॅलरीतून काढले आहेत, कुठल्याही जंगलांत न जाता.

आमच्या पुण्याच्या घरी अश्या खिडक्या आहेत. बाहेर महानदी मुठा आहे, तिला पुण्याच्या म्युनिसिपालिटीने बांधलेले अर्धवट बांध आहेत. त्या बांधांच्या बाहेर तलाव आहेत. त्यांत पक्षी विहार करीत असतात. ते खूप गोड दिसतात. त्यांचे आम्ही खूपदा नेचर व्हिडिओ काढले आहेत. खरंच, हे आमचे घर म्हणजे खिडकीत बसून बघत बसायचे एक केंद्र झाले आहे.

कधीतरी कशाचातरी विचार करत बसतांना ही खिडकीची जागा एक विचारचक्र सुरू करून देते आणि आपल्याला काहीतरी नवे करायची स्फूर्ती

देते. असे म्हणतात की आमच्या सारख्या इतर विचारवंतांना खिडकीतून नजर लावून बसल्यावर उत्तमोत्तम विचार सुचले आहेत, कविता स्फुरल्या आहेत आणि त्यांच्याकडून महान कार्य झाले आहे.

आमचाही विश्वास आहे की आमच्याकडूनही असेच काहीतरी महान भव्य कार्य होणार आहे.

त्यासाठी फक्त एक छानशी खिडकीची जागा असायला पाहिजे.

# कावळे

आपल्या मनुष्य जातीला नेहमी धरून असणारे जे काही थोडे प्राणी आहेत त्यांत कावळ्याचे योगदान खूप आहे.

मनुष्याने अनेक प्राणी माणसावले आहेत त्यांत गाई म्हशी, बकऱ्या, मेंढ्या, उंट आणि घोडे या न त्या उपयोगामुळे पाळले आहेत. जवळ जवळ बारा हजार वर्षांपूर्वी मनुष्याने भटकंतीचा उद्योग सोडून शेती कडे लक्ष वळविले. शेती बरोबर येणारे बैल, घोडे आणि गाढवे मनुष्याला आपल्या शक्ती बाहेरची कामे करायला उपयोगी ठरले.

खायला आणि पाळायला कोंबड्या आणि बदके विशेष आवडली त्याला. माणसांच्या जवळ राहून सहज अन्न मिळू शकते ते पाहून इतर पशुपक्षीही मनुष्याच्या जवळपास राहू लागले. त्यांत कावळेही सहभागी झाले. पण पाळले मात्र गेले नाहीत. ते जवळ असूनही अलगच राहिले.

कावळा एक बुद्धिमान, चतुर आणि तसा निरुपद्रवी पक्षी असल्याने त्याला मनुष्याने जवळ पास राहू देण्यांत हरकत घेतली नाही.

a

कावळा आपल्या तीक्ष्ण नजरेने काहीतरी वेगळे झालेले लगेच शोधतो. चतुर आणि चौकस स्वभावाने तो परिपूर्ण आहे. मनुष्याच्या लक्षांत हे लगेच आले असले पाहिजेआणि आपल्याला एक सावधानीची सूचना मिळते हे ही त्यांच्या लगेच लक्षांत आले असले पाहिजे.

कावळयाच्या स्वरावरून तो काय सांगतो आहे ते कळते. मध्यान्हीची त्याची आरामाची वेळ तो गात गात घालवतो. एखाद्या खिडकीवर बसून त्याचे जे गाणे चालते ते ऐकावेच एकदा. रागदारी करत असतो जणू.

जरा नेहमीपेक्षा काही वेगळे दिसले की त्याची कावकाव सुरू होते. एकाला दोन दोनाला चार असा त्यांचा थवा वाढत जातो आणि आवाजही. मग ते साधे मांजर असो आपल्या रस्त्याने जाणारे. किंवा मरून पडलेला एखादा प्राणी पक्षी असो. कावळाच जर पडलेला असेल तर मग काही बघायलाच नको. तासभर चालतो तो कार्यक्रम. पडलेल्या त्या कावळयाला कितीतरी जण टोचून उठवायचा प्रयत्न करतात. एकंदरीत कावळे वॉर्निंग देतात यात शंका नाही.

"पैलतो गे काऊ कोकताहे, शकुन गे माये सांगताहे", ही ज्ञानेश्वरांची रचना हेच सांगते. शकुन म्हणजे खूण किंवा सूचना.

a

सगळ्या प्राणी पक्ष्यांची शास्त्रज्ञांनी जी पहाणी केली आहे त्यातून त्यांनी कावळ्याला खूप वरचा मानला आहे. कावळ्यांच्या हुशारीची आणि चातुर्याची अनेक उदाहरणे गोष्टींत आणि प्रत्यक्षांत दिसून येतात.

कावळे उडतांना बघा, कला दाखवत असतात जशी काही. सर्व साधारणतः जमिनी जवळच उडणारे कावळे घारींचा पाठलाग करत किती उंच जातात आणि मग जे सूर मारून एकदम खाली येतात ते माणसांच्या विमानांनाही करता येणार नाही. पण हंस काक स्पर्धेत कावळ्याची फजिती कशी झाली हेच कवींनी सांगितले, त्यांचे चातुर्य नाही सांगितले. कारण हंस दिसायला देखणा, त्याचे उडणे स्टायलिश मग बिचाऱ्या कावळ्याचे कौतुक कोण करणार. दुनिया छान दिसणाऱ्याचेच कौतुक आणि वाहवा करणार.

मुंबईत दादरला एक पट्टा आहे समुद्राला लागून. माहीम पासून वरळी पर्यंत. तिथे एकेकाळी नारळाची, वड, पिंपळाची आणि चिंचेची गडद वने होती. या पट्टयांत कावळे बहुसंख्य आहेत, अजूनही. त्यामुळे त्यांचे निरीक्षण करणे सोपे झाले आहे. कावळ्यांच्या झुंडीच्या झुंडी तिथे राहतात आणि उंच इमारतींच्या मध्ये जी काही थोडी मोठी झाडे आहेत तिथे आपले राज्य पसरविले आहे त्यांनी.

तसे बरेच पक्षी थव्याने रहातात पण कावळ्यांच्या झुंडीला एक समाज रचना आहे हे नक्की जाणवते. फेब्रुवारी मार्च च्या सुमाराला त्यांच्या कॉन्फरन्सेस होतात. अगदी कुठल्याही मोकळ्या जागेत बिल्डिंगच्या टाक्यांवर पन्नास साठ कावळे जमा होतात. एक दोन त्यांचे लीडर असतात आणि इतरजण त्यांच्या भोवती घोळका करून त्यांच्या भाषेंत जो संवाद साधतात तो अगदी पाहण्यासारखा असतो.

ते चक्क आपापले ग्रुप करतात. अगदी नक्की विचारमंथन चाललेले असते त्यांचे ते दिसून येते. काहीजण घोळक्याच्या कडेलाच असतात, ते मध्यभागी येत नाहीत. म्हणजे नक्कीच त्यांच्यांत उच्च नीच भाव असला पाहिजे.

सगळ्या प्रगत प्राणिमात्रांत ही योजना दिसून येते. घोळके किंवा थवे किंवा कळप बरेच प्राणी करतात पण अशी सोशल रचना असलेले कदाचित लांडगे आणि सिंहच असतील.

दुसरे म्हणजे मनुष्यांपेक्षा इतर प्राण्यांना पर्यावरणातले फरक नक्कीच लौकर आणि प्रकर्षाने जाणवत असावेत. कावळेही त्याला अपवाद नाहीत. पण इतर प्राणी माणसाला समजेल असे व्यक्त करू शकत नसावेत पण कावळे ते करतात.

a

साधे उदाहरण म्हणजे चंद्राचे गुरुत्वाकर्षण. चंद्र क्षितिजावर किंवा डोक्यावर किंवा पायाखाली, म्हणजे विरुद्ध बाजूला गेल्यावर कावळे बरोबर त्यांची कावकाव सुरू करतात. हे मात्र अगदी नक्की आहे. आताच पहा, आज सात फेब्रुवारी २०२१ रोजी, सकाळी पावणे बाराच्या सुमाराला, मी हा लेख लिहीत असतांना, कावळे बाहेर कावकाव करताहेत. चंद्र डोक्यावर येतो आहे. जेवढा चंद्र बरोबर थेट डोक्यावर किंवा पायाखाली असेल तेवढी त्यांच्या कावकावीची तीव्रता ज्यास्त होते.

कोणी म्हणतील की हे सर्व थोतांड आहे. नसावे बहुतेक. कारण चंद्र बरोबर डोक्यावर जेंव्हा येतो किंवा पायाखाली जातो तेंव्हा त्याचे गुरुत्वाकर्षण सर्वाधिक असते हे शास्त्रीय सत्य आहे. कावळ्यांना आणि इतर प्राण्यांना हा फरक नक्कीच जाणवत असेल. कावळे सांगतात, इतर प्राणीपक्षी सांगत नाहीत हाच फरक असेल. भरती आणि ओहोटी तर खरी असते की नाही? का तेही थोतांडच आहे?

एक प्रयोग करून बघण्यासारखा आहे. एका लवचिक तारेला एक जडशी गोटी लावायची एक टोकाला, आणि ती तार क्षितिज समांतर लावायची. तिथे हवेचे झोत येत नाहीत ते पहायचे. चंद्राच्या हालचालीने ती गोटी वरखाली व्हायला पाहिजे. झाली तर कावळे खरे निघाले आणि थोतांड म्हणणारे खोटे.

कावळयांना आपण अजूनही एक काम दिले आहे. शिवायचे. पूर्वी कधीतरी काही स्त्रिया अचानक घरांत बाजूला व्हायच्या. आम्हाला सांगितले गेले की त्यांना कावळा शिवला आहे म्हणून. मग काय झाले, मला आत्ताच एक कावळा टोच मारून गेला मी अंगणात खेळताना. पण ते वेगळे आणि हे वेगळे. पाच सहा दिवसांनी ती काकू किंवा मामी किंवा ताई जवळ येऊ द्यायची. तेंव्हा काही समजायचे नाही.

मनुष्य हा एकुलता एक प्राणी आहे का जो आत्मा आहे आणि तो आत्मा अमर आहे मानतो? मनुष्याचा उपरांत तो आत्मा येतो आणि दिलेला अंश घेऊन जातो हा समज फार तीव्र आहे अजून आपल्या हिंदू धर्मांत. कावळेच करतात हे आपले काम. पिंडाला कावळा शिवणे हा अंतिम संस्काराचा परमोच्च बिंदू आहे. कावळयाचे महत्व यांत परमोच्च आहे हे कोणीही धार्मिक हिंदू मान्य करील यांत शंका नाही.

कावळा पिंडाला शिवला नाही तर अंत्यसंस्कार करणाऱ्याला शांती मिळत नाही. तेंव्हा बोलून वचने दिल्याची उदाहरणे ऐकली आहेत.

फक्त कावळयालाच का दिले असावे हे काम हे विचार करण्यासारखे आहे. कावळयांची बुद्धी, चातुर्य आणि त्यांचा तो विशेष वर्ण कारण असावा. जिथे कावळे फारसे रहात नाहीत तिथे काय काय अडचणी येतात ते ज्यांनी अनुभवले

त्यांनीच सांगावे. तिथे दर्भाचा कावळा करून वेळ मारून नेण्याचीही वेळ येते. पण त्यांत ते जमलेले लोक समाधानी होत नाहीत हे उघड आहे. असो. हे झाली कावळयांचे एक वेगळे नाते मनुष्याबरोबर.

शिवणे हा कावळयांशी आपला एक गंभीर आणि तरीही न टाळण्याजोगा संबंध आहे. ही आपली त्यांच्याबरोबरची एक अटळ बाब आहे.

कावळयांची एक मजेशीर आणि तरी सिरीयस बाब आहे. कावळे त्यांचे मार्च एप्रिल मध्ये लग्न झाले की त्याच त्याच झाडावर आपले घर बांधतात. त्यांचा तो लग्न समारंभ ही त्यांच्या त्या कॉन्फरन्स सारखा बघण्यासारखा असतो. त्यांच्या नवरा नवरी चे लगीन होतांना त्यांचे ते पाहुणे जी कावकाव करतात ती खूप वेळ चालते.

एकदा लग्न झाले की ती जोडी घर बांधायला घेते. मग आपल्या खिडकीतले, गॅलरीतले चिमटे, हँगर नाहीसे व्हायला लागतात. कावळयांची चौकस नजर इथे दिसून येते. दोन दोऱ्या एक रंगीत आणि एक साधी दिसली तर रंगीत दोरी तो कावळा पहिल्यांदा उचलतो. त्याचे ते घर म्हणजे आपल्या घरांतून उचललेल्या गोष्टींचे म्युझियम झालेले दिसते.

मग एकदा त्या कावळीने अंडी घातली की मग कावळा आणि त्याची बायको जे रूप धारण करतात ते उग्र आणि रागीट शत्रू सारखे होते. ते आपल्याला खिडकीत किंवा गॅलरीत येऊच देत नाहीत. कावळयाच्या डोळ्यातील तो राग आणि त्याची ती रक्षणवृत्ती आपल्याला चकित करणारी होते. एरवी भित्रा मित्र असलेला तो कावळा आपल्या कुटुंबाचे रक्षण करायला एवढा तयार असतो की तुम्हाला तो कपडेही वाळत घालायला त्याचा नकार देतो. आम्हाला कावळ्यांनी अनेक वेळा पंखांचा आणि नखांचा प्रसाद दिला आहे.

पावसाळा आला की मग त्यांचे बाळ घरातून बाहेर येऊन जवळपास बसू शकते, त्याचे आई बाबा जवळच असतात त्याचे रक्षण करायला. पण तो राग आणि चेव आता कमी झालेला असतो आणि पुन्हा ते आपले भित्रे मित्र व्हायला लागलेले असतात. पुढच्या बाळांचा जन्म होई पर्यंत.

अशी अनेक वर्षे कावळ्यांचे निरीक्षण केल्यामुळे आता आम्हाला त्यांची ओळख होऊ लागली आहेत. ते आमचे "पेट" होऊ शकत नाहीत पण मित्र आहेत. आमच्यासारखेच तेही ग्रुप करतात, चर्चा घडवतात आणि आम्हालाही ते काहीतरी शिकवतात.

a

त्यांची भाषा कळायला पाहिजे आपल्याला. मग कळेल काय म्हणतात ते आपापसात आणि आपल्या बद्दल ते. ते आपल्यालाच समाज विरोधी म्हणत असतील. ते म्हणत असतील की समाज असावा आमच्या सारखा, निरुपद्रवी आणि शांतिमित्र. तुमची युद्धे आम्हाला पसंत नाहीत. आम्ही बघा कधी युद्ध करून आपलेच कावळे मारतो का? आमच्याकडून शिका काहीतरी. जगांत शांतता येईल त्यामुळे.

कावळ्यांकडून बरेच शिकण्यासारखे आहे.

आपला गुरू कसाही असो, त्याच्याकडून मिळणारे शिक्षण महत्वाचे हो की नाही. मग कावळ्यांकडे बघा, चांगले गुरू आणि मित्र आहेत ते आपले.

# विजेच्या गाड्या

आजकाल विजेच्या गाड्यांवर फार चर्चा सुरू झालेली आहे. वातावरण असे आहे की जसे काही काही नवा शोध लागलेला आहे. टेस्ला आणि इतर मेकच्या गाड्या एकविसाव्या शतकांत जश्याकाही एकदम नवीन इन्व्हेन्शन असल्यासारखे वाटावे असे झाले आहे. पण इलेक्ट्रिक गाड्या पूर्वीही होत्या, आपणच त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते.

आम्ही लहान असताना विजेच्या गाड्यांतून बराच प्रवास केला आहे. मुंबईत विजेची ट्रॅम ११२ वर्षांपूर्वी सुरू झाली. पहिल्यांदा एकेरी ट्रॅम आणि नंतर दुहेरी आणि दोन मजली ट्रॅम सुरू झाल्या. मुंबईतले, म्हणजे जुन्या मुंबईतले, रस्ते ट्रॅम च्या रुळांनी सजलेले होते. ट्रॅम मुंबईत कुलाबा ते किंग सर्कल मध्ये होती. ट्रॅमचे रूळ गिरगाव, काळबादेवी ते अगदी बॉम्बे सेंट्रल पर्यंत होते. ग्रँट रोडचे जंक्शन म्हणजे ट्रॅमच्या रुळांनी भरून गेले होते. वर पाहिले तर ताराच तारा आणि खाली पाहिले तर रुळच रूळ असे होते. बोरिबंदर, मेट्रो सिनेमा, पायधुणी, ग्रँट रोड, म्युझियम, जेजे हॉस्पिटल ही मोठी जंक्शन होती.

a

भायखळ्यानंतर रस्ता एकदम रुंद होता त्यामुळे ट्रॅम थोड्या ज्यास्त वेगाने जाऊ शकत होती. राणीची बाग, परळ, दादर आणि मग किंग सर्कल ही टीटी म्हणजे ट्रॅम टर्मिनस होती.

आम्हाला शाळेंत जायला ट्रॅम हे प्रमुख वाहन होते. त्या वयांत ट्रॅम ज्यास्त आवडायची कारण ती नेमक्या रस्त्याने जायची आणि बसेस इतर रस्त्यावरून जायच्या त्यामुळे बस कुठून कशी जाईल ते समजायचे नाही आम्हाला, पण ट्रॅमची खात्री असायची. शाळेत जातायेता चार वेळा ट्रॅम बदलायला लागायची कारण शाळा गिरगावात आणि घर जेजे हॉस्पिटलला होते.

ती ट्रॅम म्हणजे एक बघायचा प्रकार होता. रुळावर ट्रॅम आणि वर त्याची वायर. ट्रॅमला एक दांडा असायचा त्याला एक फिरणारे चाक, ते बरोबर तारेत बसायचे. ट्रॅम आपल्या शेवटच्या स्टॉप वर पोहोचली ती तो कंडक्टर खाली उतरून वरचा दांडा ओढून उलट्या बाजूला नेऊन परत तारेला लावायचा. हे सर्व तो करीपर्यंत आम्ही बघायचे मग जायचे कुठे जायचे तिथे. १९४५ ते १९६४ चा काळ म्हणजे मुंबईच्या ट्रॅमचा सुवर्णकाळ होता म्हणाना. त्यावेळी ट्रॅमची पाच सहा मॉडेल फिरत असायची.

तशी नंतर कलकत्त्यातली ट्रॅमही पाहिली पण मुंबईच्या ट्रॅमची शान तिच्यांत वाटली नाही.

ट्रॅमनंतर मुंबईत ट्रॉलीबस आली. तीही विजेवरच चालायची. पण तिला दोन दांडे असायचे. ट्रॅमला एकच, कारण तिचे रुळातून अर्थींग होते. ट्रॉलीबसला पॉझिटिव आणि निगेटीव अश्या तारा असायच्या कारण तिचे रबरी टायर. ट्रॉलीबस ज्यास्त वेगाने जात असे आणि आवाज खूपच कमी. पण चार पाच वर्षांत तिचेही दिवस संपले कारण मेंटेनन्स खर्च आणि स्पेअर पार्टस मिळायचे नाहीत. स्कोडाच्या होत्या त्या ट्रॉलीबस.

रेल्वे म्हणजे ट्रॅमची मोठी बहीण. चालायला तशीच पण खूपच फास्ट. विजेची रेल्वे मुंबईत १९२५ साली सुरू झाली ती अजून आहे. लोकल गाड्यांनी प्रवास करायची वेळ मात्र इंजिनीयर झाल्यावर आली. ट्रेनी इंजिनीयर म्हणून चर्चगेट ते लोवर परळला जावे लागायचे. एकंदरीत रेल्वे हा आमचा आवडीचा विषय असल्यामुळे लोकलचा आणि रेल्वेचा प्रवास विशेष आवडायचा. तसे लहान असताना लोकलने फिरायची संधी फार मिळायची नाही पण मुंबई पुणे प्रवास इलेक्ट्रिक इंजिनाच्या गाड्यांनीच व्हायचा.

लोकलचा प्रवास करताना शेजारच्या रुळावरून जाणारी दुसरी गाडी पहाण्याची हौस सगळ्यांनाच असते म्हणून तर दारांत उभे राहून जायला आवडते. नंतर नोकरीधंद्याला जातांना लोकल गाडीच.

a

सांगलीला असतांना १९७०-७१ मध्ये मीटर गेज ची डीझेल इंजिने येऊ लागली होती. ती ही विजेची वाहनेच की. पहिले डीझेल इंजिन मिरजेला पाहिले तेंव्हा छान वाटले. सगळ्या कोळशाच्या इंजिनांत ते उठून दिसायचे. अर्थांत नंतर ती नेहमीची झाली.

विजेवर चालणारी वाहने म्हणजे फोर्कलिफ्ट ट्रक आणि गोल्फ कार्ट. ते काम चार तास करायचे आणि चार्जिंगला चार तास बसायचे.

विजेच्या गाड्यांमध्ये पूर्वी पॉप्युलर सायन्स आणि पॉप्युलर मेकॅनिक्स मासिकांत बरेच वर्णन वाचले होते. नेहमीच्या लेड ऍसिड बॅटरींची माळच्या माळ लावून इलेक्ट्रिक गाड्या बनविल्या, कश्या चालतात ते वर्णन या मासिकातून वाचायला मिळायचे. आत्ताआत्ताच तसल्या गाडीचा व्हिडिओ बघायला मिळाला होता.

आता एकविसाव्या शतकांत विजेच्या गाड्यांची चलती होणार आहे. युरोप अमेरिकेत आणि जपान दक्षिण कोरियात या गाड्या मूळ धरू लागल्या आहेत. भारतातही आज इलेक्ट्रिक कारची चर्चा जोरांत चालू आहे. हळूहळू बॅटरी आणि इतर मुख्य सामान बनविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही गाड्या रस्त्यावर आल्या आहेत पण अजून फुल कॉन्फिडन्स यायचा आहे. येईल.

a

मधल्या काळांत हायब्रीड कार नावाचा एक प्रकार आला होता, त्यांत पेट्रोल इंजिनने इलेक्ट्रिसिटी तयार करून गाडी इलेक्ट्रिक मोटारीने चालवायची कल्पना होती. या गाडीमध्ये बॅटरी फक्त टेंम्परारी स्टोरेज म्हणून काम करायची आणि इंजिन त्याच्या बेस्ट एफिशियनसिने चालायचे आधी कल्पना होती पण या गाड्या भलत्याच महाग निघाल्या आणि सर्व सामान्यांच्या आवाक्यांतल्या राहिल्या नाहीत.

ती कल्पना चांगली होती. गाडीला कॉन्स्टंट टोर्क ड्राइव्ह आवडतो. बहुधा पेट्रोल डीझेल इंजिने कॉन्स्टंट टोर्क करण्यावरच भर दिलेला असतो. पण डीसी मोटर सारखी परफेक्ट गोष्ट दुसरी नाही गाडी चालवायला. म्हणून मोटर डीसी आणि तिचा कंट्रोल कॉम्पुटरने हा बेस्ट उपाय आहे. सगळ्या इलेक्ट्रिक गाड्यांना हीच सिस्टीम आहे.

२०१७च्या सुमारास महिंद्राची इलेक्ट्रिक कार थोडीशी चालवून पाहायचा योग आला. चांगली स्मूथ वाटली पण मुंबईत तरी अजून फारशी रुळलेली दिसत नाही. तिची रेंज आणि रिचार्जिंगची सोय हे अजून कच्चे मुद्दे आहेत.

आपल्याला झाली आहे पेट्रोल आणि डीझेल गाड्या चालवायची संवय. नुसता अक्सलरेटर दाबायचा आणि पळवायची गाडी ही आपली संवय. एसी, दिवे सगळे सांभाळायला इंजिन आहेच. लाल सिग्नल लागला तरी ते चालूच

a

ठेवायचे. पेट्रोल डीझेल वर चालते गाडी तो पर्यंत ठीक आहे. इंजिन आणि आल्टरनेटर बघून घेतो ते सगळे. पण उद्या बॅटरी वरची गाडी चालवायला लागल्यानंतर हे सगळे विसरायला लागेल आणि नव्या ड्रायविंगच्या संवयी लावून घ्यायला लागतील.

आज परदेशी गाड्यांची रेंज ३००-४०० किलोमीटर झाली आहे असे ऐकले आहे. खरे खोटे वापरणारे जाणोत. पण एक मात्र लक्षांत ठेवायलाच लागेल की इलेक्ट्रिक गाडीत बॅटरी हा एकच एक एनर्जी सोर्स असल्यामुळे रेंज ही चालविण्याच्या स्टाईलवर आणि विनाकारणच्या वस्तू न वापरणे हे नक्कीच महत्वाचे ठरणार आहे. शिवाय इलेक्ट्रिक गाडी ज्यास्त प्रेमाने हाताळावी लागेल.

गाडीचा स्पीड हळूहळू वाढविल्याने बॅटरी वरचे लोड कमी होईल कारण जेवढे ऍम्पियर ज्यास्त तेवढी बॅटरीची क्षमता कमी होते हे सत्य आहे. हे आपण सध्या लेड ऍसिड बॅटरी मध्ये ही पाहतो. गाडीचा एक्सलरेटर वरचा पाय उचलला की गाडी बॅटरी चार्ज करायला लागते. म्हणजे ब्रेक ज्यास्त न वापरता हळूहळू वेग कमी करणे ज्यास्त चांगले. गाडी थांबलेली असताना एसी आणि दिवे बंद करणेही आपल्याला रुळवावे लागेल.

रेंज वाढवायचे बरेच उपाय आहेत. त्यांत एके काळी प्रसिद्ध झालेल्या फ्युएल सेल सारखा उपाय आहे. फ्युएल सेलच्या गाडीत फ्युएल सेल दमला की बदलून दुसरा टाकायचा की गाडी फ्रेश झाली. तसेच बॅटरी दमली की दुसरी टाकायची, गॅस सिलिंडर कसे बदलतो तसे. म्हणजे गाडी आणि तिची बॅटरी या अगदी वेगळ्या गोष्टी असतील. हा उपाय चांगला वाटतो कारण बॅटरी बदलायला काहीच मिनिटे लागतील. बॅटरी पॅक चार्ज करून तयार असतील. बॅटरी तुमची नसेल, जसा गॅस सिलिंडर तुमचा नसतो तसे.

चार्जिंग स्टेशनला नेऊन चार्जिंग करणे हा उपाय आहेच. पण चार्जिंगला लावलेली गाडी तास दोन तास तरी एक जागी. मग मजल दरमजल करत प्रवास करायचा.

आपण सतत बदलत असतो. पेट्रोलच्या गाड्या खर्चिक म्हणून डिझेलच्या गाड्या स्वीकारल्या. आता पेट्रोलियम वर चालणाऱ्या गाड्या चालवायला खर्चिक होत चालल्या आहेत तर इलेक्ट्रिक गाड्या स्वीकारू.

हा विषय मोठा होत जाणार आहे. त्यावर चर्चा वाढत जाणार आहेत. जसजश्या आपण इलेक्टिक गाड्या वापरू तसतसे नवे मुद्दे विचारांत येत जाणार आहेत. पण एक नक्की की आपण आणि इलेक्ट्रिक गाड्या ही जोडी आता बराच काळ रहाणार आहे.

त्याचे आपण स्वागतच करायला पाहिजे.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# श्रीरंग कौलगी यांचं हे ई साहित्यवरील दुसरं पुस्तक.

श्रीरंग कौलगी हे त्या काळातील इंजिनियर जेव्हा भारतात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच इंजिनियरिंग कॉलेजेस होती. इंजिनियर हा त्या काळचा क्रीम. इंजिनियरिंग सोबतच त्यांचा इतर छंद जोपासण्याचा स्वभाव व वाचन आणि चिंतन यांमुळे आयुष्याकडे त्यांनी सजगपणे पाहिले. त्यांच्या लेखनातून त्यांचा मौलिक अनुभव आणि त्यांचे खुसखुशीत भाषेतील चिंतन अशी दुहेरी मेजवानी मिळते. त्यांच्या पुस्तकांची एक मालिकाच ई साहित्य प्रकाशित करत आहे.

श्रीरंग कौलगी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि.

देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(2), यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी॥